| | |
|---|---|
| १. महात्मा ज्योतीबा फुले | ४२. गणेश दामोदर सावरकर |
| २. राजर्षी शाहू महाराज | ४३. संत तुकाराम |
| ३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर | ४४. गणेश वासुदेव जोशी (ग. वा. जोशी) |
| ४. महर्षी धोंडो केशव कर्वे | ४५. संत ज्ञानेश्वर |
| ५. कर्मवीर भाऊराव पाटील | ४६. संत एकनाथ महाराज |
| ६. श्रीधर महादेव जोशी | ४७. अवंतिकाबाई गोखले |
| ७. साने गुरूजी | ४८. कृष्णराव पांडुरंग भालेकर |
| ८. वसंतराव फुलसिंग नाईक | ४९. काशीबाई कानिटकर |
| ९. स्वामी रामानंद तीर्थ | ५०. दादासाहेब गायकवाड |
| १०. वासुदेव बळवंत फडके | ५१. अनुताई वाघ |
| ११. नानासाहेब उर्फ जगन्नाथ शंकरशेट मुरकुटे | ५२. विष्णुबुवा ब्रह्मचारी |
| १२. उमाजी नाईक | ५३. आचार्य विनोबा भावे |
| १३. शंकरराव चव्हाण | ५४. प्रल्हाद केशव अत्रे / आचार्य अत्रे |
| १४. केशव बळीराम हेडगेवार | ५५. अण्णा हजारे |
| १५. लोकनायक बापुजी अणे | ५६. रमेश चंद्र दत्त |
| १६. भाऊ दाजी लाड | ५७. उषा मेहता |
| १७. कमलादेवी चट्टोपाध्याय | ५८. दादोबा पांडुरंग तर्खडकर |
| १८. नारायण मेघाजी लोखंडे | ५९. समाजसेवक - गोपाळ गणेश आगरकर |
| १९. किसान फागु बनसोडे | ६०. आण्णाभाऊ साठे |
| २०. दिनकर जवळकर | ६१. गोपाळबाबा वळंगकर |
| २१. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे | ६२. आनंदीबाई जोशी |
| २२. बहिणाबाई चौधरी | ६३. विष्णुशास्त्री चिपळूणकर |
| २३. ताराबाई शिंदे | ६४. सावित्रीबाई फुले (क्रांतीज्योती) |
| २४. शिवराम जानबा कांबळे | ६५. सिंधूताई सपकाळ |
| २५. लहूजी साळवे | ६६. विष्णूशास्त्री पंडीत |
| २६. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | ६७. माधवराव खंडेराव बागल |
| २७. लोकहितवादी | ६८. गोपाळकृष्ण गोखले |
| २८. चाफेकर बंधू | ६९. तात्या टोपे |
| २९. दादाभाई नौरोजी | ७०. गोविंद पानसरे |
| ३०. प्रकाश आमटे | ७१. रघुनाथ धोंडो कर्वे |
| ३१. पु. ल. देशपांडे | ७२. शिवराम महादेव परांजपे |
| ३२. बाबा आमटे | ७३. रमाबाई रानडे |
| ३३. प्रबोधनकार ठाकरे | ७४. न्या. महादेव रानडे |
| ३४. पांडुरंग महादेव बापट | ७५. पंडिता रमाबाई |
| ३५. विनायक दामोदर सावरकर | ७६. अनंत लक्ष्मण कान्हेरे |
| ३६. लोकमान्य टिळक | ७७. केशवराव एम. जेधे |
| ३७. नरेंद्र दाभोळकर | ७८. रामकृष्ण गोपाल भांडारकर |
| ३८. क्रांतीसिंह नाना पाटील | ७९. ताराबाई मोडक |
| ३९. ग. दी. मांडगूळकर | ८०. मंडलिक विश्वनाथ नारायण |
| ४०. यशवंतराव चव्हाण | ८१. अभय बंग |
| ४१. बाळशास्त्री जांभेकर | |

## १. महात्मा ज्योतीबा फुले (१८२७-१८९०)

**जन्म :** ११ एप्रिल १८२७, पुणे
**मृत्यू :** २८ नोव्हेंबर १८९०
**नाव :** ज्योतीबा गोविंदराव फुले
**मुळ गाव :** कटगूण, ता. सटाव, जि. सातारा
**आई :** चिमणाबाई
**वडिल :** गोविंदराव

- मुळ नाव गोऱ्हे होते, परंतु वडिलांच्या फूलांच्या व्यवसायावरून फुले पडले.
- एक वर्षाचे असताना आईचे निधन.
- १८३४ वडिल गोविंदरावांनी ज्योतीबांना मराठी शाळेत घातले.
- १८३८ ब्राह्मणांच्या सल्ल्यावरून गोविंदरावांनी बागकाम शिकवण्यासाठी ज्योतीबांना शाळेतून काढले. (४ वर्षात मराठी शिक्षण पूर्ण केले)
- ज्योतीबांचे शिक्षण परत सुरु करण्यास आग्रह करणारे दोन व्यक्ती -
  १) गफ्फार बेग मुन्शी २) खिस्ती धर्मोपदेशक मि. लिजिट साहेब
- १८४० वयाच्या १३ व्या वर्षी ७ वर्षाच्या सावित्रीबाईशी विवाह
- १८४१-४७ स्कॉटिश मिशनरी शाळेत शिक्षण.
- १८४८ लहुजीबूवा साळवे (मांग) यांकडे दांडपट्टा व नेमबाजीचे शिक्षण.
- सगूणाबाई (गोविंदरावांची मानलेली बहीण) आई वारल्यानंतर त्यांचा सांभाळ केला.
- **ज्योतीबांच्या विचारावर प्रभाव पाडणारे ग्रंथ :**
  १) राईट ऑफ द मॅन - थॉमस पेन २) वस्त्रसूची - संस्कृत ३) विप्रमती - कबीर

**सामाजिक कार्य :**

- ३ जुलै १८४८ मूलींची पहिली शाळा, बुधवारपेठ - पुणे (तात्यासाहेब भीडेंचा वाडा)
- मूलींची पहिली शाळा सुरू करण्यासाठी मिस फरार यांच्याकडून प्रेरणा.
- शाळेतील पहिल्या ६ विद्यार्थिनी -
  १) सूमती मोकाशी २) दूर्गा देशमूख ३) माधवी थत्ते ४) सोनू पवार ५) जनी करडीले
- १८४९ सावित्रीबाईंना शिकवल्याबद्दल घराबाहेर काढले.
- ३ जुलै १८५१ परत शाळा सुरु केली, बुधवारपेठ - पुणे (अण्णासाहेब चिपळूणकर वाडा)
- १८५१ अस्पृश्यांसाठी पहिली शाळा - नानासाहेब पेठेत
- १७ सप्टेंबर १८५१ रास्तापेठेत मूलींची दूसरी शाळा
- १५ मार्च १८५२ वेताळ पेठेत मूलींची तिसरी शाळा.
- १९ मे १८५२ अस्पृश्यांसाठी शाळा, वेताळपेठ - पुणे (सदाशिव बल्लाळ गोवंडे यांचा वाडा)
- १८४८ मराठी जातींच्या मूलांसाठी स्वतंत्र शाळा - बुधवारपेठ
  (जगन्नाथ सदाशिव हाटे व सदाशिव बल्लाळ गोवंडे यांच्या मदतीने)
- १८४९ अल्हादाचे घर, नायगाव, शिरवळ, तळेगाव, शिरुर येथे शाळा.
- १६ नोव्हेंबर १८५२ मुंबई प्रांत गव्हर्नर मेजर कॅन्डीतर्फे पुरस्कार विश्रामबाग वाडा. (स्त्री शिक्षणाच्या कार्याबद्दल)
- १८५२ दलितांसाठी पहिले वाचनालय सुरू केले.
- १० सप्टेंबर १८५३ महार, मांग लोकास विद्या शिकवण्याकरिता मंडळी संस्था काढली.

- १८५४ स्कॉटीश मिशनऱ्यांच्या शाळेत अर्धवेळ पगारी शिक्षक म्हणुन नोकरी.
- १८५५ तुकाराम तात्या पडवळ यांच्या जातीभेद विवेकसाराच्या द्वितीय आवृत्तीचे उद्घाटन केले.
- १८५५ प्रौढ स्त्री-पुरुषांसाठी रात्रीची शाळा सुरू केली.
- १८५५ तृतीय रत्न - पहिले नाटक लिहीले.
- १८५६ सनातनी ब्राह्मणांनी धोंडीराम महादेव कुंभार व सज्जन रोडे यांना फूलेंना मारण्याची १०००/- सुपारी दिली.
- १८५६ फूलेंना संपविण्याची सुपारी घेतलेले रोडे हे अंगरक्षक बनले तर धोंडीबा कुंभार सत्यशोधक समाजाचे आधरस्तंभ बनले.
- **१८५७ च्या उठावास -**
  १) भट पंडयांचे बंड २) फोर्तूशी चपाती बंड
  अशा शब्दात गौरव केला.
- १८६३ बालहत्त्या प्रतिबंधक गृह स्थापना - पंढरपूर
- १८६४ पहिला पूनर्विवाह - ८ मार्च १८६४
  गोखलेंच्या बागेत शेणवी जातीतील १८ वर्षाच्या विधवेचा पूनर्विवाह झाला.
- १८६५ केशवपणाची प्रथा बंद करण्यासाठी नाव्यांचा संप - तळेगाव, ढमढेरे
- १८६७ रायगडावरती शिवाजी महाराजांची समाधी शोधून जीर्णोद्धार केले व समाधीची व्यवस्था सरकारने स्वत:कडे घ्यावी असा अर्ज.
- १८६८ अस्पृश्यांसाठी स्वत:ची विहीर दिली.
  गोंविदराव यांचे निधन झाले. (१८६८)
- १८६९ : १) ब्राह्मणांचे कसब हा ग्रंथ लिहिला. प्रस्तावना बाबा पद्मनजी यांनी लिहिली.
  २) शिवाजी महाराजांचा पोवाडा - यात स्वत:चा उल्लेख कूळवाडी भूषण असा केला.
  ३) अखंडवादी काव्यरचना
- १८७३ गुलामगिरी हा ग्रंथ लिहिला (प्रश्नोत्तराच्या स्वरूपात)
- २४ सप्टेंबर १८७३ - सत्यशोधक समाजाची स्थापना - पुणे
  ब्रिद वाक्य - सर्वसाक्ष जगत्पती । त्याला नकोच मध्यस्थी ।
- या समाजाच्या पद्धतीने पहिला विवाह - २५ डिसेंबर १८७३ (सिताराम आल्हाट व राधाबाई निंबकर)
- १८७३ : १) मजुरांना बोनस मिळण्याची प्रथा सुरू
  २) अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा प्रसिद्ध
  ३) काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवेची १८६५ मध्ये प्रसूती झाली, तिच्या मुलाला १८७३ मध्ये दत्तक घेतले.
- ५ जून १८७५ न्या. रानडे यांनी ज्योतीबा फुलेंच्या सहकार्याने पुण्यात स्वामी दयानंद यांची हत्तीवरून मिरवणूक काढली.
- १८७७ सक्तीच्या शिक्षणाचा ठराव मांडला.
  व्हिक्टोरिया अनाथ आश्रम सुरू केले.
  दिनबंधू वृत्त सुरू केले.
  दुष्काळ पिडीतांना मदत करण्यास पुढाकार.
- १८ जुलै १८८० : मद्यपानास विरोध
  - पुण्यातील मद्यपानगृहात वाढ करण्याच्या सरकारी धोरणास विरोध करणारे पत्र पुणे नगर पालिकेच्या कार्यकारी मंडळ अध्यक्षाला लिहिले.
  - पालिकेला दारू गुत्त्यांवर कर बसविण्यास सांगितले.
- १८८० नारायण मे. लोखंडे यांनी बॉम्बे मिल असोसिएशनची स्थापना केली.

- १६ नोव्हेंबर १८८२ स्त्री शिक्षणाचे आद्यजनक म्हणून ब्रिटिश सरकारने गौरव केला.
- १८७६-१८८२ पुणे नगरपालिकेचे सदस्य होते.
- ३ फेब्रुवारी १८८२ विल्यम हंटर अध्यक्षतेत आयोग नियुक्त केला.
- १९ ऑक्टोबर १८८२ हंटर आयोगाला शिक्षणाच्या बाबतीत सविस्तर निवेदन.
- जुलै १८८८ अर्धांगवायूचा झटका आला. (डॉ.विश्राम रामजी घोले यांनी उपचार केला.)
- १८८३ : १) अस्पृश्यांची कैफीयत ग्रंथ लिहिला २) शेतकऱ्यांचा असूड
- १८८५ सुधारणेचे झाड हे चित्र तयार करून हजारो प्रती शेतकऱ्यांना फूकट वाटल्या.
- १८८५ : १) इशारा पुस्तक लिहिले. २) सत्सार १, २ - ब्राह्मो व प्रार्थना समाजावरील टिका
- १९ जुलै १८८७ स्वत:चे मृत्यूपत्र तयार केले.
- २ मार्च १८८८ व्हिक्टोरिया राणीचा पूत्र ड्यूक कॅनॉट यांना प्राथमिक शिक्षण देण्याची मागणी. दिनबंधू - वृत्तपत्र
- १ मे १८८८ मुंबई मांडवी, कोळीवाडा हॉलमध्ये त्यांना लोकांनी महात्मा पदवी दिली.
- १ एप्रिल १८८९ खतपोडीचे बंड हा ग्रंथ पूर्ण केला.
- १८८९ पोवाडा विद्याखात्यातील ब्राह्मण पंतोजी चे प्रकाशन केले.
- मुंबई काँग्रेसच्या ५ व्या अधिवेशनात सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी प्रवेशद्वारावर ३० फूट गवताचा शेतकऱ्याचा पूतळा तयार केला.
- १८८९ राष्ट्रीय सभेत शेतकऱ्यांना समावून घेण्याचा अधिकार मागितला.
- १८८९ सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला.
- २८ नोव्हेंबर १८९० मृत्यू झाला.
- ३ डिसेंबर २००३ संसदेच्या प्रारंगणात फूलेंच्या पूर्णाकृती पूतळ्याचे अनावरण करण्यात आले.
- फूलेंच्या मते शेतकऱ्यांचे ३ शत्रू - १) भिक्षूकशाही, २) नोकरशाही, ३) सावकारशाही

- **ज्योतिबांविषयीचे गौरव :**

१) राजर्षी शाहू - महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर किंग

२) महर्षी वि. रा. शिंदे - १) पतितांचा पालनवाला २) अद्य दलितोद्धारक

३) सयाजीराव गायकवाड - हिंदूस्थानचा वॉशिंग्टन

४) लक्ष्मणशास्त्राी जोशी - महात्मा फूले हे सामाजिक गुलामगिरी विरूद्ध बंड करणारे पहिले पुरुष.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - त्यांना Who were the Shudras? हा ग्रंथ फूलेंना अर्पण केला.

६) रा. पंढरीनाथ पाटील - महाराष्ट्रातील पहिला सोशॅलिस्ट

७) महर्षी शिंदे - रानफळाची उपमा

८) माधव बागल - कार्लमार्क्स महाराष्ट्राचे

९) महात्मा गांधी - खरे महात्मा ज्योतीबा फूले आहेत.

१०)वि. रा. शिंदे - ज्योतीबा फूले हे रशियन क्रांतीपूर्वीचे पहिले कम्यूनिस्ट होते. रशियन क्रांतीकारक व ज्योतीबांत फरक एवढाच की, एकात अंत:श्रद्धा होती तर एकीकडे बाह्यभूक होती.

११)लक्ष्मणशास्त्री जोशी - हिंदू समाजातील बहूजन समाजाला जागृत व आत्मावलोकन करायला लागणारा पहिला माणूस.

१२) धनंजय किर - (म. फूलेंचे परिपत्रकार) - ज्योतीबांचे नाव ज्योती आणि ज्योती म्हणजे ज्या ज्योतीने समता, मानवता, विवेकवाद यावर प्रकाश टाकून राष्ट्रास खरा मार्ग दाखविला.

१३) धनंजय किर व स. ग. मालशे -

१) महात्मा फूले समग्र वाङमय
२) भारतीय समाजक्रांतीचे जनक
३) भारतीय सामान्य जनतेच्या नवयुगाचा प्रेशीत

- सार्वजनिक सत्यधर्म हे पुस्तक म्हणजे सत्यशोधक समाजाचे बायबल होय.
- **महात्मा फूलेंचे संदेश -**

१) ज्योतीने ज्योत लावा, एक निरक्षर साक्षर करा.
२) श्वान हिच शक्ती, शहाणपणाचे अंती सर्व आहे.
सरकारवर टिका करताना : प्रजेचे हीत पहात नाही तो राजा कसला?
पंडिता रमाबाईंचा गौरव : १) सत्‌शील २) सत्याशोधक साध्विनी

फूलेंचे समकालीन टिकाकार : विष्णुशास्त्री चिपळूनकर - शूद्र जगद्‌गुरू व क्षुद्र धर्मसंस्थापक

- ब्रिटीश सरकारने दक्षिणा प्राईज फंडद्वारे म. फुलेंच्या शिक्षण कार्यासाठी मदत केली.

## २. राजर्षी शाहू महाराज (२६ जून १८७४ ते ६ मे १९२२)

शाहू महाराजांना शेतकऱ्यांचा राजा, कष्टकऱ्यांचा राजा, कुस्तीकरांचा राजा, भारतीय वसतीगृहाचे जनक, आरक्षणाचे जनक म्हणून ओळखले जाते.

**जन्म :** २६ जून १८७४ (सामाजिक न्याय दिवस)
**जन्मगाव :** कोल्हापूर (कागलच्या जहागिरीत), लक्ष्मी विलास राजवाडा
**आईचे नाव :** राधाबाई
**वडिल :** जयसिंगराव घाटगे
**संपूर्ण नाव :** यशवंत जयसिंगराव घाटगे
**पत्नी :** लक्ष्मीबाई साहेब

- १८७६ शाहू महाराजांच्या लहान भावाचा (बापूसाहेबांचा) जन्म.
- १८७७ राधाबाईचे निधन
- १८८३ चौथे शिवाजी (नारायणराव) यांचे निपुत्रिक निधन. (अहमदनगरच्या तुरुंगात)
- १७ मार्च १८८४ रोजी चौथ्या शिवाजींच्या पत्नी आनंदीबाई यांनी जयसिंगराव घाटगे (आबासाहेब) यांचे जेष्ठ चिरंजीव यशवंत यास दत्तक घेतले त्यावेळी त्यांचे वय १० वर्षे होते.
- १८८४ राजकोट येथील राजकुमार विद्यालयात व धारवाड येथे शिक्षण. त्यांचसोबत बुवासाहेब इंगळे हे क्रिडापटू होते.
  - सर फ्रेंजर व रघुनाथराव सबनीस हे गुरू.
- २० मार्च १८८६ आबासाहेब यांचे निधन (३० व्या वर्षी)
- ८ मे १८८८ शाहूंच्या हस्ते कोल्हापूर - मीरज रेल्वेमार्गाची पायाभरणी (१८९१ पासून हा मार्ग सुरू)
- १८८६-८९ दत्तोबा शिंदे व पांडू भोसले यांच्याकडून मल्ल विद्या शिकले.
- १८८९-९३ स्टुअर्ट फ्रेझर यांच्या मार्गदर्शनाखाली धारवाड येथे प्रशिक्षण.
- १ एप्रिल १८९१ बडोद्याच्या गुणाजी खानवीलकर यांची लक्ष्मीबाई या कन्येशी विवाह.
  - दोन मुले एक राजाराम, दुसरा - शिवाजी
  - दोन मुली एक राधाबाई, दुसरी - आऊबाई
- १८९१ गव्हर्नर लॉर्ड हेरिस यांच्या हस्ते कोल्हापूर-मिरज रेल्वेमार्गाचे उद्‌घाटन.
- १८९३ शाहू महाराजांचे देशी शिक्षक म्हणून रघुनाथ सबनीस यांची निवड.

- १० मार्च १८९४ शाहू महाराजांना कन्यारत्न (मुलीचे नाव - राधाबाई)
- २ एप्रिल १८९४ शाहू महाराजांचा राज्यभिषेक (त्या वेळेस त्यांच्या दरबारी लॉर्ड हॅरिस हा ब्रिटीशांचा राजनैतिक प्रतिनिधी म्हणुन काम पाहत होता.)
- १८९४ जनकल्यानकारी प्रथम जाहीरनामा काढला.
  - वेठबिगारी पद्धत कोल्हापूर संस्थानात बंद
  - रघुनाथ सबणीस यांची चिटणीस म्हणून निवड.
- **१८९५ :** १) मोतीबाग येथे कुस्तीकरांसाठी तालीम सुरू केली.
  २) शाहुपूरी येथे गुळाची बाजारपेठ सुरू केली.
  ३) गव्हर्नर जनरलने आरोपीला फाशीची शिक्षा देण्याचे अधिकार शाहू महाराजांना दिले.
- १८९५ सौ. राधाबाई केळकर यांची स्त्री शिक्षण खात्याच्या अधिक्षिका म्हणून नेमणूक.
- **१८९६ :**
  १) व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग या पहिल्या वसतीगृहाची स्थापना.
  २) अहिल्याबाई यांच्या स्मरणार्थ कोल्हापूरमध्ये देशी दवाखाना चालू केला.
- **१८९७ :**
  १) शाहू महाराजांना पुत्ररत्न (मुलाचे नाव - राजाराम)
  २) कर्नल रे यांची राजनैतीक प्रतिनिधी म्हणून कोल्हापूरमध्ये निवड.
- १८९९ वेदोक्त प्रकरण - पंडित राजाराम शास्त्री / नारायण भट्ट यांच्याकडून वेदोक्त मंत्राऐवजी पुरणोक्त मंत्र पठन यावरून वादांग.
- १८९९ केंब्रीज विद्यापीठाने शाहू महाराजांचा सन्मान व डॉक्टर ऑफ ही मानद पदवी दिली.
- १९०० महाराणी व्हिक्टोरियाने शाहू महाराजांना महाराज ही पदवी दिली.
- **१९०१ :**
  १) कोल्हापूर संस्थानात गोवंश हत्या बंदी कायदा केला.
  २) महाराणी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग सुरू केले.
  ३) दिगंबर जैन वसतीगृह सुरू केले.
- १९०२ मागासलेल्या जाती जमातींसाठी सरकारी नोकरीत ५० टक्के राखील जागा घोषित करणारे भारतातील प्रथम संस्थान.
- १९०२ शाहू महाराज राजा एडवर्डच्या राज्यारोहण कार्यक्रमासाठी इंग्लडला गेले.
- १९०२ सार्वजनिक पाटबंधारे धोरण जाहीर करणारे प्रथम संस्थानिक.
- १९०४ भास्कर जाधव यांची कोल्हापूर जाहीर करणारे अधिक्षक म्हणून नियुक्ती (भास्कर जाधव यांनी १८९५ मध्ये सहाय्यक सुभा म्हणुनही काम केले होते.)
- **१९०६ :**
  १) शाहू स्पिनिंग ॲन्ड विव्हिंग मिलची पायाभरणी
  २) द किंग एडवर्ड मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना
  ३) मुस्लिम समाजातील मुलांसाठीचे वसतृगृह सुरू केले.
- **१९०७ :**
  १) सहकारी तत्त्वावर शाहू कापड मिलची स्थापना.
  २) वीरशैव लिंगायत वसतीगृहाची स्थापना.
  ३) भोगावती नदीवर राधानगरी धरणाची पायाभरणी त्यास महाराणी लक्ष्मी तलाव असे नाव देण्यात आले.
- **१९०८ :**

१) अस्पृश्यांसाठी मिस क्लार्क वसतीगृहाची स्थापना २) राधाबाई यांचे विवाह
- या विवाहाच्या स्मरणार्थ कोल्हापूरमध्ये सभामंडप बांधण्यात आला.
- राधानगरी हे गाव वसविले.

- १९०८ राधानगरी धरण बांधले. श्रीमंत बापुसाहेब महाराज यांच्या नियंत्रणाखाली.
  (या धरणाच्या सागराचे नाव - लक्ष्मीबाई सागर)
- १९११ कोल्हापूर येथे सत्यशोधक समाजाची स्थापना.
- **१९१२ :**
  १) पाटील शाळा सुरू केल्या.
  २) खासबाग येथे तालीम सुरू केली.
  ३) पांचाळ ब्राह्मण वसतीगृह, कायस्थ प्रभू वसतीगृह व सारस्वत बोर्डिंग हे वसतीगृह सुरू केले.
- **१९१३ :**
  १) सत्यशोधक समजाची पहिली शाळा कोल्हापूरमध्ये सुरु केली.
  २) अर्बन-को-ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना कोल्हापूरमध्ये केली.
- १९१४ - कोल्हापूर येथे औद्योगिक व शेतकी प्रदर्शनाचे उद्‌घाटन
- १९१५ इंडियन ख्रिश्चन वसतीगृहाची स्थापना
- १९१६ - डेक्कन रयत शिक्षण संस्थेची स्थापना निपानी येथे केली.
- **१९१७ :**
  १) कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याची घोषणा केली व मोफत सुद्धा.
  २) डॉ. कुर्तकोटी यांची कर्मवीर पीठाचे शंकराचार्य म्हणून नेमणूक.
  ३) विधवा पुनर्विवाह कायदा व विवाह नोंदणी कायदा यांच्या अंमलबजावणीस सुरूवात.
  ४) खामगाव येथील ११ व्या मराठा शिक्षण परिषदेचे अध्यक्ष.
- **१९१८ :**
  १) कोल्हापूर येथे आर्य समाजाची स्थापना.
  २) कोल्हापूर संस्थानात बलुतेदारी पद्धत बंद करण्यात आली.
  ३) आंतरजातीय विवाह कायदा केला.
  ४) कुलकर्णी वतने रद्द केली.
  ५) तलाठी शाळा सुरू केल्या.
  ६) शाहु महाराजांचे दुसरे चिरंजीव शिवाजी यांचे निधन.
  ७) राजाराज कॉलेजची स्थापना.
- **१९१९ :**
  १) कानपूर येथील १३ व्या आखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय परिषदेचे अध्यक्ष येथे त्यांना राजर्षी पदवीने सन्मानित केले.
  २) स्त्री अत्याचार प्रतिबंधक व घटस्फोट मान्यता कायदा मंजुर.
  ३) वैदिक शाळा स्थापन.
- **१९२० :**
  १) जोगिणी देवदासी निर्मूलन कायदा संमत.
  २) हुबई येथील ब्राह्मणेत्तर समाज परिषदेचे अध्यक्ष.
  ३) छात्रजगद्‌गुरु म्हणून सदाशिवराव पाटील यांची नियुक्ती.
  ४) पुणे येथे शिवाजी सोसायटीची वार्षिक सभा भवानी पेठेतील विठ्ठल धर्मशाळेत शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली.
- **शाहु महाराजांनी आर्थिक सहाय्य केलेली वृत्तपत्रे -**

१) संजीवन - दत्तात्रय भिकाजी रणदिवे ब्राह्मणेत्तर चळवळीचे (साप्ताहिक)
२) शिवछत्रपती (दैनिक) किर्तीवान निंबाळकर
३) मुकनायक - डॉ. आंबेडकर, डेक्कर रयत (इंग्रजी साप्ताहिक कोठारी व लट्ठे)
४) राष्ट्रवीर - साप्ताहिक ५) संदेश - साप्ताहिक

- ६ मे १९२२ शाहु महाराजांचा मृत्यू (मुंबई)
- **शाहु महाराजांबद्दल काढलेले उद्गार :**

१) ''सर्वांगीण युगपुरुष'' - वि. रा. शिंदे
२) ''छत्रपती शाहु महाराजासारखा सखा राजा यापूर्वी आम्हा दलितांना कधी लाभला नाही व यापुढेही लाभणार नाही'' - डॉ. बाबासाहेब आंबेडकर
३) He was a king But democretic king - माधवजी बागल

- **शाहु महाराजांनी काढलेले उद्गार :**

१) माझी जनता फक्त इयत्ता ३ री उत्तीर्ण झाली तरी मी माझे संपूर्ण राज्य तिच्या स्वाधीन करेन.
२) कामगारांनो संघटीत व्हा, हे संघटनेचे युग आहे.

- **राजब्रिदवाक्य -** जय भवाणी
- **छत्रपती शाहु महाराजांची कोल्हापूर शहरातील २३ वसतीगृहे :**

१) व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग (१९०१)
२) दिगंबर जैन बोर्डिंग (१९०१)
३) वीरशैव लिंगायत बोर्डिंग (१९०७)
४) पांचाळ ब्राह्मण वसतीगृह (१९१२)
५) कायस्थ प्रमू वसतीगृह (१९१२)
६) सारस्वत बोर्डिंग (१९१२)
७) इंडियन ख्रिश्चन वसतीगृह (१९१५)
८) देवज्ञ बोर्डिंग (१९१६)
९) वैश्य हॉस्टेल (१९१८)
१०) आर्य समाज हॉस्टेल (१९१८)
११) ठोर चांभार हॉस्टेल (१९१९)
१२) श्री नामदेव बोर्डिंग (१९१९)
१३) शिवाजी वैदिक बोर्डिंग (१९२०)
१४) सोमवंशीय आर्य क्षत्रिय बोर्डिंग (१९२०)
१५) सुतार बोर्डिंग (१९२१)
१६) नाभीक विद्यार्थी बोर्डिंग (१९२१)
१७) देवांग बोर्डिंग हाऊस (१९२१)
१८) भोई समाज बोर्डिंग (१९२१)
१९) राजपुतवाडी बोर्डिंग (१९२१)
२०) रुकडी बोर्डिंग (१९२१)
२१) मुस्लीम बोर्डिंग (१९२१)
२२) इंदुमती बोर्डिंग
२३) भिसे क्लार्क बोर्डिंग (महार, मांग, ढोर, चांभार मुलांसाठी)

## ३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१-१९५६)

**जन्म** : १४ एप्रिल १८९१
**जन्मठिकाण** : महु, इंदुर जिल्हा, मध्यप्रदेश
**मुळनाव** : भीमराव रामजी सपकाळ उर्फ आंबवडे
**जन्माच्या वेळी नाव** : भीवा (भीमराव आई वडिलांचे १४ वे आपत्ये)
**टोपन नाव** : बाबासाहेब, बोधिसत्व, भीमा, भिवा, भीम
**कुटूंब** : त्या काळी अस्पृश्य म्हणुन गणल्या गेलेल्या महार जातीचे.
**मुळचे** : रत्नागिरी (महाराष्ट्रातील) जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात, असलेल्या आंबडवे गावचे (कोणतील लोक पूर्वी आपले आडनाव आपल्या गावाच्या नावावरून ठेवत असे व त्यात शेवटी (उपसर्ग) कर शब्द जोडण्याचा प्रघात, त्यामुळे सपकाळ असताना आंबवडेकर नाव नोंदविले.) ७ नोव्हेंबर १९००
**वडील** : रामजी मालोजी सपकाळ
**आई** : भीमाबाई रामजी सपकाळ
**पत्नी** : रमाबाई आंबेडकर, डॉ. सविता आंबेडकर
**आपत्य** : यशवंत आंबेडकर

- १८९६ - ५ वर्षाचे असताना आई भीमाबाईचे निधन (मस्तकशुळ आजाराने) (संगोपण आत्या मीराबाईंनी केले.)
- नोव्हेंबर १८९६ - सातारा येथील कॅम्प स्कुल मध्ये भीमरावांचे नाव दाखल.
- १८९६ - कुटूंबाने दापोली सोडली व सातारा येथे स्थायिक झाले.
- १८९८ - पिता रामजींनी दुसरे लग्न केले व कुटूंब मुंबईला स्थायिक.
- १९०६ - दापोलीच्या ९ वर्षीय रमाबाई यांच्याबरोबर लग्न.
- १९०७ - मुंबईच्या एल्फिस्टन्स हायस्कुलमधून मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण.
- १९१२-१३ - एल्फिस्टन कॉलेजमधून पार्शियन व इंग्रजी घेऊन बी. ए. झाले. (बडोदा संस्थानात नोकरीसाठी रुजू झाले.) याच वर्षी यशवंत हा मुलगा झाला.
- २ फेब्रुवारी १९१३ - वडील रामजी बाबांचे मुंबईमध्ये निधन झाले.
- जून १९१३ - बडोदा नरेश सयाजीराव गायकवाडांकडून प्रति महिने २५ रूपये शिष्यवृत्ती घेऊन अमेरिकेला कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रयाण केले.
  (मुंबई विद्यापीठाची बी. ए. ची पदवी संपादन करणारे अस्पृश्य वर्गातील पहिला विद्यार्थी होण्याचा मान आंबेडकरांना मिळाला. बडोदा संस्थानाने परदेशात अभ्यास करण्यासाठी शिष्यवृत्ती)
- २० जुलै १९१३ - अमेरिकेतील न्युयार्क येथे बोटीने प्रवास करून पोहोचले.
- १९१३-१६ - अर्थशास्त्र शाखेत प्रवेश (प्रमुख विषय अर्थशास्त्र व इतर समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र आणि तत्त्वज्ञान इ. विषय निवडले.)
- १५ मे १९१५ - ॲडमिशन ॲन्ड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी हा प्रबंध सादर केला.
- २ जून १९१५ - रोजी या प्रबंधाच्या आधारावर त्यांना एम. ए. पदवी मिळाली. (याच काळात लाला लजपतराय यांच्याशी ओळख.)
- १९१३-१७ - भारताचा राष्ट्रीय लाभांश इतिहासात्मक आणि विश्लेषणात्मक अध्ययन हा पी. एच. डी. साठीचा प्रबंध लिहिला व पी. एच. डी. संपादन केली.
  (प्रा. सेलिग्मन आंबेडकरांचे पी. एच. डी. साठीचे मार्गदर्शक)
- १९१६ - लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स व पॉलिटिकल सायन्समध्ये प्रवेश घेण्यासाठी लंडनला आले.

- जून १९१७ - बडोदे महाराजांच्या शिष्यवृत्तीची मुदत संपली म्हणुन हिंदुस्थानास परत, त्यापूर्वी लंडन विद्यापीठात एम. एस. सी. परीक्षेसाठी एक वर्ष अभ्यास.
- १९१७ - मुंबईत वर्स कॉलेज या खाजगी व्यापारी शिक्षण संस्थेत काही काळ अर्थशास्त्र, बँकिंग व कायदा या विषयांचे अध्यापन.
- जुलै १९१७ - बडोदे येथे सयाजीराव महाराज यांचे मिलिटरी सेक्रेटरी म्हणून नेमणूक, परंतु थोड्याच दिवसात या नोकरीचा राजीनामा.
- नोव्हें. १९१८ - मुंबई येथील सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स येथे प्राध्यापक म्हणुन नेमणुक झाली. साऊथबेरो कमिटीसमोर साक्ष अस्पृश्यांना प्रांतातील कौन्सिलमध्ये स्वतंत्र प्रतिनिधीत्व असावे असा विचार सर्वप्रथम मांडला.
- ३१ जाने १९२० - मुकनायक हे पाक्षिक वृत्तपत्र सुरू केले. शाहू महाराजांनी त्यांना २००० रूपयेची आर्थिक मदत केली.
- ५ जुलै १९२० लंडन येथील अपुरा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी सिडनेहॅम कॉलेजमधील प्राध्यापकाच्या पदाचा राजीनामा.
- ३० सप्टेंबर १९२० - लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स या संस्थेत मास्टर ऑफ सायन्ससाठी प्रवेश मिळविला.
- १९२० - हुबळी (कर्नाटक) येथे झालेल्या ब्राम्हणेत्तर परिषदेचे अध्यक्ष.
- सप्टें. १९२० - लंडन विद्यापीठामध्ये नाव दाखल केले, कोल्हापूर संस्थानातील माणगांव येथे यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची मोठी परिषद भरली यावेळी छत्रपती शाहू महाराज उपस्थित होते. नागपूर येथे छत्रपती शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय अस्पृश्य परिषद कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्याशी असलेले वैचारीक मतभेद स्पष्ट झाले.
- २० जून १९२१ - मास्टर ऑफ सायन्स ही पदवी प्रदान केली.
  विषय - Provincial decentralisation of Imperial finance in British India.
- २८ जून १९२२ - ग्रेज - इन संस्थेने त्यांना बॅरिस्टर ॲट लॉ ही वकिलीची पदवी दिली.
- ऑक्टो. १९२२ - लंडन विद्यापीठाने त्यांनी सादर केलेला प्रबंध स्वीकारल्याने लंडन विद्यापीठाची डी. एससी. पदवी मिळविणारे पहिले भारतीय बनले.
  विषय - The problem of the rupee - Its origin and its solutions. हाच प्रबंध १९४७ साली History at Indian currency and Banking म्हणुन प्रसिद्ध झाला.
- एप्रिल १९२३ - मायदेशाला परत, जून - मुंबई येथे हायकोर्टामध्ये वकिलीस सुरूवात.
- नोव्हेंबर १९२३ - लंडन विद्यापीठाकडून डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी बहाल केली.
- २० जुलै १९२४ - मुंबई येथे बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना. ब्रिद वाक्य - शिका, संघटित व्हा, संघर्ष करा
- १९२४ - भारतातील जाती (ग्रंथ)
- या सभेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सचिव - सीताराम शिवतरकर
- उद्देश - अस्पृश्यात नवजागृती करणे व त्यांची शैक्षणिक प्रगती साधणे.
- बहिष्कृत हितकरिणी सभेच्या माध्यमातून अस्पृश्यांसाठी वाचनालये, प्रौढ रात्रशाळा सुरू करण्यात आल्या.
- १९२६ - मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाचे सदस्य म्हणून नियुक्ती (१९२६-१९३६)
- ऑक्टोंबर १९२६ - ब्राह्मनांविरोधी च्या खटल्यात केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर यांच्या बाजुने लढून विजय. (फिर्यादीच्या बाजुने पुण्यातील वकिल एल. बी. भोपटकर होते.)
- १९ व २० मार्च १९२७ - महाड येथे कुलाबा परिषद भरविली. अध्यक्ष - डॉ. बाबासाहेब आंबेडकर
- २० मार्च १९२७ रत्नागिरी जिल्ह्यातील महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह.

(नंतर महाडच्या महानगर पालिकेने अस्पृश्यांना चवदार तळे खुले केल्याचा ठरावही रद्द केला.)

- एप्रिल १९२७ - बहिष्कृत भारत पाक्षिक सुरू.
- २६ जून १९२७ - अंबादेवी मंदीर सत्याग्रह डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नेतृत्त्वाखाली झाला.
- २५ डिसेंबर १९२७ - मनस्मृतीचे दहन (या घटनेची तुलना मार्टिन ल्युथरने केलेल्या पोपच्या (ख्रिश्चन धर्मगुरू) धर्मबहिष्कृततेच्या आज्ञेच्या दहनाशी केली आहे. २५ डिसेंबर - मनुस्मृती दहन दिन म्हणुन तेव्हापासून मानला जातो.)
- मे १९२८ - इंडियन स्टॅट्युटरी कमिशन (सायमन कमिशन) समोर साक्ष.
- १४ जून १९२८ - दलित शिक्षण संस्थेची स्थापना.
- जून १९२८ - मुंबई येथील सरकारी लॉ. कॉलेजमध्ये प्राध्यापक, मुंबई प्रांत कमिटीचे सभासद.
- १९२८ - महारांची गुलामगिरी नष्ट करण्यासाठी मुंबई कायदेमंडळात महार वतन बिल मांडले.
- १९२८ - बॉम्बे प्रेसिडेन्सी कमिटीवर आंबेडकारांची नेमणुक त्यांनी सायमन कमिशन बरोबर काम केले. (नदीच्या खोऱ्यातील पाण्याच्या नियोजनाची योजना सादर केली ही योजना दामोदर खोरे परियोजना म्हणुन ओळखली जाते. आपल्या शासनाने १९९६ मध्ये कृष्णा, गोदावरी, तापी, नर्मदा अशी खोऱ्यांची विभागणी केली.)
- १९२८-१९३४ - चरी (रायगड) गावात शेतकऱ्यांचा पहिला संप, हा संप ७ वर्षे सुरू होता त्यांनी खोती पद्धत नष्ट करण्यासाठी संघर्ष केला.
- ४ जानेवारी १९२८ - च्या टाईम्स ऑफ इंडियात इंदुर संस्थानात अनुसुचीत जातींना मिळणाऱ्या वाईट वागणुकीबद्दल वृत्तांत आला होता, त्याची तुलना डॉ. बाबासाहेब यांना १८ व्या शतकातील पेशवाईतील स्थितीशी केली.
- ९ जून १९२८ - समता हे वृत्तपत्र. (समाज समता संघाचे मुखपत्र होते.)
- १४ एप्रिल १९२९ - रत्नागिरी येथील चिपळून येथे जिल्हा शेतकरी परिषद आयोजित. या परिषदेत कोकणातील खोदीदारी विरूद्ध शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू केले.
- १३ ऑक्टो. १९२९ - पार्वती मंदिर सत्याग्रह
- २४ फेब्रु. १९३० - जनता वृत्तपत्र
- २ मार्च १९३० - नाशिक या ठिकाणी ८००० महार सत्याग्रहींनी काळाराम मंदिर सत्याग्रह यशस्वी केला.
- ८ ऑगस्ट १९३० - मागासवर्गीयांच्या सभेमध्ये डॉ. आंबेडकरांनी आपला राजकीय दृष्टीकोन जगासमोर ठेवला व मागाासवर्गीयांनी काँग्रेस व ब्रिटीश यांपासून स्वतंत्र झाल्याशिवाय ते सुरक्षित होणार नाहीत सुचविले व मिठाच्या सत्याग्रहाचा समाचार घेतला.
- ७ सप्टेंबर १९३० - दुसऱ्या गोलमेज परिषदेत हजर राहून अस्पृश्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात जागा मिळाव्या यासाठी प्रयत्न.
- १९३०-३२ - गोलमेज परिषदेत मागासवर्गीयांचे प्रतिनिधी म्हणून हजर
- २६ सप्टेंबर १९३२ - पुणे करारावर सही. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघाऐजवी संयुक्त मतदार संघ मिळाले.
- जून १९३५ - सरकारी लॉ कॉलेजमध्ये प्राचार्य, कायदेशास्त्राचे पेरी प्राध्यापक होते.
- सप्टें १९३५ - येवला येथे हिंदूधर्म सोडण्याचा निर्णय जाहीर केला. या वेळी त्यांनी मी जरी हिंदू म्हणुन जन्मलो असलो तरी हिंदू म्हणुन मरणार नाही. असे जाहीर केले.
- जानेवारी १९३६ - मुंबई प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीवर सभासद म्हणुन निवडून आले.
- १३ व १४ एप्रिल १९३६ - अमृतसर येथे शिख मिशनरी परिषद भरली होती.
- १५ ऑगस्ट १९३६ - स्वतंत्र्य मजुर पक्षाची स्थापना या पक्षाने १९३७ च्या प्रांतिक निवडणुकीत १३ जागा जिंकल्या.
- १८ सप्टेंबर १९३६ - शिख धर्माच्या अभ्यास करण्यासाठी अमृतसरला गेले.
- १९३७-३८ - ॲनिहिलेशन ऑफ कास्ट (ग्रंथ)
- १७ फेब्रु १९३७ - मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीत त्यांच्या अथक प्रयत्नामुळे या पक्षाचे १५ उमेदवार निवडून आले.

- १७ सप्टेंबर १९३७ - खोती पद्धत नष्ट करणाऱ्या कायद्याचे विधेयक मुंबई विधीमंडळात मांडले.
- १९४० - पाकिस्तानविषयी विचार (थॉट्स ऑन पाकिस्तान) ग्रंथ
- १० जानेवारी १९३८ - २५००० शेतकऱ्यांचा मोर्चा विधीमंडळावर गेला (आंबेडकरा समवेत)
  (सप्टेंबर १९१८ शेतजमिनीच्या समस्येवर शोधनिबंध एका प्रकाशित मासिकेत प्रकाशित केला तसेच आंबेडकरांनी पीक विमा पद्धत सुचविली.)
- २० डिसेंबर १९४१ - १९४१ पासून सर्वप्रथम स्वत: बाबासाहेब जय भिम लिहू लागले. - आधुनिक भारतातील प्रथम समतावादी पुरूष हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.
- १९४२ पासून बौद्ध जयंती दिनी सार्वजनिक सुट्टी असावी अशी मागणी.
- जुलै १९४२ - ऑल इंडिया शेड्युल कास्ट फेडरेशनची स्थापना
- जुलै १९४२ - गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सील वर मजुरमंत्री म्हणुन नेमणुक.
- १९४३ - रानडे, गांधी आणि जीना (ग्रंथ)
- १९४४ - आम्ही शासनकर्ती जमात बनणार ! जनता वृत्तपत्रात लेख लिहीला.
- १९४५ - काँग्रेस आणि गांधी यांनी अस्पृश्य वर्गास कसे वागविले ? (ग्रंथ)
- १९४५ - धर्मांतरापूर्वी मुंबईत सिद्धार्थ कॉलेज स्थापन केले.
- जुलै १९४५ - पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई - स्थापना
- १९४६ - शुद्र पूर्वी कोण होते? (हु वेअर द शुद्राज्) (ग्रंथ)
- १९४७ - कायदे मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक लोकसभेत मांडले.
- १९४८ - द अन्टचेबल (ग्रंथ)
- १९४८ - १५ एप्रिल - नवी दिल्ली : डॉ. शारदा कबीर सोबत विवाह (दुसरा)
  (विवाहानंतर शारदा कबीरांनी सविता आंबेडकर हे नाव स्वीकारले. १९३५ पहिली पत्नी रमाबाई यांचे दीर्घ आजाराने निधन)
- १९४२-१९४६ - मजुर मंत्री, व्हाईसरॉय, एक्सीकेटिव्ह कौंसिल
- १५ ऑगस्ट १९४७-१९५० - भारताचे पहिले कायदा व न्यायमंत्री
- २९ ऑगस्ट १९४७ - भारतीय संविधानातील मसुदा समितीचे अध्यक्ष.
- २६ नोव्हें. १९४९ - २ वर्षे ११ महिने १८ दिवसात संविधान लिहून सभेत सुपूर्द केले.
- २ मे १९५० - दिल्ली येथे पहिली सार्वजनिक बौद्ध जयंती साजरी केली.
- जून १९५० - औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यायलयाची स्थापना व परिसराला नागसेनवन असे नाव दिले.
- जुलै १९५१ - भारतीय बौद्धजन संघ स्थापना
- २७ सप्टें १९५१ - हिंदु कोड बिलास विरोध झाल्याने मंत्रीपद सोडले.
- १९५३ - महाराष्ट्रामध्ये बौद्ध जयंतीस सुरूवात.
- २७ मे १९५३ - रोजी केंद्रसरकारने बुद्ध जयंती निमित्त सार्वजनिक सुट्टी जाहिर केली.
- १९५५ - काठमांडू - नेपाळ येथे जागतिक बौद्ध परिषदेत बौद्ध भिक्कुंनी त्यांना बोधिसत्त्व ही उपाधी प्रदान केली. (दलाई लामा यांनाही आंबेडकरांना बोधिसत्त्व संबोधले होते.)
- मे १९५५ - भारतीय बौद्ध महासभा स्थापन.
- १९५५ - थॉटस् ऑन लिंग्विस्टिक स्टेट्स (ग्रंथ)
- १४ ऑक्टो. १९५६ - बौद्ध धर्म स्वीकारला (सम्राट अशोकाने याच दिवशी स्वीकारला होता.)
- १९५६ - आयुष्यातील शेवटची बुद्ध जयंती दिल्लीतच साजरी केली.
- मे १९५६ - सिद्धार्थ कॉलेज ऑफ लॉ, मुंबई - स्थापना. १४ ऑक्टोबर - नागपूर येथे बौद्ध धर्माचा स्वीकार.
- २० नोव्हेंबर १९५६ - नेपाळमधील काठमांडूला वर्ल फिलोशीप ऑफ बुद्धीस च्या चौथ्या परिषदेत हजर राहिले व

बुद्ध की कार्ल मार्क्स या विषयावर भाषण केले.

- ४ फेब्रुवारी १९५६ - प्रबुद्ध भारत (वृत्तपत्र)
- ६ डिसेंबर १९५६ - दिल्लीला निवासस्थानी त्यांचे महापरिनिर्वान झाले. तेव्हा त्यांचे वय ६४ वर्षे होते.
- १९५७ - त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अनुयायांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाची स्थापना केली.
- १९८७ - गंगाधर पानतावने यांनी भारतात पहिल्यांदा बाबासाहेबांच्या पत्रकारितेवर पी. एच. डी. साठी शोध प्रबंध लिहिला.
- १४ एप्रिल १९९० - मरणोत्तर भारतरत्न हा सर्वाच्च नागरी पुरस्कार दिला.
- २९ मे २००३ - माईसाहेब / माई / शारदा कबीर यांचे दिल्लीतील मेहरॉली येथे वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले.
- गांधी व अस्पृश्यजनांचे बंधविमोचन (ग्रंथ)
- बुद्ध व त्यांचा धम्म (बुद्ध ॲन्ड हिज धम्म) (ग्रंथ)
- १९१९ चा कायदा बनविण्याआधी १९१८ च्या साऊथ बरो कमिशनसमोर डॉ. आ. नी. निवेदन देऊन साक्ष दिली होती. त्यात ज्या मागण्या प्रामुख्याने बाबासाहेबांनी केल्या होत्या त्या १९१९ Montague - Chemsford सुधारणा कायद्यात समाविष्ट करण्यात आल्या होत्या.
- बाबासाहेब पश्चिम बंगाल प्रांतातून संविधान सभेवर निवडून आले होते.
- डॉ. बी. आर. आंबेडकर भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार होते. (के. आर. नारायण भारताचे तत्कालिन राष्ट्रपती)
- आंबेडकर भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार होते.
- संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष होते.
- भारतीय रिझर्व बँक ही आंबेडकरांनी हिलटन यंग कमिशनला सादर केलेल्या विचारांवर आधारित होती.
- बॅरिस्टर मोहम्मद अली जीना यांनी जयकरांमार्फत बाबासाहेबांनी इस्लाम धर्म स्वीकारावा, पाकिस्तानला यावे व पाकिस्तानचे गव्हर्नर व्हावे अशी ऑफर दिली.
- ख्रिश्चन, मुस्लीम, शिख, जैन, बौद्ध, यहुदी इ. धर्माच्या धर्मगुरुंनी त्यांना आपल्या धर्मात यावे यासाठी अमिषे दाखविली.
- मुंबई मधील त्यांच्या निवासस्थानाला राजगृह असे नाव दिले.
- त्यांचे गुरू गौतम बुद्ध, संत कबीर, महात्मा फुले.
- १९९०-१९९१ हे आंबेडकरांचे जन्म शताब्दी वर्ष सामाजिक न्याय वर्ष म्हणून पाळले गेले.
- डॉ. बाबासाहेबांचे मुंबई येथील समाधी स्थळ - चैत्यभूमी (दादर)
- **डॉ. बाबासाहेबांचे प्रसिद्ध वचने / विचार / त्यांच्याबद्दल :**

१) राजकिय सत्ता ही सामाजिक प्रगतीची गुरूकिल्ली आहे.

२) भाकरी पेक्षा इज्जत प्यारी.

३) देशाच्या स्वातंत्र्यासाठी रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढले पाहिजे.

४) भिक्षेने गुलामी मिळते, स्वातंत्र्य नाही.

५) आम्हाला सामाजिक व राजकीय गुलामगिरीतून मुक्त करा म्हणजे आम्ही तुमच्या खांद्याला खांदा लावुन राजकीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करतो.

६) राजकीय सत्तेच्या मोक्याच्या आणि महत्त्वाच्या जागा काबीज करा. आणि शासनकर्ती जमात बना. (दलित बांधवांना आवाहन)

७) जर माझ्या मनात द्वेश व सुडबुद्धी असती तर पाच वर्षाच्या आत मी या देशाचे वाटोळे केले असते.

८) तिरस्करणीय गुलामगिरी व अन्यायाच्या अमानुष गर्तेत पिचत पडलेल्या ज्या समाजात मी जन्मास आलो, त्या समाजाची गुलामगिरी नष्ट करण्यात मी अपयशी ठरलो तर स्वत:लाच गोळी घालीन.

९) Relegion is meant for man, but man is not meant for Relegion.

१०) वाचन मनाला अन्न पुरविते, या अन्नाचे चर्वन केले तरच ते पचते, अन्न पचते तरच बुद्धी प्रगत होते.
११) ३० मार्च १९२७ - महिलांना उद्देशुन तुमचा नवरा व मुले दारू प्यायली तर त्यांना जेवन देऊ नका.
१२) बौद्ध धर्माचे प्रज्ञा करूणा व समता ही तीन तत्त्वे स्वीकारली.
१३) दलित वर्णाला प्रोटेस्टंट हिंदू किंवा नॉन कॉनफॉर्मिस्ट म्हणा - अशी मागणी.
१४) दलितांचा मुक्तीदाता या शब्दात सयाजीराव गायकवाड यांनी त्यांचा गौरव केला.
१५) आंबेडकरांच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द म्हणजे पिस्तुलातून उडणारे बार आहे. असे डॉ. बेव्हरले निफोल्स यांनी त्यांचे वर्णन केले.
१६) आंबेडकरांमध्ये तुम्हाला तुमचा उद्धारकर्ता लाभलेला आहे ते तुमच्या बेड्या तोडून टाकतील याची मला खात्री आहे. असे उद्गार छत्रपती शाहू महाराजांनी माणगाव परिषदेमध्ये काढले.
१७) अस्पृश्यता एक लोकांची लहर आहे.
१८) शिका, संघटित व्हा, संघर्ष करा.
१९) मुकनायक व बहिष्कृत भारत या वृत्तपत्रांच्या शीर्षभागी अनुक्रमे संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर यांची वचने होती.
२०) आंबेडकरांना आधुनिक मनु म्हणतात.
२१) आंबेडकरांचा काश्मीरला असलेल्या ३७० या कलमास विरोध होता.
२२) दुसऱ्या महायुद्धात भारताने ब्रिटिशांना सहकार्य करावे असा मनोदय डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केला.
२३) भाषावार प्रांतरचनेबाबत डॉ. आंबेडकर फारसे उत्सुक नव्हते. त्यांच्या मते भाषावार प्रांतरचनेमुळे ऐक्य भावना वाढीस लागण्याऐवजी हिंदूस्थानचे अधिक तुकडे पडतील. मात्र प्रांतरचना केल्यास मुंबईचा संयुक्त महाराष्ट्रात समावेश करावा, असे निवेदन त्यांनी दार कमीशनला सादर केले.
२४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्तर - मध्य मुंबई या राखीव मतदार संघातून पराभूत झाले होते. बाबासाहेबांचे एकेकाळचे सहकारी कॉंग्रेस नेते नारायण सादोषा काजरोळकर यांनी त्यांना पराभूत केले होते.
२५) त्यांच्या कुटूंबाचा जाती परंपरेचा धिक्कार करणाऱ्या कबीरच्या शिकवणुकीवर विश्वास होता.
२६) त्यांचे वडील सैन्यात होते आणि ते सुभेदार मेजर म्हणुन सेवानिवृत्ती झाले होते.
२७) त्यांच्या शाळेतील शिपाई बाईंना त्यांचे दप्तरही अस्पृश्य वाटे.
२८) ते अस्पृश्य असल्यामुळे संस्कृत शिकु शकले नाही.

## ४. महर्षी धोंडो केशव कर्वे (१८५८-१९६२)

**जन्म :** १८ एप्रिल १८५८ (रत्नागिरी - शेरवली)
**मुळ गाव -** मुरुड
**नाव :** महर्षी धोंडो केशव कर्वे (स्त्रीयांचे कैवारी)
**टोपन नाव :** अण्णासाहेब
**महर्षी -** लोकांनी बहाल केलेली पदवी.
**वडिलांचे नाव :** केवश बापुराव कर्वे
**आईचे नाव :** लक्ष्मीबाई
**पत्नीचे नाव :** १) राधाबाई २) गोदुताई (आनंदीबाई)

- १८८० - १० वी पर्यंतचे शिक्षण मुरुड येथे.
- १८८४ महाविद्यालयीन शिक्षण मुंबई (विल्सन कॉलेज)
- कर्वे यांनी विश्वनाथ नारायण मंडलिक व सोमण गुरुजी यांचा विशेष आदर्श घेतला.
- स्पेन्सरचे लेख व केसरी सुधारक वृत्तपत्राच्या विशेष प्रभाव. (ख्रिश्चन धर्म व ग्रंथाकडे विशेष कुल नव्हता.)

- १९३४ मध्ये प्रकाशित आत्मृत्तात वेळापत्रकाच्या विशेष उल्लेख.

**विवाह :**

- इ. स. १८७३ राधाबाईशी विवाह
- इ. स. १८८२ रघुनाथ कर्वे चा जन्म.
- इ. स. १९०० राधाबाईचा मृत्यू

**विधवेशी पुनर्विवाह :**

- पंडिता रमाबाई यांच्या शारदा आश्रमातील विधवेशी कर्वेंचा विवाह.
- कर्वे आणि गोंदूबाई पुनर्विवाह - आगरकरांच्या भेटीतील पहिला.
- इ. स. १८९१ गणिताचे प्राध्यापक म्हणून निवड. (फर्ग्युसन कॉलेज, पुणे)
- डेक्कन एज्युकेशन सोसायटीत लाईफ मेंबर म्हणून निवड.
- संस्थेसाठी कर्वेनी फंड जमा करुन देणगीचे विशेष कार्य केले.
- **कर्वे यांनी स्थापन केलेल्या संस्था :**

**१) विधवा विवाहोत्तेजक मंडळी : इ. स. १८९३**

संस्थेचे सरचिटणीस - धो. के. कर्वे

याच संस्थेचे बदललेले नाव - विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळी

- **ही संस्था स्थापन करण्याचे कारण :**

१) विधवा विवाहासंबंधी लोकमत तयार करायचे होते.

२) हे कार्य लोकमताला न दुखावता पार पाडण्यास सोपे जावे.

३) या कार्यातुन फंड जमा करणे सोपे होण्यासाठी.

- **या संस्थने पार पाडलेले कार्य :**

- ज्यांची पुनर्विवाह करण्याची इच्छा आहे त्यांना मदत केली.
- विधवेशी पुनर्विवाह केलेल्या लोकांसाठी संस्थेच्या वतीने कर्वे वार्षिक संमेलन भरवले.

**२) अनाथ बालिकाश्रम संस्था - १४ जून १८९९**

संस्थेचे सरचिटणीस - धो. के. कर्वे

संस्थेचे अध्यक्ष - डॉ. रा. गो. भांडारकर

संस्थेचे कार्यालय - पुण्यात सदाशिव पेठ (पेरु गेटजवळ)

- पुनर्विवाहासाठी व शिक्षणासाठी स्थापन करण्यात आलेली संस्था.
- संस्थेच्या वतीने हायस्कूल व फिमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये मुली शिक्षण घेत व वसतीगृहातच राहण्याची व्यवस्था संस्था करन.

'अनाथ बालिकाश्रमात ब्राह्मणव्यतिरिक्त सर्व जातीच्या मुलींचा समावेश (आत्मचरित्रातील उल्लेख)

- हिंगणे स्त्री शिक्षणसंस्था :

इ. स. १८९९ मध्ये अनाथ बालिकाश्रम - हिंगणे येथे सुरु

कर्वेचे संस्थेविषयीचे उद्‌गार :

'मला माझ्या संस्था माझ्या आप्ताहून व प्राणाहूनही प्रिय वाटत.'

**३) महिला विद्यापीठाची स्थापना - ४ मार्च १९०७ :**

या विद्यापीठाची सुरुवात - पुणे (लाकडी पुलाजवळ)

बदल - महिला विद्यापीठ - निवासी महिला विद्यालय कालांतराने हेच बोर्डिंग स्कूल बनवले.

- महिला विद्यालयाची स्थापना - ४ मार्च १९०७ : सुरुवात - पुणे
  महिला विद्यालयाचे नाव निवासी महिला विद्यालय.
  कर्वेनी यालाच काही दिवसांनी बोर्डिंग स्कूल म्हणून घोषित केले.

**४) निष्काम कर्म मठाची स्थापना : १९१०**

स्त्रियांची सेवा व उद्धार करण्यासाठी संस्थेची स्थापना.
कर्वेनी मठ शब्दाचा अर्थ परोपकाराची समजोन्नती असा सांगितला.
६ डिसेंबर १९१० रोजी कर्वेनी सांगितलेले मठाचे नियम (महिला विद्यालयात सेवक - सेविकांच्या सभेत)

१) साधी राहणी असावी. २) खाजगी वर्तन शुद्ध
३) कोणाचाही द्वेश न करणे. ४) संस्थेचे नियम पाळावे.

**५) महिला विद्यापिठाची स्थापना - ३ जून १९१६ :**

- भारतातील पहिले महिला विद्यापीठ - (पुणे - १९१६)
- भारतातील विद्यापीठात सुधारणा घडवून आणण्यासाठी कर्वेने वाचलेले - Japan womens of univercity
  या पुस्तकाच्या प्रेरणेतूनच भारतात इंग्रजी विषय शिकवला जावा (महिला विद्यापिठात) असा प्रस्ताव मांडण्याचे व शेवटी मंजुर करुन घेवून भारतवर्षीय महिला विद्यापीठ स्थापन करण्याचे विशेष कार्य कर्वे यांनी केले.

● **कर्वे यांचे प्रांतीय समितीसाठीचे प्रयत्न :**

- मुंबई प्रांत, चेन्नई, मुंबई ईलाख्यात प्रचार व वर्गणी गोळा केली.
- प्राथमि शळेतील अध्यापिका विद्यालय सुरु करुन महिला विद्यापीठास जोडले.

महिलांसाठी कर्वेनी केलेली अभ्यासक्रमाचे निवड :

१) गृहशास्त्र, अरोग्यशास्त्र, वर्तमानशास्त्र, प्राणीशास्त्र, शरीररचना शास्त्र, इंद्रविज्ञान शास्त्र, मानसशास्त्र, गायन कला, वादन कला हे विषय अभ्यासक्रमात घेतले.
२) उच्च शिक्षण मातृभाषेत दिले. (इंग्रजीला सुद्धा स्थान दिले.)
३) गणित विषयाचे अध्यापण

● **महिला विद्यापीठाचा विस्तार :**

१) सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी आईच्या स्मरणार्थ १५ लाख रु. देणगी विद्यापीठास दिली.
- यावरुनच विद्यापीठाचे नाव ठाकरसींच्या मातोश्रींच्या नावावरुन पडले - SNDT नाथीबाई दामोदर ठाकरसी
- या विद्यापीठास भारत सरकारने स्वतंत्र दर्जा दिला.

२) मुंबईचे खटाव - ३५,००० वस्तीगृहासाठी
३) आश्रमाने चालवलेले कॉलेज व चिपळुणकरांनी काढलेली कन्या शाळा महिला विद्यापीठाला स्वाधीन.
४) सातारा, सांगली, बेळगाव या ठिकाणी दरवर्षी एकेक वर्ग वाढवून हायस्कूल काढले व महिला विद्यापीठास जोडले.

● **महिला विद्यापीठातील माध्यमिक शिक्षणासाठी वापरातील भाषा :**

मराठी, गुजराती, तेलगु, सिंधी
उच्च शिक्षणासाठी - तेलगु भाषा नव्हती (मराठी, गुजराती, सिंधी)

● **विदेशी प्रवास :**

१) लंडन (इंग्लंडमधील शहरे, पॅरिस येथील विद्यापीठांना भेट दिली.)
२) बर्लिन - प्रा. अल्बर्ट आईनस्टाईनशी भेट गृहविज्ञान शाळा.
३) टोकियो - महिला विद्यापीठास भेट.

**इतर देश :** युरोप, अमेरिका, चीन, मलाया, सेलबीज, फिलिपाईन्स

- कर्वे यांचा १३ महिन्यांचा विदेशी प्रवास आत्मचरित्रात नमुद (१९३०) - इंग्रजी, लुकिंग बँक - १९३०

- १९३६ महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ चालू केले. (उद्देश - ग्रामीण भागाचा विकास करणे)

- **कर्वेंच्या आश्रमातील महिला व त्यांची प्रगती :**

**१) पार्वतीबाई आठवले :** अश्रमात प्रवेश - १९०२
- आश्रमात शिक्षण घेवून ट्रेनिंग कॉलेजचे प्रमाणपत्र मिळविले.
- स्त्री शिक्षण संस्थेसाठी भारतभर व इंग्लंड - अमेरिका प्रवास
- माझी कहाणी - आत्मचरित्र

**२) श्रीमती वेणूताई नामजोशी :** आश्रमात प्रवेश - १९०४
- आश्रमाला उन्नतावस्था आणण्यात महत्त्वाचा वाटा.

**३) काशीबाई देवधर :** प्रवेश - १९०४
- lady Superitendent काम

**४) सीताबाई आण्णीगिरी - कर्नाटकातील बालविधवा**
- हिंगणे आश्रमात शिक्षण घेवून पदवीधर
- संस्थेच्या शाळेत मुख्याध्यापिका म्हणून कार्य.

- **कर्वे यांना मिळालेल्या पदव्या :**

१) बनारस विद्यापीठ - डी. लिट. - १९४२
२) पुणे विद्यापीठ - डी. लिट. - १९५१
३) S.N.D.T महिला विद्यापीठ - डी. लिट. - १९५४
४) भारत सरकार - पद्मभुषण - १९५५
५) मुंबई विद्यापीठ - एल. एल. डी. - १९५७
६) भारत सरकार - भारतरत्न - १९५८

- **महर्षी कर्वे यांचा गौरव :**

- इ. स. १९२८ मध्ये महात्मा गांधींनी कर्वे यांच्या कार्याचा गौरव 'यंग इंडिया' या पत्रात केला होता.
- स्त्री पुनर्विवाह, स्त्री शिक्षण याबद्दल आगरकरांनी त्यांचा पुरस्कार केला होता.
- आचार्य अत्रे - कर्वे हे लोकोत्तर सेवामुर्ती आहे.
- न्या. प्र. बा. गजेंद्रगडकर - कर्वे यांचे प्रेरणा देणारे चरित्र आहे.
- डॉ. राधाकृष्णन - कर्वे श्रेष्ठ शिक्षणतज्ञ व समाजसुधारक होते.

इतर :

इ. स. १९९६ मध्ये कर्वेच्या कार्यरंभाला सुरुवात होऊन १०० वर्षे पूर्ण, यानिमित्ताने -
- १९९६ मध्ये कर्वे शिक्षणसंस्थेने (महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था) दरवर्षी सामाजिक व शैक्षणिक कार्य करणाऱ्या स्त्रीला बाया कर्वे पुरस्कार देण्याचे ठरवले होते.
- १९९६ ते २०१३ बाया कर्वे पुरस्कार - १८ महिला
  पुरस्काराचे स्वरूप - ५१००० रु व मानपत्र (२०१३ साली)
- मृणालिनी चितळे यांच्या 'कत्या करवित्या' पुस्तकात बाया कर्वे पुरस्काराने सन्मानित झालेल्या १५ महिलांचा परिचय.

- **बाया कर्वे पुरस्कार सन्मानित महिला :**

१) अनुराधा भोसले २) मनोरमा दाते ३) निर्मलाताई सोवनी

- **कर्वे यांची मुले :**

१) रघुनाथ २) शंकर ३) दिनकर ४) भास्कर

- **महर्षी पदवी लोकांनी बहाल केली - डॉ. राजेंद्रप्रसाद (जन्म शताब्दी निमित्त)**
  विपरीत परिस्थितीत मनुष्य स्वबळावर प्रचंड कार्य करु शकतो. गृहमंत्री पंडित गोविंद वल्लभ - कर्वेंचे उदाहरण देत हे उद्गार काढले.
- पंडित नेहरु - धो. के. कर्वे हे ऋषीमुनीप्रमाणे वाटतात.
- न. चि. केळकर - कर्वेंनी देणग्याद्वारा मिळवलेला पैसा शैक्षणिक कार्यासाठी खर्च केला.

धो. के. कर्वे निधन - ९ नोव्हेंबर १९६२ (हिंगणे - पुणे)

## ५. कर्मवीर भाऊराव पाटील (१८८७-१८५९)

**जन्म :** २२ सप्टेंबर १८८७
**ठिकाण :** कुंभोज ता. हातकणंगले जि. कोल्हापूर
**मुळ गाव :** ऐतवडे जि. सांगली
**टोपण नाव :** अण्णा
**वडील :** पायगौंडा पाटील
**आई :** गंगाबाई
**पत्नी :** लक्ष्मीबाई
**मुळ आडनाव :** देसाई
**पेशा :** समाजसुधारणा, शिक्षण प्रसार (मराठी)
**प्रसिद्ध कामे :** रयत शिक्षण संस्था
**पुरस्कार :** पद्मभूषण (१९५९)
**नाव :** भाऊराव पायगौंडा पाटील
**शिक्षण :** प्राथमिक शिक्षण - सांगली जिल्ह्यातील विटा या गावी.
पुढील शिक्षणासाठी त्यांना कोल्हापूरच्या राजाराम हायस्कुलमध्ये दाखल करण्यात आले.

- राहण्याची सोय जैन बोर्डिंगमध्ये करण्यात आली.
- १९३२ मध्ये महात्मा गांधी व बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये पुणे करार झाला.
- युनियन बोर्डींगची स्थापना भाऊरावांनी पुणे येथे केली.
- १९१० साली सांगली जिल्ह्यातील दुधगाव येथे दुधगाव प्रसारक मंडळ या संस्थेची स्थापना केली. तिच्यामार्फत दुधगाव विद्यार्थी आश्रम हे वसतीगृह चालविले.
- ४ ऑक्टोबर १९१९ साली सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड तालुक्यातील काले या गावी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.
- इ. स. १९२४ साली या संस्थेने मध्यवर्ती कार्यालय सातारा येथे हलविण्यात आले.
- इ. स. १९२४ ला छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसची स्थापना सातारा येथे झाली.
- १९३५ मध्ये महत्त्मा फुले अध्यापक विद्यालय त्यांनी सुरू केले.
- इ. स. १९३५ पर्यंत रयत शिक्षण संस्था फक्त वसतीगृह चालवित होती.
- दुधगावात 'दुधगाव शिक्षण मंडळ' स्थापन केले.

- सर्व जातीधर्माच्या मुलांसाठी एक वसतीगृह ही त्यांनी सुरू केले. रयत शिक्षण संस्थेचे बीज येथेच रोवले गेले.
- पुढे त्यांनी ओगल्यांच्या काच कारखान्यात व किर्लोस्करांच्या नांगराच्या कारखान्यात काही काळ काम केले.
- **रयत शिक्षण संस्थेची उद्दिष्टे -**

  १) शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गात शिक्षणाची आवड निर्माण करणे व ती वाढविणे.
  २) मागासलेल्या वर्गातील गरीब मुलांना मोफत शिक्षण देणे.
  ३) निरनिराळ्या जातीधर्मातील विद्यार्थ्यांत प्रेमभाव निर्माण करणे.
  ४) अयोग्य रुढींना फाटा देऊन खऱ्या विकासाचे वळण लावणे.
  ५) संघशक्तीचे महत्त्व जाणून तर कृतीने पटवून देणे.
  ६) सर्व मुले काटकसरी, स्वावलंबी, शीलवान व उत्साही बनवण्याचा प्रयत्न करणे.
  ७) बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसारासाठी जरूर पडेल तसे संस्थेचे कार्यक्षेत्र वाढवणे.
- २५ फेब्रुवारी १९२७ रोजी महात्मा गांधीच्या हस्ते या वसतीगृहाचे 'श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस' असे नाव केले गेले.
- जून १६, १९३५ रोजी रयत शिक्षण संस्था नोंदणीकृत (रजिस्टर) झाली.
- १९३५ ला त्यांनी साताऱ्यात सिल्व्हर ज्युबिली रुरल ट्रेनिंग कॉलेज सुरू केले.
- कमवा व शिका या पद्धतीने चालणारे पहिले फ्री अ‍ॅन्ड रेसिडेन्शियल हायस्कूल सातारा येथे सुरू केले. त्याला नाव दिले - महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल.
- १९४७ साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेजची तर १९५४ साली कऱ्हाड येथे गाडगे महाराज कॉलेज ची स्थापना.
- १९५५ मध्ये सातारा येथे मौलाना आझाद यांच्या नावाने आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन सुरू केले.
- प्रत्येक गावात शाळा : बहुजन समाजातील शिक्षण व शिक्षण प्रशिक्षण या सुत्राचा त्यांनी सातत्याने पाठपुरवा केला.
- महाराष्ट्राच्या जनतेने - कर्मवीर ही पदवी देऊन गौरव केला.
- भारतीय केंद्रशासनाने त्यांना पद्मभुषण पुरस्कार देऊन गौरवले.
- पुणे विद्यापीठाने त्यांना इ. स. १९५९ मध्ये सन्माननीय डी. लिट. ही पदवी दिली.
- आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था - रयत शिक्षण संस्था
- महाराष्ट्र व कर्नाटक मिळून ६७५ शाखा आहेत, त्यामध्ये २० पूर्वप्राथमिक, २७ प्राथमिक, ४३८ माध्यमिक, ८ अध्यापक विद्यालय, २ आय. टी. आय. व ४१ महाविद्यालयांचा समावेश आहे.
- कर्मवीरांनी इ. स. १९३६-३७ ला पुण्यात युनियन बोर्डिंगची स्थापना केली.
- १९४० मध्ये महाराज सयाजीराव गायकवाड हायस्कूल ही रयत शिक्षण संस्थेची पहिली माध्यमिक शाळा होय.

- **रयत शिक्षण संस्था -**

  **स्थापना वर्ष -** इ. स. १९१९
  **संस्थापक -** कर्मवीर भाऊराव पाटील
  **स्थान -** काले जि. सातारा
  **ध्येय -** स्वावलंबी शिक्षण
  **योजना -** कमवा व शिका
  **संस्था बोधचिन्ह -** वटवृक्ष
  **संस्था ब्रीदवाक्य -** बहुजन हिताय, बहुजन सुखाय
- अपूर्ण राहीलेले स्वप्न - महात्मा गांधी ग्रामीण विद्यापीठ

## ६. श्रीधर महादेव जोशी

(१९०४-१९८९)

एस. एम. जोशींचा जन्म पुणे जिल्ह्यातील जुन्नर या गावी झाला. त्यांचे मूळ गाव रत्नागिरी जवळील गोळप होय. १९१५ साली वडिलांचा मृत्यु झाला आणि कुटूंबाची परवड झाली. चिरोल खटला लढवून परत आलेल्या लोकमान्य टिळकांची मिरवणूक पाहण्यासाठी गेल्यामुळे त्यांना छड्या खाव्या लागल्या होत्या. हा अनुभव असतानाही १९२० साली टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अस्थिची मिरवणूक काढली गेली.

- १९२९ मध्ये तत्कालीन अस्पृश्यांना मंदिरप्रवेश मिळावा म्हणून केलेल्या पर्वती येथील (पुणे) सत्याग्रहात त्यांनी पुढाकार घेतला.
- १९ ऑगस्ट १९३९ रोजी त्यांचे लग्न झाले पण रेशाच्या संसारात गुंतलेले हात घरच्या संसाराला हातभार लावायला मिळणे कठीण होते.
- १९३० साली त्यांनी असहकार चळवळीत भाग घेतल्याबद्दल एक वर्षाचा आणि त्यानंतर रॉय दिनाच्या दिवशी केलेल्या भाषणाबद्दल २ वर्षाचा तुरुंगवास त्यांना एकूण ३ वर्षाचा तुरूंगवास झाला होता.
- १९४२ च्या चले जाव चळवळीत त्यांचा प्रमुख सहभाग होता.
- १९५७ साली महाराष्ट्राच्या विधानसभेत ते आमदार झाले होते.
- १९६७ साली दुसऱ्यांदा लोकसभेवर ते खासदार म्हणून निवडून आले होते.

## ७. साने गुरूजी (१८९९-१९५०)

**नाव :** पांडुरंग सदाशिव साने
**जन्म :** डिसेंबर १८९९ (महाराष्ट्र - पालघर, रत्नागिरी)
**मृत्यू :** जुन १९५०
लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ता
**वडिल :** सदाशिव साने
**आई :** यशोदाबाई साने

- साने गुरूजीवर महात्मा गांधींचा प्रभाव होता ते अमळनेर शाळेत शिक्षक म्हणून नोकरीस होते.
- १९२८ - विद्यार्थी (मासिक)
- १९३० शिक्षकाची नोकरी सोडली व नंतर सविनय कायदेभंगमध्ये सामील.
- **लिहीलेली महत्त्वाची पुस्तके -**
  १) आस्तिक  २) गीताहृदय  ३) जीवनप्रकाश
  ४) राष्ट्रीय हिंदुधर्म (भागिनी निवेदिता यांच्या पुस्तकाचे अनुवाद)
  ५) शामची आई
  ६) सोन्या मारुती
- १९२८ मध्ये विद्यार्थी हे मासिक सुरू केले व त्यांचे साप्ताहिक होते - साधना (संपादक, संस्थापक)
- १९४७ - पंढरपूर येथील विठोबा मंदिर सर्वांसाठी खुले करण्यासाठी उपोषन
- विनोबा भावेंनी त्यांचा अमृत पुत्र असा गौरव केला. तर आचार्य अत्रे यांनी मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी असे वर्णन केले.

## ८. वसंतराव फुलसिंग नाईक (१९१३-१९७९)

**जन्म :** १ जुलै १९१३ (विदर्भातील गहूली जिल्ह्यातील यवतमाळ)
**आई :** होनुबाई फुलसिंग नाईक
**वडिल :** फुलसिंग नाईक
**शिक्षण :** माध्यमिक शिक्षण खेड्यामध्ये, १९३८ ते १९४० - एल. एल. बी.
**लग्न :** १९४१ - प्रेमविवाह
**पत्नी :** वत्सलाबाई त्यांचे शिक्षण (बी. ए.)
**त्यांची मुले -** निरंजन, अविनाश
**कृषीसेवेत काम :** १९४३ ते १९४७ (पुसत कृषीमंडळाचे अध्यक्ष)
**पक्ष :** १९४६ मध्ये काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश

- १९४६ ते १९५२ पुसदच्या नगरपालिकेचे अध्यक्ष
- १९५२ ते १९५६ राज्यांच्या महसुल खात्याचे उपमंत्री
- १९५७ - कृषीमंत्री
- १९६२ - महसुल मंत्री
- १९६३ ते १९७५ महाराष्ट्राचे तीसरे मुख्यमंत्री
- १९७७ लोकसभेवर निवड, रोजगार हमी योजना

**मृत्यू -** १८ ऑगस्ट १९७९

## ९. स्वामी रामानंद तीर्थ (१९०३-१९७२)

**नाव :** व्यंकटेश भगवानराव खेडगीकर
**जन्म :** ३ ऑक्टोबर १९०३ सिंदगी (विजापुर)
**शिक्षण :** सोलापूर येथील सरकारी शाळेत

- १९३० पर्यंत त्यांनी प्राध्यापक म्हणुन कार्य केले.
- १९३० मध्ये स्वामी नारायण तीर्थ यांनी त्यांना दिक्षा दिली व ते स्वामी रामानंद तीर्थ झाले.
- अंबाजोबाई येथील योगेश्वरी नुतन विद्यालयाचे त्यांनी नुतनीकरण केले.
- रझाकार या संघटनेने मराठवाड्यातील जनतेवर अत्याचार केले त्याविरुद्ध काम करणाऱ्या महाराष्ट्र परिषदेचे चिटनीस म्हणून कार्य केले.
- १९३८ मध्ये आपल्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन हैद्राबाद येथे उपोषणे, आंदोलने केली. स्टेट काँग्रेसची स्थापना
- १९३८ मध्ये त्यांना ४ महिण्याचा कारावास झाला त्यानंतर त्यांनी भूमीगत काम केले.
- मुक्तीसंग्रामातून आपल्या विचाराचा प्रसार करण्यासाठी व्हिजन हे साप्ताहिक सुरू केले.
- १७ सप्टेंबर १९४८ रोजी त्यांच्या प्रयत्नांनी हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले.
- स्वामी रामानंद तीर्थ हे औरंगाबाद व गुलबर्गा येथून लोकसभेवर निवडून आले.
- २२ जानेवारी १९७२ ला हैद्राबाद येथे त्यांचे निधन झाले.

## १०. वासुदेव बळवंत फडके (१८४५-१८८३)

**जन्म :** ४ नोव्हेंबर १८४५ (कुलाबा - शिरढोण)

- रेल्वेत लिपीक म्हणून तर, लष्करात लेखा विभागात नोकरी केली.
- १८७१ आईला भेटण्यास येवू न दिल्याने नोकरी सोडून दिली.
- १८७३ स्वदेशी वस्तू वापरण्याची शपथ घेतली, यामागे रानडेंची प्रेरणा होती.
- १८७३ ऐक्यवर्धिनी सभा स्थापन केली. उद्देश - समानता, ऐक्य व समन्वय निर्माण करणे.
- १८७४ 'पुना नेटिव्ह इंन्स्टीट्युशन' ही शाळा सुरू केली. - पुणे
  सहकार्य - वामनरवा भावे, लक्ष्मनराव इंदापूरकर
  पुढे हिचेच नाव - महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी असे झाले.
- १८७८ दत्त महात्म्य हा ७००० ओवींचा ग्रंथ लिहीला.
- २० फेब्रुवारी १८७९ धामरी येथे पहिला दरोडा घातला व ३००० रू. लुट केली.
- फेब्रुवारी १८७९ लोणी व खेडवर दरोडा
- मार्च १८७९ जेजुरीवर दरोडा
- मे १८७९ फडकेंनी पहिला जाहिरनामा काढला. त्यात म्हटले की,
  १) जे आम्ही करत आहोत ते इंग्रज सरकारच्या विरुद्ध आहे.
  २) युरोपियांची सापडेल तिथे कत्तल करू आणि १८५७ च्या बंडासारखे बंड उभारु.
- फडकेंना पकडण्यासाठी मुंबईचा गव्हर्नर सर रिचर्ड टॅम्पल याने ४००० रू. बक्षिस जाहीर केले.
- फडकेंचा दुसरा जाहिरनामा, यात म्हटले की -
  १) मुंबईचा गव्हर्नर रिचर्ड टेंम्पलचे मुंडके उडवणाऱ्यास १०००० रू. बक्षिस दिले जाईल. तर
  २) इंग्रज अधिकाऱ्यास मारणाऱ्यास ५००० रू.
- २३ जुलै १८७९ विजापूर जवळील नावडगी येथे एका बौद्ध विहारात तापीने फनफनलेल्या अवस्थेत असताना इंग्रज अधिकारी डॅनियल याने फडकेंना पकडले.
- २२ ऑक्टोबर १८७९ पासून न्या. अल्फेड केसर यांच्यापुढे खटला चालू झाला. (पुढे न्या. न्युनहॅम कडे वर्ग केला.)
  फडकेंचे वकीलपत्र -
  १) प्रथम - गणेश वासुदेव जोशी   २) उच्च न्या. - महादेव चिमाजी आपटे
- ३ जानेवारी १८८० तेहरान या बोटेने फडकेंना एडनला पाठवले.
- १७ फेब्रुवारी १८८३ एडन येथे वयाच्या ३८ व्या वर्षी मृत्यू.
- १८७९ अमृतबझार पत्रीका - यात फडकेंविषयी म्हटले की, (शिशीर कुमार घोष)
  देशप्रेमाने ओथंबलेला हिमालयासारखा महापुरुष
- **फडकेंवर प्रभाव -** १) न्या. रानडे, २) ग. वा. जोशी

## ११. नानासाहेब उर्फ जगन्नाथ शंकरशेट मुरकुटे (१८०३-१८६५)

**जन्म :** १० फेब्रुवारी १८०३
**गाव :** मुंबई (मुरबाड) महाराष्ट्र
**आई :** भवानीबाई

- त्यांचा जन्म मुंबई दैवत ब्राह्मण कुटूंबात झाला. ते व्यापारी होते.
- त्यांच्या लहानपणीच त्यांच्या आईचा मृत्यू झाला.

- त्यांच्या वडिलांचा मृत्यू १८२२ मध्ये झाला.
- त्यांच्या वडिलांचा हिरे-जवाहराताचा व्यावसाय होता. त्यात मोठी संपत्ती मिळवली होती. नानासाहेब १८ वर्षांचे असतानाच त्यांच्या वडीलांचे निधन झाले.
- त्यांनी त्यांच्या संपत्तीचा उपयोग जनतेच्या कल्यानासाठी केला.
- त्यांना लोक मुंबईचे शिल्पकार म्हणून ओळखतात.
- शिक्षण - मराठी, इंग्रजी व संस्कृत भाषा अवगत, त्यांचे शिक्षणावर प्रेम होते.
  त्यांनी सामाजिक, धार्मिक व राजकीय, आर्थिक कार्यात भाग घेतला.
- विद्यादानाखेरीज आमच्या लोकांचा उद्धार होणार नाही असे नानांनी एल्फिस्टन यांना स्पष्टपणे सांगितले.
- त्यांनी त्यांच्या आईच्या नावाने एक भवानी मंदिर, शंकर मंदीर व एक धर्मशाळा गोवालिया तलावाजवळ बांधली.
- त्यांच्यावर सर जमशेठजी जीजीभाई यांची छाप पडली होती.
- १८१५ - मुंबईचा तत्कालीन गव्हर्नर सर इआॅन जेपिअन यांच्या अध्यक्षतेखाली रेव्हरंट जॉर्ज वॉन्स यांनी गरीब अँग्लो इंडियन मुलामुलींसाठी बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली होती.
- १८१९ बॉम्बे प्रसिडेन्सी गव्हर्नर झालेला माउंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांना प्रांतातील लोकांमध्ये सुधारणा घडून आणावयाची होती त्यासाठी त्यांनी नाना यांच्याशी झालेल्या चर्चेत नानांनी त्यांनी त्यांच्या कार्यात मदत करण्याची अवश्यक्ता बोलून दाखविली.
- २१ ऑगस्ट १८२२ रोजी नानांनी बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.
  कॅप्टन जर्व्हीस सदाशिवराव छत्रे, बाळशास्त्री जांभेकर यांनी या संस्थेचा व्याप वाढवला. शिक्षणाच्या प्रसारासाठी स्थापन झालेली देशातील पहिलीच शिक्षणसंस्था ठरते.
- १८२७ एलफिस्टन सेवानिवृत्ती झाल्यानंतर त्यांच्या स्मरणार्थ एलफिस्टन कॉलेज उभारण्याचा ठराव संमत करण्यात आला होता. ३ लाख निधी गोळा केला व ते निधीचे विश्वस्त होते.
  - १८२४ ला एलफिस्टन हायस्कुल सुरू झाले.
  - १८३० रॉयल एशियाटीक सोसायटीला नानांनी भरपूर अर्थसाहाय्य केले.
- १८३८ सर रॉबर्ट ग्रँट यांचे निधन
- त्यांनी सर रॉबर्ट ग्रँटच्या मृत्युनंतर त्यांनी मेडीकल कॉलेजची स्थापना केली. तेही त्यांनी पुढे मराठीतून देण्याची सोय केली.
- १८४१ मध्ये त्यांनी बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना केली.
  बोर्डातील तीन एतद्देशीय सभासदांत सोळा वर्ष नाना निवडून आले.
- १८४५ मध्ये त्यांनी स्टुडंट्स लिटररी व सायन्टिफिक सोसायटी १८४५ मध्ये स्थापन केली.
- १८४८ मध्ये नानांनी जगन्नाथ शंकरशेठ मुलींची शाळा त्यांच्या स्वत:च्या वाड्यात सुरू केली.
- १८३६ मध्ये बॉम्बे नेटीव्ह डिस्पेन्सेरी हा पहिला धर्मादाय सार्वजनिक दवाखाना मुंबईत सुरु केला.
- १८४० कंपनी सरकारने शिक्षण प्रसारावर नियंत्रण ठेवण्यासाठी मुंबईत शिक्षण मंडळ स्थापन केले त्यांचे सदस्य नाना होते.
  - १८५६ मध्ये शिक्षण मंडळाचे रूपांतर स्वतंत्र शिक्षण विभागात केले.
- १८४५ दादाभाई नौरोजी, डॉ. भाऊ दाजी लाड, नारायण विश्वनाथ मंडलीक यांनी मुलींच्या शिक्षणासाठी कार्य करण्यासाठी स्टुडंट लिटररी अँड सायंटीफिक सोसायटी मुंबईत स्थापन केली.
- मराठा सरदार खंडेराव दाभाडे यांनी दक्षिण फंड सुरू केला होता पुढे पेशव्याने तो चालू ठेवला १८२१ मध्ये एल्फिन्स्टन याने या फंडातून संस्कृत विषयाच्या प्रसारासाठी हिंदू कॉलेजची स्थापना केली होती. १८५१ मध्ये त्याचे नामांतर पुना कॉलेज असे नानांनी केले व या संस्थेस भरघोस मदतही केली.
  - पुन्हा याच संस्थेचे डेक्कन कॉलेज असे नामांतर केले. येरवाड्याला या संस्थेची वास्तु उभारण्यासाठी श्री. जमशेठजी

जीजीभाई बाटलीवाला यांनी १ लाख रू. देणगी दिली.

- १८५७ मुंबई विद्यापीठ स्थापना - नानांच्या शैक्षणिक कार्याचे स्मारक व्हावे म्हणुन इ. स. १८५७ मध्ये द. जगन्नाथ शंकरशेठ फर्स्ट ग्रेड अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल स्थापना.
- १८५५ मुंबई प्रांताचे पहिले विधी महाविद्यालय नानाने सुरू केले.
- १८५७ जे. जे. स्कुल ऑफ आर्टस् यासाठी नानानी भरपूर अर्थसाहाय्य केले.
  मुंबईमध्ये नानांनी डेव्हीड ससून लायब्ररी सुरू केली होती.
- १८२३ राजा राममोहन रॉय व नाना शंकरशेठ यांची स्वाक्षरी असलेले सतिप्रथेविरूद्ध प्रस्ताव ब्रिटीश संसदेला पाठविला होता.
- १८४३ मध्ये नाना शंकरशेठ व जमशेठजी जीजीभाई यांनी ग्रेट इस्टर्न रेल्वे कंपनी स्थापन केली.
- महानगरपालिकेत नाना आयुक्त असताना त्यांनी आरोग्यव्यवस्था, विहिर, तलाव अशा अनेक योजना अंमलात आणल्या.
- त्यांच्या प्रयत्नामुळे चिंचपोकळी येथे गॅस कंपनी सुरू केली.
- इंग्रज सरकारला जनतेचे दु:ख कळावे व सरकारी योजनेची माहिती जनतेला मिळावी म्हणून २६ ऑगस्ट १८५२ ला बॉम्बे असोसिएशनची स्थापना दादाभाई नौरोजी व नाना शंकरशेठ यांनी केली.
- नाना हे कायदेमंडाळावर पहिले हिंदी सदस्य होते.
- १८४५ मध्ये नानांनी द बॉम्बे स्टीमशीप नेव्हीगेशन स्थापन करून पश्चिम भारतात वाफेच्या बोटींचा पाया रोवला.
  - त्यांनी जे. जे. हॉस्पीटलचा पाया घातला.
  - ॲग्रीहॉर्टीकल्चर सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया व जिऑग्राफिकल सोसायटी या संस्थेचे प्रमुख अध्यक्ष होते.
- १८५३ मध्ये धावलेले मुंबई ते ठाणे या रेल्वेचा प्रवास त्यांनी गोल्डन पासाने केला. त्यामध्ये नाना शंकरशेठ व दादाभाई नौरोजी होते. हे पहिले भारतीय रेल्वे प्रवासी होते.
  - त्यांनी आपल्या मालकीची जागा स्कूल ऑफ इंडस्ट्रिजला दान केली.
  - मुंबईच्या विकासासाठी नानांनी स्वत:च्या जमीनी सरकारला दिल्या.
  - नानांनी मुलींच्या कन्या शाळेसाठी डॉ. विल्सन यांना स्वत:चा वाडा दिला.
  - मराठी भाषेतून शिक्षणाचा फायदा विद्यार्थ्यांना व्हावा म्हणून त्यांनी दरमाह १० रू. शिष्यवृत्ती चालू केल्या तसेच शिष्यवृत्ती चालू राहावी म्हणून त्यांनी संस्थेकडे ५००० रू. देऊन ठेवले.
  - पुणे येथील संस्कृत ग्रंथालयासाठी ५००० रु. दिले.
- व्हिक्टोरीया वस्तुसंग्रहालायासाठी व उद्यानासाठी ५००० रू. दिले.
- रॉयल एशियाटीक सोसायटीच्या मुंबई शाखेला त्यांनी ५००० रू. दिले.
- व्हिक्टोरिया ॲड अल्बर्ट वस्तुसंग्रहालयासाठी ५००० रू. दिले.
- जगन्नाथ स्कुलला त्यांनी ३०००० रू. दिले.
- एलफिस्टन शिक्षण स्कूलला ३०००० रू. दिले.
- जिजामाता (राणीच्या) बागेसाठी २५००० रू. दिले.
- बॉम्बे असोसिएशनचे संस्थापक नाना होते.
- डेव्हिड रिफॉर्मेटरी इन्सिट्यूटचे अध्यक्ष.
- पोटसमिती व शिक्षण प्रसार समीतीचे अध्यक्ष.
- जगन्नाथ शंकरशेठ स्कूलचे संस्थापक.
- हॉर्टीकल्चर सोसायटीचे व जिओग्राफिकल सोसायटीचे अध्यक्ष
- बॉम्बे स्टीम नेव्हीगेशन कंपनीचे डायरेक्टर.
- ग्रेट ईस्टर्न रेल्वेचे संचालक सदस्य.

- बँक ऑफ वेस्टर्न इंडियाचे संचालक.
- कमर्शिअल बँक ऑफ इंडियाचे संचालक.
- द-कर्मटाईल बँक ऑफ इंडियाचे संस्थापक
- बादशाही नाव्यग्रहाचे अध्यक्ष.

**मृत्यू -** ३१ जुलै १८६५ रोजी.

## १२. उमाजी नाईक (१७९१-१८३४)

**नाव :** उमाजी दादोजी नाईक (खोमणे)
**जन्म :** ७ सप्टेंबर १७९१ (भिवंडी, पुणे)
**मृत्यू :** ३ फेब्रुवारी १८३४ (खडकमाळ आळी, पुणे)
**वडील :** दादोजी खोमणे (नाईक)
**आई :** लक्ष्मीबाई

- १८१८ भोर जवळील विग गावात पहिला दरोडा.
- १८१८ एक वर्ष तुरूंगवासाची शिक्षा. तुरूंगवासामध्ये लिहीणे, वाचणे शिकले.
- १८२४ उमाजीने भाबुरडी इंग्रज खजिना लुटला.
- १८२६ इंग्रजांनी उमाजी विरूद्ध पहिला जाहीरनामा काढला.
- १८२७ पुण्याचा कलेक्टर एच. डी. रॉबर्टसन यांच्याकडे खालील मागण्या केल्या.
  १) इंग्रजांनी अमृता रामोशी व विनोबा यांना मुक्त करावे.
  २) रामोशांची परंपरागत वतने परत करावीत.
  इंग्रजांनी उमाजीला कैद करून उमाजीकडे पुणे व सातारा भागात शांतता टिकवण्याची जबाबदारी उमाजीकडे सोपविण्यात आली. परंतु भोर संस्थानातील महसुलावरून संघर्ष झाला.
- १५ डिसेंबर १८३१ भोर तालूक्यातील उतरोली या गावी बेसावध असताना उमाजीला इंग्रजांनी पकडले.
- उमाजीवर देशद्रोहाचा खटला जेम्स टेलर या न्यायाधीशाच्या नेतृत्वाखाली झाला.
- ३ फेब्रुवारी १८३४ पुण्याच्या खडकमाळ आळी येथील मामलेदार कचेरीत ४३ व्या वर्षी फासी देण्यात आली.
- उमाजी बरोबर त्याचे साथीदार खुशाबा नाईक व बापू सोळकर यांनाही फाशी दिली.

## १३. शंकरराव चव्हाण (१९२०-२००४)

**नाव :** शंकरराव भाऊराव चव्हाण
**जन्म :** १४ जुलै १९२०
**जन्मगाव :** पैठण जि. औरंगाबाद
**वडील :** भाऊराव चव्हाण (शेतकरी होते)
**शिक्षण :** प्राथमिक शिक्षण - पैठण, बी. ए., एल. एल. बी - उस्मानिया विध्यापीठ (हैद्राबाद)

- १९४५ वकीलीची सनद मिळाली.
- हैद्राबाद मुक्तीसंग्रामात सहभागी झाले. (रामानंद तीर्थाच्या सल्ल्याने.)
- कार्याचे केंद्र - पुसद तालुका, गाव - उमरखेड

**राजकीय कारकींद -**

- १९४८-४९ नांदेड जिल्हा कॉंग्रेसचे सरचिटणीस, १९५२ निवडणूकीत पराभव.

- नांदेड शहरात नगरपालिके सहकारी क्षेत्रात कामगार वर्गात काम केले.
- १९५६ नांदेडचे नगराध्यक्ष
- नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष.
- हैद्राबाद राज्य सहकारी बँकेचे संचालक.
- १९५६ मंत्रीमंडळात उपमंत्री पद मिळाले.
- १९७२ ते १९७५ कृषीमंत्री.
- २१ फेब्रुवारी १९७५ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री.
- १३ मार्च १९८६ ते १९८८ पुन्हा मुख्यमंत्री.

**राजकीय कार्य :**

- पाटबंधारे मंत्री म्हणून काही विशेष कामे.
- कृष्णा गोदावरी पाणी तंटा भूमिका महत्त्वाची आहे.
- गोदावरी पुर्णा आणि मांजरा प्रकल्पामुळे मराठवाड्याचा विकास.
- १९७५ - मधील राज्य सहकारी कर्मचाऱ्याचा संप हातळला.
- रामानंद तीर्थ व गोविंद श्रॉफ यांना ते राजकीय गुरू मानत.

**निधन :** २६ फेब्रुवारी २००४

## १४. केशव बळीराम हेडगेवार (१८८९-१९४०)

**जन्म -** १ एप्रिल १८८९
**ठिकाण :** नागपूर
**पुर्ण नाव :** केशव बळीराम हेडगेवार (रेवतीबाई)
**टोपन नाव :** डॉ. हेडगेवार
**मृत्यू :** २१ जून १९४० (नागपूर)
**प्रमुख स्मारके :** डॉ. हेडगेवार स्मारक, नागपूर (समिती)
**प्रभाव :** बाळकृष्ण शिवराम मुंजे, लोकमान्य टिळक, स्वामी विवेकानंद, शिवाजी महाराज
**प्रभावित :** माधव गो. विलकर, बाळासाहेब देवरस, अटलबिहारी वाजपेयी, नरेंद्र मोदी
**संस्थापक :** संघटना - राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RRS) - १७ सप्टेंबर १९२५
**चळवळ :** हिंदू धर्म पुनरुज्जीवन वाद व सुधारणा
यांचे शिक्षण मोठ्या भावाने केले.

- १९१० वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी कोलकत्याला गेले.
- सशस्त्र क्रांतीत सहभाग.
- वंदे मातरम् ही घोषणा केल्याबद्दल शाळेतून काढून टाकले.
- अनुशिलन समितीचे प्रमुख कार्यकर्ते.
- सच्चे नेतृत्त्व, त्याग, सेवा, समर्पन भावना, दुरदर्शी विचार, शिस्तबद्ध निश्चित व व्रतस्थ ही त्यांच्या व्यक्तीमत्त्वाची विविध अंगे होती.
- गांधीजी मुस्लीमाशी सहकार्य करण्याची इच्छा नाकारल्याबद्दल RSS ने नकार दिला.
- हेडगेवार वैयक्तीकरित्या सत्याग्रहामध्ये सहभागी झाले.
- स्वातंत्र्य चळवळीला RSS चा सहभाग मिळाला नाही.

प्रथम बंदी - १९४७ पंजाब प्रांतात

- भारताच्या राष्ट्रीय ध्वजाला विरोध
- राष्ट्रीय ध्वजाचा रंग भगवा ठेवण्याची मागणी.

## १५. लोकनायक बापुजी अणे (१८८०-१९६८)

**जन्म :** २९ ऑगस्ट १८८०

**मृत्यू :** २६ जानेवारी १९६८

- १९०२ साली नागपूरच्या मॉरिस कॉलेजमधून बी. ए.
- १९०७ साली कलकत्ता विद्यापीठातून एल. एल. बी. पदवी
- १९४८ ते १९५२ या काळात बिहारचे राज्याचे राज्यपाल होते.
- १९६२ आणि १९६७ ते अपक्ष उमेदवार म्हणून लोकसभा निवडणूकामध्ये महाराष्ट्र राज्यातील नागपूर लोकसभा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले.
- श्रीतिलकयशोर्णव या बापुजींनी रचलेल्या काव्यास साहित्य अकादमीचा पुरस्कार.
- भारत सरकारने पद्‍मविभुषण हा किताब देऊन त्यांना गौरविण्यात आले.
- बापुजी अणे हे पुसद येथील जंगल सत्याग्रहींशी संबंधित आहेत.
- बापुजी अणे अन् पिवळे दोण आणे असे सत्याग्रहाच्या वेळी म्हणत असत.
- लोकजागृती करणारे लेख लोकमत आणि यवतमाळच्या हरिकिशोर साप्ताहिकातून त्यांनी लिहिले.

## १६. भाऊ दाजी लाड (प्राच्यविद्या पंडित, समाजसेवक व कुशल धन्वतंरी) (१८२४-१८७४)

**नाव :** रामकृष्ण विठ्ठल लाड

**टोपण नाव :** भाऊ दाजी लाड

**जन्म :** १८२४

**मृत्यू :** ३१ मे १८७४

**जन्म गाव :** गोव्यातील मांजरे (पेडणे तालुका)

**वडील :** पोर्से (गोवा) येथे शेती तसेच कारकुनीचे काम करत.

**शिक्षण :** एल्फिन्स्टन विद्यालयात तसेच संस्कृतचे खाजगी नंतर १८४३ ला याच विद्यालयात अध्यापक म्हणून नियुक्ती कॉटिश स्कॉलरशिप मधून वैद्यकीय शास्त्रात पदवी १८५१

- **पदे :**

  Bombay Association चे चिटणीस

  East India Association चे इंग्लंड संस्थेचे मुंबई येथील शाखेचे अध्यक्ष.

  १८५४ मध्ये Western Indian canal and irrigation संचालक.

  रॉयल एशियाटीक सोसायटी चे मेंबर व पुढे उपाध्यक्ष.

- **कार्ये -**

१. कच्छ, काठेवाड या गुजरातच्या विभागातील बालकन्या हत्त्येच्या प्रथेवर इंग्रजी व गुजराती मध्ये निबंध.

२. मुंबईत १८४५ मध्ये ग्रॅांट मेडिकल कॉलेजची स्थापना.

३. कृष्ठरोगावर खष्ठ (कवटी) नावाच्या वनस्पती बियांपासून औषधी निर्माण.

४. औद्योगिक सुधारणांकडे लक्ष.

५. मुंबईत कागद व कापूस यांच्या गिरण्या काढण्यात भाऊंचा पुढाकार.

६. स्त्रीच्या शिक्षणासाठी आर्थिक झीज सोसली.

- **इतर -**

१. राणीचा बाग, ॲल्बर्ट म्युझीयम, नेटिव्ह जनरल लायब्ररी पेरीर, इंस्टीट्यूट संस्था मध्ये अग्रेसर.
२. भारतभर, हस्तलिखीते, शिलालेखांचे ठसे, दुर्मिळ चित्रे नाणी, ताम्रपट, शस्त्रे इ. चा संग्रह.
३. मुकंदराज हेमांद्री सायण, हेमचंद्र इ. व्यक्तीचे तसेच कालीदास कालनिर्णय आणि शिलालेख, ताम्रपट इ. चे शोधनिबंध अभ्यासपूर्ण.
४. कालीदासाचे कुमारसंभव व मेरूतुंगाचार्यांचा प्रबंध चिंतामणी हे ग्रंथ संपादिते.
५. मरणोत्तर रामचंद्र घोष यांनी द लिटररी रिमेन्स ऑफ भाऊ दाजी या शिर्षकाचे त्यांचे संशोधनात्मक शोधनिबंध प्रसिद्ध केले.
६. Writting's and Speech of Dr. Bhau Daji या शिर्षकाने त्र्य. गो. माईणकर यांनी त्यांचे समग्र लेखन संपादित केले. १९७४
७. १८६५ मध्ये आर्थिक संकल -

- **पक्षाघाताने मृत्यू १८७४ - मुंबई**

स्मरणार्थ संस्कृत विषयात बी. ए. च्या पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. भाऊ दाजी लाड हा पुरस्कार देण्यात येतो.

## १७. कमलादेवी चट्टोपाध्याय (१९०३-१९८८)

**जन्म :** ३ एप्रिल १९०३ (मंगलोर - कर्नाटक)
**मृत्यू :** २० ऑक्टोबर १९८८ (बॉम्बे - मुंबई) महाराष्ट्र
**जीवनसाथी :** कृष्णराव (१९१७-१९) हरिंदरनाथ चट्टोपाध्याय - १९१९
**मुलगा :** रामाकृष्ण चट्टोपाध्याय

- **कार्ये :**

१) भारतीय समाजसुधारक, स्वतंत्रता सेनानी आणि भारतीय हस्तकलेच्या क्षेत्रात नवजागरण आणणारी गांधीवादी महिला.
२) भारतीय महिलांचा सामाजिक आणि आर्थिक स्थर सुधारण्यासाठी प्रयत्न केला.
३) मी सत्याग्रह तोडणारी महिला.
४) विधानसभा लढणारी पहिली महिला.
५) मुळ संविधानावर सही केली आहे.
६) सेवादलात काम केले.
७) रंगभूमी व हस्तकलेच्या क्षेत्रात काम केले.

- **चित्रपट -**

१) दोन मुक चित्रपटात काम, यापैकी एक चित्रपट कन्नड भाषेतील पहिला मूक चित्रपट होता.

- दिल्लीतील थिएटर इन्स्टिट्यूट
- नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा
- संगीत नाटक अकादमी
- सेंट्रल कॉलेज इंडस्ट्रीज एम्पोरियम
- क्राफ्टस् कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थाच्या उभारणीत सिंहाचा वाटा.
- १९५२ मध्ये ऑल इंडिया हेंडिक्राफ्टच्या प्रमुख म्हणुन नियुक्त केले होते.
- **लिहीलेली पुस्तके :**

१) द अवेकिंग ऑफ इंडियन वुमेन
२) जापान इट्स विकनेस अँड स्ट्रेन्थ

३) अंकल सैम एम्पायर
४) इन वार - टॉर्न चाइना
५) टू वर्डस ए नेशनल थिएटर

- **पुरस्कार :**

१) १९५५ - पद्मभुषण
२) १९६६ रॅमन मॅगसेस पुरस्कार (फॉर कम्युनिटी लिडरशिप - भारतातून ७ वी व्यक्ती)

- **कमला देवी चट्टोपाध्याय राष्ट्रीय पुरस्कार :**

१) स्मृती ईरानीद्वारा मार्च २०१७ पासुन आंतरराष्ट्रीय महिला दिवसाच्या दिनी महिला कलाकुशरांना आणि हस्त कलाकारांना हा पुरस्कार देण्याची घोषणा केली.

## १८. नारायण मेघाजी लोखंडे (१८४८-१८९७)

**जन्म :** ८ फेब्रुवारी १८४८
**मृत्यू :** ९ फेब्रुवारी १८९७ - प्लेगमुळे (ठाणे)
**मूळ गाव :** कव्हेरसर ता. सासवड जि. पुणे

- फुलमाळी शेतकरी कुटूंब पत्नी - गोपिकाबाई, मुलगा - गोपीनाथ
- अतिशय गरीब परिस्थितीतून माध्यमिक शिक्षण पूर्ण केले.
- सुरूवातीस रेल्वे खात्यात कारकून म्हणून व पुढे पोस्ट खात्यात नोकरी केली. नंतर मुंबईच्या मांडवी भागात एका कापड गिरणीत भांडारपालाची नोकरी मिळाली.
- मांडवी येथे नोकरी करत असताना तेथे त्यांना दहशतीच्या वातावरणात, दिवसातून १३-१४ तास काम करीत असलेले गिरणी कामगार आढळले. त्यांना आठवड्याची सुट्टी नसे परिणामी त्यांनी नोकरी सोडून स्वत: कामगार चळवळीस वाहून घेण्याचे ठरविले.
- १८७३ लोखंडे हे सत्यशोधक समाजाचे निष्ठावंत सहकारी.
- १८७५ मुंबईतील कापडगिरणीच्या कामगारांच्या आंदोलनामुळे ब्रिटीश सरकारने कामगारांच्या स्थितीचा व त्यात सुधारणा करण्यासाठी आयोग नेमला.
- १८८० दीनबंधू सत्यशोधक समाजाचे पहिले मुखपत्र मुंबईमध्ये पुन्हा सुरू केले.
- १८८१ इंग्रज सरकारला कारखाना कायद्यात सुधारणा करणे भाग पाडले. चार भरपगारी महिन्यातून सुट्ट्या कामगारांना मिळू लागल्या.
- १८८३ टिळक व आगरकरांची बर्वे प्रकरणात सुटका झाल्यावर त्यांचा सत्कार केला.
- १८८४ दुसरा कामगार कायदा आयोग नेमण्यात आला. या अयोगामुळे कामगारांच्या स्थितीत सुधारणा घडल्या नाहीत.
- सप्टेंबर १८८४ पहिली मोठी कामगार परिषद मुंबई येथे भरवली. (५५०० कामगारांचे लेखी निवेदन पाठवले.)
- १८९० मुंबई गिरणी कामगार संघ नावाची देशातील पहिली कामगार संघटना स्थापन केली. (बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन)
- १० जून १८९० पासून कामगारांना रविवारची साप्ताहिक सुट्टी मिळू लागली.
- १८९१ कामगार कायदा संमत करून त्यात लोखंडे यांच्या काही सूचनांचा समावेश केला.
- १८९१ ब्रिटीश सरकारने त्यांच्या कामगिरीची दखल घेऊन (J. P. - Justice of Pience) हा किताब दिला.
- १८९३-९४ मुंबईतील हिंदू-मुस्लीम दंगल मिटवण्यात मोठी भूमिका त्यामुळे सरकारने रावबहादूर ही पदवी बहाल केली.

- ते निर्भिड वक्ते, झुंझार लेखक, संपादक, मुद्रक होते.
- लोखंडे हे महात्मा फुलेंच्या सत्याशोधक समाजाच्या मुंबई शाखेचे अध्यक्ष होते.
- भारतीय कामगार चळवळीचे जनक म्हणून ओळख.
- प्लेग ग्रस्तांसाठी मराठा हॉस्पिटल काढले.
- पंचदर्पण हे पुस्तक व गुराखी हे दैनिक काढले.
- सक्तीचे शिक्षण, दारूबंदी, विद्यार्थ्यांना सवलती, शेतकऱ्यांच्या समस्या यांना दीनबंधूतून वाचा फोडली.
- **मृत्यू -** ९ फेब्रुवारी १८९७ (प्लेगमुळे - ठाणे)

## १९. किसान फागु बनसोडे (१८७९-१९४६)

**जन्म :** १८ फेब्रुवारी १८७९ (नागपूर)
**मृत्यू :** १० ऑक्टोबर १९४६ (नागपूर)
**कार्य :** समाज कार्य

- १९०१ सामाजिक आंदोलनाला सुरूवात.
- ९ ऑक्टोबर १९०३ सन्मार्ग बोधक अस्पृश्य समाजसंस्था स्थापन
- १९०७ चोखामेळा नावाने मुलींसाठी शाळा उघडली.
- १९१०-१९३६ च्या दरम्यान त्यांनी - निराश्रित हिंद नागरीक (१९१०), विताळ विध्वंसक (१९१३), मजूर पत्रिका (१९१८) आणि चोखामेळा (१९३१-३६) अशी चार पत्र संपादित केली.
- संत चोखामेळा चरित्र ग्रंथ व चोखामेळा व सत्यशोधक जलसा ही दोन नाटके आणि प्रदीप - काव्यसंग्रह लिहीला.
- १९२० च्या (नागपूर) बहिष्कृत हितकारिणी परिषदेत जोशपूर्ण भाषण दिले.
- धर्म परिवर्तनाच्या मुद्द्यावर त्यांचे विचार असे होते की, दलित समाजाने हिंदू धर्मात राहूनच त्यांचे सामाजिक सुधारणांचे आंदोलन चालवावे.

## २०. दिनकर जवळकर

**गाव :** म्हातोबाची आळंदी (हवेली तालुका)
**चळवळ :** सत्यशोधक, ब्राह्मणोत्तर चळवळ (सहकारी - केशवराव जेधे)
**लेखन :** कैवारी, तेज (साप्ताहिक)
**धर्म :** सत्यधर्म
**प्रभाव :** छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम, महात्मा फुले, शाहु महाराज
**पत्नी :** इंदुताई जवळकर
**अपत्ये :** तीन

- १९१७-१९३७ मुंबई व चेन्नईत सत्यशोधक चळवळीला पुढे नेण्याचे काम त्यांनी केले.
- छत्रपती शाहु महाराजांनी त्यांना कैवारी वृत्तपत्र काढून दिले, ते त्याचे संपादकही होते.
- ब्राह्मणेत्तर चळवळीत ते महाराष्ट्रातील धडाडीचे नेते होते.
- टिळक व कृष्णाशास्त्री चिपळूनकर हे देशाचे दुश्मन आहेत असे ते म्हणत.
  (टिळक - तेल्या तंबोळ्याचे नाही सनातनी ब्राह्मणांचे पुढारी)
- बहुजन समाजाची भटांनी पिळवणुक केली.
- त्यांच्या लेखणीला तलवारीची धार होती. हे त्यांचे साहित्य वाचल्यावर कळून येते की अवघे ३४ वर्षाचे जीवनमान

लाभलेल्या या महापुरूषाचा पराक्रम संभाजी महाराजांसारखा धारदार होता.

- दिनकरांचे शत्रु असलेले ब्राह्मण म्हणायचे हा माणुस जणू विषात बुडवून लेखणिने लिहीतो आहे.
- त्यांची जयंती त्यांच्या गावच्या चावडीत चाळीस-पन्नास लोकांच्यात साजरी करून दिनकरांचे महत्त्व लोकांनी सांगितले.
- सत्यशोधक दिनकरराव जवळकर पत्रकारिता पुरस्कार दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या खानवडी येथे होणाऱ्या महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलनात दिला जातो.
- **साहित्य :**

  १) देशाचे दुश्मन - १९२५ २) शेतकऱ्यांची कैफियत
  ३) शेतकऱ्यांचे हिंदूस्थान ४) क्रांतीचे रणशिंग
  ५) शिवस्मारक पुराण
- देशाचे दुश्मन या बद्दल ल. ब. भोपटकर यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे फिर्याद केली.
- **प्रकाशन -** केशवराव जेधे व प्रस्तावना - लेखक बागडे वकील या तिघांना ताबडतोब पकड - वॉरंटने कैद करून त्यांची येरवाडा जेलमध्ये झटपट रवानगीही झाली.
- तिघाही आरोपींना शिक्षा झाल्या. त्यावर अपील झाले, अपील चालवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धाव घेतली.
- यांनी आरोपींची बाजू लढवली आणि तिघांजणांची निदोष सुटका केली.

## २१. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (१८७३-१९४४)

**जन्म :** २३ एप्रिल १८७३ - जामखिंडी संस्थान (विजापूर जिल्हा)

**मृत्यू :** २ जानेवारी १९४४

- १८९१ मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण
- १८९८ बी. ए. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण
- १९०३ ॲमस्टरडॅम येथील आंतरराष्ट्रीय उदारधर्म परिषदेत 'हिंदुस्तानातील उदारधर्म' या ग्रंथाचे वाचन.
- १९०४ मुंबई येथे धर्मपरिषद भरवली.
- १९०५ अहमदनगर जवळ भिंगार येथे अस्पृश्य उद्धाराची शपथ घेतली.
- १९०५ पुणे येथील मीठगंज येथे अस्पृश्यासाठी रात्रीची शाळा सुरू केली.
- १६ ऑक्टोबर १९०६ All India Depressed class Mission (उद्देश - अस्पृश्यांच्या उद्धारासाठी स्थापना)
- १९०९ अस्पृश्य मुलांसाठी वसतीगृह उघडले.
- १९११ मुरळी प्रतिबंधक परिषद भरवली.
- ८ नोव्हेबर १९१७ मराठा राष्ट्रीय संघ स्थापना

  **हेतू -** मराठा समाजाला जागृती करणे.
- १९१८ मुंबई - पुण्यातील लोकांना एन्फुएंझा साथीच्या मिशन तर्फे मदत.
- १९१९ पुणे पालिकेकडे स्त्रीयांच्या शिक्षणासाठी आग्रह.
- १९२० मुंबई कायदे कौन्सिलची निवडणूक लढवली. अपयश
- १९२० बहुजन पक्षाची स्थापना
- १९२० पुणे व नगर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्तांना AIDCM कडून मदत.
- १९२४ वायकोम सत्याग्रह (केरळ) उद्देश - अस्पृश्यांना मंदिर प्रवेश
- १९२४ कौटूंबिक उपासना मंडळाची स्थापना.

- १९३० सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग
- १९३० पुणे पार्वती मंदिर प्रवेश सत्याग्रह
- **शेतकरी परिषदांमधील सहभाग / आयोजन :**
  १) पुणे १९२६ - अस्पृश्यांची शेतकी परिषद
  २) पुणे १९२८ - मुंबई इलाखा शेतकी परिषद
  ३) वाळवे तालुका शेतकरी परिषद - १९३१
  ४) चांदवड तालुका शेतकरी परिषद - १९३२
- **ग्रंथसंपदा :**
  १) भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न - १९३३
  २) माझ्या आठवणी व अनुभव (आत्मचरित्र)
  ३) भागवत धर्माचा विकास (लेख)
  ४) मराठ्यांची पूर्व पीठिका (लेख)
  ५) कानडी - मराठी संबंध (लेख)
  ६) कोकणी - मराठी संबंध (लेख)

## २२. बहिणाबाई चौधरी (१८८०-१९५१)

**जन्म :** ११ ऑगस्ट १८८०
**नाव :** बहिणाबाई नथुजी चौधरी
**गाव :** असोदा - जळगाव (महाराष्ट्र)
**वडील :** उखाजी महाजन
**आई :** भिमाई उखाजी महाजन
**पती :** नथुजी खंडेराव चौधरी
**साहित्य प्रकार :** कविता
**वैशिष्ट्ये :** मातृभाषेत होत्या, लेवा गणबीली (खानदेशी भाषा)
**कवितेचा विषय :** माहेर, संसार, शेतीची साधने, कापणी, मळणी, कृषिजीवनातील विविध प्रसंग इ. विविध प्रकार.

- **कविता संग्रह :**

१. असा राज शेतकरी चालणारे अणवाणी देखा त्याच्या पायाखाली कोठे गेले वाकीसन.
२. आला आस गेला सास
३. जीवा तुझर तंतर
४. अरे जगन-मरण एक सासच आंतर
५. लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदते
६. अरे संसार संसार - जसा तवा चुल्यावर, आधी हाताला चटके तव्ह मिळते भाकर.
७. देव कुठे, देव कुठे - आभायाच्या आरपार तुझ्या बबुयामझार
८ बहीणाबाई अडाणी असल्या कारणाने त्यांच्या कविता त्यांचे पुत्र सोपानदेव व मावसबंधू श्री. पितांबर चौधरी यांनी लिहून घेतली.

- १९५२ ला कविताची पहिली आवृत्ती प्रकाशित
- १९६९ ला कविताची सुधारित दुसरी आवृत्ती प्रकाशित
- **मृत्यू :** ३ डिसेंबर १९५१ जळगाव (महाराष्ट्र)

## २३. ताराबाई शिंदे (१८५०-१९१०)

**जन्म :** १८५०
**मृत्यू :** १९१०
**गाव :** बुलढाणा
**राष्ट्रीयता :** भारतीय
**समाज :** मराठा
**वडील :** बापुजी हरि शिंदे जमिनदार होते आणि सत्यशोधक समाजाचे सभासद होते.
**भाऊ :** ४ - रामचंद्र हरी शिंदे

- ज्योतीबांच्या कॉन्ट्रक्टिंग कंपनीत भागीदार होते त्यामुळे त्याच्या घरात पहिल्यापासून स्त्री-पुरूष समानता होती.
- मराठी, संस्कृत, इंग्रजी भाषा शिकल्या.
- वाचनाची फार आवड होती.
- स्त्री असून घोडा चालवायच्या.
- स्वभावाने तापट होत्या.
- कोर्टाची कामे करत होत्या तसेच शेतीच्या कामात लक्ष घालीत.
- १९ व्या शतकात वडीलांच्या म्हणन्यावरुन लग्न केले.
  एका सामान्य मानसासोबत लग्न झाले त्यांना संसार सुखाचा झाला नाही.
- केशवपणच्या दृष्ट रुढी तसेच पुरुषांना अनेक लग्न करण्याची मुभा या प्रश्नावर टिका केल्या.
- नवरा कसाही दुर्गुणी असला तरी त्याला देवाप्रमाणे मानुन कोण बरे वागले असा सवाल ताराबाईंनी आपल्या लेखातून केला.
- सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्या होत्या.
- नारीवादी, महिला अधिकार कार्यकर्त्या, लेखक होत्या.
- १८८२ स्त्री-पुरुष तुलना ग्रंथ लिहिला.
- त्यांनी या ग्रंथात काळाच्या पुढचे अतिशय परखड विचार व्यक्त केले.
- त्यांनी या ग्रंथाची रचना स्त्रीयांची गुलामगिरीची मानसिकता अशी केली.
- स्त्री-पुरुष तुलना हे पहिले महाराष्ट्रीयन स्त्रीवादी लेखन केले.
- स्त्री-पुरुष नामक पुस्तकावरील पुरुषी पुर्वग्रहदुषित टिका परतुन लावण्यासाठी सत्सार या आपल्या नियतकालिकात विशेष अंक जोतीरावांनी काढला आणि संवाद रूपाने त्यातून स्त्रीमुक्तीचा संदेश सांगितला.
- **महाराष्ट्राच्या शिल्पकार** - ताराबाई

## २४. शिवराम जानबा कांबळे (इ. स. १८७५ - पुणे)

- अस्पृश्यता निवारणाचे आणि दलित चळवळीचे काम करणारे मराठी लेखक होते.
- शिवराम जानबा कांबळे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व काळातील पहिले पत्रकार, मुद्रक, प्रकाशक व संपादक म्हणून ओळखले जातात.
- **व्यक्तिगत जीवन :** शिवराम कांबळे यांचे वडील जानबा कांबळे पुण्यातील भांबुर्डे गावाचे वतनदार महार होते. जानबा कांबळेनी आपला गावकीचा व्यवसाय सोडून पुण्यात युरोपियन लोकांकडे नोकरी धरली. त्यांनी त्यांचा मुलगा शिवराम यास त्याच्या इच्छेप्रमाणे शिकू दिले. शिवराम यांनी मराठी व इंग्रजी भाषेचे शिक्षण घेतले. त्यांचे राहते घर पुण्यातील लष्कर भागातल्या भीमपूरा १३७३/६ येथे होते. येथूनच ते दलितोद्धाराचे काम करत.

- **चळवळीत सहभाग :**
शिवराम कांबळे यांनी सासवड येथे इ. स. १९०३ मध्ये ५१ गावातील महार लोकांची सभा बोलावली होती. या सभेत महारांना शिक्षण मिळावे आणि महार बटालियनचे पुनर्गठन करुन लष्करात तसेच पोलिसात नोकऱ्या मिळाव्यात यासाठी सरकार दरबारी अर्ज दाखल करण्याचे ठरले. शिवराम कांबळे यांनी इ. स. १९०८-१९१० या काळात सोमवंशीय मित्र नावाचे मासिक चालवले.
- **कारकीर्द :**
शिवराम जानबा कांबळे यांनी सन १९०४ मध्ये श्री. शंकर प्रसादिकीय सोमवंशी हित चिंटक मित्र समाज नावाची संस्था स्थापित केली आणि वाचनालये ही खोलली. ही भारतातील पहिली दलित समाज संघटित करणारी संस्था होय.

## २५. लहूजी साळवे (१७९४-१८८१)

**जन्म :** १४ नोव्हेंबर १७९४
**मृत्यू :** १७ फेब्रुवारी १८८१ - पुणे (महाराष्ट्र)
**गाव :** पेठ, पुरंदर जिल्हा (महाराष्ट्र)
**समाधी :** संगमवाडी, पुणे
**चळवळ :** भारतीय स्वातंत्र लढा
**संघटना :** हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकेशन असोसिएशन नौजवान भारत सभा.
**जात :** मातंग समाज
**वडिल :** राघोजी साळवे
**आई :** विठाबाई
**नोकरी :** नळिदाशाली
**ओळख :** आद्यक्रांतीकारक, क्रांतीकारी गुरव, लहूजी वस्ताद
**जीवन कार्य :**

- ५ नोव्हेंबर १८१७ ला पेशव्याचे इंग्रजांसोबत खिडकी येथे तुबळ युद्ध झाले. त्या वेळी लहूजी २३ वर्षाचे असताना लहूजीनी मावळ्यांना घेऊन लढा दिला.
- १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलाच्या समाधीपाशी शपथ घेतली.
'मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी'
- १८२२ मध्ये त्यांनी रास्ता पेठ, पुणे येथे देशातील पहिली तालीम युद्ध प्रशिक्षण कलाकौशल्य केंद्र 'नाना रास्त सरदार' यांच्या हस्ते सुरु केले.
- **प्रशिक्षण घेणारे शिष्य :** बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके, जोतिबा फुले, गोपाळ गणेश आगरकर, चाफेकर बंधू, क्रांतीभाऊ खरे, नाना मोरोजी, क्रांतीवीर मोरो विठ्ठल बाळवेकर, नाना छत्रे, उमाजा नाईक
- त्यांनी आखाड्याजवळ अस्पृश्य लोकांसाठी एक विहीर खोदली.
- द सोसायटी फॉर प्रोमोटींग द एज्युकेशन ऑफ महार, मांग इ. या संस्थेच्या स्थापनेमागे लहूजीचे प्रयत्न.
- सावित्रीबाई फुले यांना संरक्षण देण्याचे काम केले.
- सावित्रीबाई फुले लहूजीना बाबा म्हणून हाक मारत.
- म. फुले यांच्या समाजक्रांतीच्या कार्यास पाठिंबा.
- इ. स. १८४८ साली लहूजीच्या तालमित सावित्रीबाई फुले यांनी पहिली मुलींची शाळा काढली.
- प्रशिक्षण - तलवार चालवणे, दांडपट्टा, भाला फेक, नेमबाजी, मल्लखांब इ.
- सशस्त्र क्रांतीचे पहिले गुरू.

- लहूजी साळवे यांनी घरोघरी फिरून महार, मातंग वस्तीत जाऊन फुलेच्या शाळेत पाठवले.
- इंग्रज-रामोशी यांच्या बंडात लहूजींनी हकिंग मेकर च्या भूमिकेत १८२६ मध्ये उमाजी नाईक यास राजा म्हणून घोषित केले.
- इंग्रजांपासून त्यांनी पुण्याबाहेर पडल्यानंतर कृष्णा खोरे, वारणा खोरे, पालिला डोंगर, सातारा, पन्हाळा या भागात प्रशिक्षण केंद्र उभारले.
- वासुदेव फडके यांना १८८० या बंडात साथ.
- इ. स. १८५७ च्या उठावातही लहूजींचे योगदान
- तात्या टोपे लहूजीच्या कार्यामुळे प्रेरित झाले.
- लहूजींच्या पूर्वजांना शिवाजी महाराजाती 'राऊत' या पदवीने गौरविण्यात आले होते.
- **लोकमान्य टिळक यांचे लहूजी बद्दल मत :**
  युद्धकलेत निपूण आणि ज्याच्यापुढे नतमस्तक असे व्यक्तीमत्त्व सद्यातरी लहूजी वस्ताद शिवाय दुसरे नाही.

## २६. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (१९०९-१९६८)

**संपूर्ण नाव :** माणिक बंडोजी इंगळे
**जन्म :** ३० एप्रिल १९०९ (यावली - अमरावती)
**मृत्यू :** ११ ऑक्टोबर १९६८ (गुरूकुंज आश्रम - अमरावती)
**आई :** मंजुळा माता
**वडिल :** बंडोपंत
**गुरू :** आडकोजी महाराज

- **कार्ये :**

- १५ जानेवारी १९२५ गृहत्याग करून तपोसाधनेसाठी रामटेकच्या उभारण्यात निघाले, सात महिने श्रिराम मंदिर, नारायण टेकडी, कापूरबावडी परिसरात योगसाधना.
- १ ऑक्टोबर १९२५ चंद्रपूर जिल्ह्यातील नेरिला कृष्णराव भुते यांच्या आग्रहाने गेले. चिमुरच्या बालाजी मंदीरात भजन गायले.
- १९२६ सहा महिने राम दिघी, सात बहिनी पहाड आणि ताडोबाच्या वनात वास्तव्य केले.
- १९२९ श्रीतुकड्यादासकृत भजनावली प्रकाशित, सध्या स्वानंदामृत भजनावली असे नाव आहे.
- १९३५ सालबर्डीच्या यज्ञान दहा लाख लोकांची उपस्थिती.
- ४ एप्रिल १९३५ मोझरी धर्मसेवा आश्रमाचे भूमीपुजन
- ३१ माचे १९३६ महात्मा गांधी यांनी राष्ट्रसंतांना सेवाग्रामला बोलविले.
- ५ मे १९३६ पवनार आश्रमात आचार्य विनोबा भावे यांनी महाराजांना संमेलनात सहभागी होण्यासाठी आमंत्रन दिले.
- १९४० आकोल्याच्या शिख धर्म परिषदेत सहभाग.
  - गावागावात आरती मंडळ स्थापन करून लोकजागृती.
  - आदिवासींना जीवन जगण्याचा पाठ दिला.
- १९४१ वरखेडला श्री गुरूदेव चरखा संघ स्थापना.
- २५ सप्टेबर १९४२ बेलापूर साखर कारखान्यातील भजनानंतर महाराजांना क्रांतीवीर तुकडोजी अशी ओळख.
- १९४२ मोझरीत राष्ट्रधर्म शिक्षण वर्गात मर्दानी व मैदानी व्यायामाचे शिक्षण.
  - अब काहे को धुम मचाते हो या भजनावरुन राष्ट्रसंतांना अटक करून नागपूर, रायपूरच्या तुरूंगात टाकण्यात आले होते.
- १९४३ श्री गुरूदेव मासिक सुरू

- १९४४ अनेक गावांमध्ये महिलामंडळ आणि राष्ट्रसेविका समितीची स्थापना.
- ११ नोव्हेंबर १९४७ रामटेकचे मंदिर हरिजनांसाठी खुले.
- १९४९ आमगावात सामुदायीक शेतीचा यशस्वी प्रयोग राबविला.
- १९५३ - १५ व्या विदर्भ साहित्य संघाचे उद्‌घाटक व आयोजक पदाचा मान.
- २२ जुलै १९५३ पंढरपूर येथील चंद्रभागेच्या तीरी राष्ट्रसंतांना ग्रामगिता लेखणाची प्रेरणा मिळाली.
- ३१ जुलै १९६७ अध्यात्म केंद्राची स्थापना
- ६ जुलै १९६८ पंढरपूर येथील हनुमान मंदिर मैदानात आषाढी एकादशीला अखेरचे भजन.
- ११ ऑक्टोबर १९६८ सायंकाळी ४ वाजून ५८ मिनीटांनी महानिर्वान.

- **राष्ट्रसंतांची साहित्य संपदा :**

**मराठीतील साहित्य -**

| | | |
|---|---|---|
| भजने - ११६० | अभंग - २१०९ | श्लोक - ६७६ |
| ओव्या - ५१४९ | पोवाडे - १० | मंगलअष्टके - ११ |

**हिंदीतील साहित्य -**

| | | |
|---|---|---|
| भजने - २३६९ | बरखा - १७४६ | सदविचार - १५१७ |
| प्रार्थनाष्टक - ०८ | मंगलअष्टक - ०५ | |

## २७. लोकहितवादी (१८२३-१८९२)

**नाव :** गोपाळ हरी देशमुख (मुळ अडनाव - सिद्धय)
**जन्म :** १८ फेब्रुवारी १८२३, पुणे
**मृत्यू :** ९ ऑक्टोबर १८९२
**वडील :** बाजीराव पेशव्यांचे सेनापती बापू गोखले यांचे फडणीस होते वतनावरून ते देशमुख होते.

- १८४१ इंग्रजी शाळेत प्रवेश, इतिहास आवडता विषय होता. संस्कृत, फारशी, गुजराती, हिंदी भाषा अवगत.
- १८४४ भाषांतरकार म्हणून नोकरी.
- १८४६ मुन्सीफची परीक्षा उत्तीर्ण
- १८४८ प्रभाकर या साप्ताहिकात शतपत्रे ही लेखमाला प्रसिद्ध.
- १८४८ पुणे नेटीव्ह जनरल लायब्ररी स्थापन.
- १८५२ फर्स्ट क्लास मुन्सक म्हणुन वाई येथे नियुक्ती.
- १८५६ असिस्टंट कमिशन पदावर नियुक्ती.
- १८६२ अहमदाबादला असिस्टंट जज, अहमदनगरला जज म्हणून नियुक्ती.
- १८६३ सनदी परीक्षा उत्तीर्ण, नाशिकला जॉइंट सेशन जज.
- ५ जून १८६९ मुंबई विनायकराव करमकर व वेणुबाई यांचा जो पुनर्विवाह झाला. त्यांच्या समर्थ तीर्थ जे पत्रक प्रसिद्ध झाले. त्यात गोपाळराव देशमुख यांचेही नाव.
- १८७९ जस्टिस ऑफ पिस, रावबहादूर पदवीने सन्मानित.
- १८८० मुंबई विधिमंळाचे सदस्य, रतलाम संस्थानाचे दिवाण.
- १८८२ लोकहितवादी (मासिक) सुरु
- १८८३ लोकहितवादी (त्रेमासिक) सुरु
- **लोकहितवादी यांनी सुरू केलेले वृत्तपत्र :**

| **वृत्तपत्र** | **स्थापना** | **ठिकाण** |
|---|---|---|
| मित्रोदय | १८४४ | पुणे |
| ज्ञानप्रसारक | १८५३ | कोल्हापूर |
| वर्तमान संग्रह | १८५३ | कोल्हापूर |
| जगन्मित्र | १८५४ | रत्नागिरी |
| परशु | १८५६ | जमखिंडी |
| शुभसूचक | १८५८ | सातारा |

- **लोकहितवादीचे साहित्य :** समाज, धर्म, अर्थ, इतिहास आदी विषयांवर त्यांनी लेखन केले.
- **ग्रंथ :** ग्रामरचना, लक्ष्मी ज्ञान, हिंदुस्तानचा इतिहास, गुजरात लंका, राजस्थान, पानिपत, पृथ्वीराज चौहाणचा इतिहास.
- इ. स. १८४८ ते ९२ या काळात लोकहितवादीनी विविध विषयांवर लेख लिहिले आहेत. राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांवर त्यांनी पुढील ग्रंथ लिहिले.

१) लक्ष्मीज्ञान - १८४९
२) भारतखंड पूर्व - १८५१
३) हिंदूस्थानचा इतिहास, पूर्वाध, The History of British Empire in India (ग्लीनच्या ग्रंथाचा अनुवाद) ठाणे - १८७८
४) पनिपतची लढाई (काशीराज पंडित यांच्या फारशी ग्रंथाच्या इंग्रजी भाषांतराचा मराठी अनुवाद) १८७७
५) ऐतिहासिक गोष्ट - भाग १, २ व ३ (१८७७, ७८, ७९)
६) हिंदूस्थानात दरिद्रयता येण्याची कारणे व त्यांचा परिवार आणि व्यापारविषयी विचार (१८७६)
७) अश्रलायन गृहासुत्र (अनुवाद) मुंबई - १८८०
८) स्थानिक स्वराज्य व्यवस्था, पुणे (१८८२-८३)
९) ग्रामरचना त्यातील व्यवस्था आणि त्यांची हल्ली स्थिती, पुणे. (१८८३)
१०)गुजरात देशाचा इतिहास, पुणे - १८८५
११)लंकेचा इतिहास, पुणे - १८८८
१२)सौराष्ट्र देशाचा इतिहास, पुणे - १८९१
१३) उदयपूरचा इतिहास कर्नल रॉकच्या Analist anti auities of Rajasthan या ग्रंथाचे भाषांतर
१४) पृथ्वीराज चौहानचा इतिहास
१५) स्वाध्याय (स्वातंत्र्य) प्राचीन आर्थविधांचा क्रम, विचार व परिक्षण
१६)आगमप्रकाश (मुळ ग्रंथ गुजराती)
१७)होळीविषयी उपदेश

## २८. चाफेकर बंधू

दामोदर, वासुदेव व बाळकृष्ण पंत हे तिघे चाफेकर बंधू होते. वासुदेव चाफेकरांचा जन्म १८८० मध्ये कोकणात चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झला. त्यांनी मराठी भाषेतून शिक्षण घेतले. कालांतराने ते पुण्यातील चिंचवड येथे स्थायीक झाले. वडील हरिपंत पुणे व मुंबईत हरिकथा सांगायचे त्यामुळे चाफेकर बंधूच्या शिक्षणात खंड पडला. बालवयात तिघेही भाऊ हरी किर्तनात वडिलांना मदत करायचे, पुण्यातील राजकीय घडामोडींना प्रेरित होऊन चळवळीकडे वळले. बिटीशांनी आणलेल्या संमती वयाच्या विधेयकास त्यांचा तीव्र विरोध होता.

भारतीय संस्कृतीत हस्तक्षेप करणाऱ्या ब्रिटिशानविरुद्ध टिळकांनी केसरी मधून घणाघाती प्रहार करण्यास सुरूवात केली होती. या अवाहनाने तिन्ही भाऊ प्रेरित झाले व त्यांनी लोकसंघटन केले.

इंग्लंडच्या राणीच्या राज्यरोहणाचा हिरक महोत्सव घोषित झालेला दिवस १७ फेब्रुवारी १८९७ हा होता. या वेळेपर्यंत पुण्यात कमिशनर रँडने प्लेग या आजाराच्या निमीत्ताने प्रजेला मदत देण्याऐवजी अनेक प्रकारचे अत्याचार केले होते. या निमित्ताने दहशत वाढवण्याचा प्रयत्नही झाला होता.

२२ जून १८९७ रोजी दामोदर पंत चाफेकर बंधूनी मध्यरात्री नंतर गणेश खिंडीतील गव्हर्नर साहेबांकडे मेजवानी आटपून घोडागाडीतून शहरात परतनाऱ्या कॅ. रँड व आयस्टर वर गोळ्या झाडल्या. आयस्टर तर जागेवरच ठार झाला तर रँड साहेब ३ जुलै १८९७ ला मृत्यू पावले.

चाफेकर बंधू निसटण्यात यशस्वी झाले नंतर तिघा भावांनाही पकडण्यात आले. दामोदरला मुंबईत अटक झाली व १८ एप्रिल १८९८ रोजी त्यास फासावर चढवण्यात आले. त्याच पाठोपाठ वासुदेवाला ८ मे १८९९ व बाळकृष्णाला १६ मे १८९९ रोजी फासावर चढवण्यात आले व चाफेकर बंधू शहिद झाले.

## २९. दादाभाई नौरोजी (१८२५-१९१७)

**जन्म :** ४ सप्टेंबर १८२५

**मृत्यू :** ३० जून १९१७

- मुंबईच्या नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी संस्थेच्या शाळेत शिक्षण पूर्ण.
- शिक्षण पूर्ण झाल्यावर मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणून काम केले. त्या कॉलेजमधले पहिले भारतीय प्राध्यापक.
- १८४८ दादोबा पांडुरंग, भाऊदाजी लाड यांच्या मदतीने ज्ञान प्रसारक सभा ही संस्था स्थापन केली. मुंबईत या सभेने पहिली मुलींची शाळा सुरु केली.
- १८५१ रास्त गोफ्तार हे साप्ताहिक लोकांमध्ये सामाजिक व राजकीय जागृती घडून आणण्यासाठी सुरू केले.
- १८५२ नाना शंकर शेठ व भाऊ दाजी लाड यांच्या सहकार्याने बॉम्बे असोसिएशनच्या राजकीय संघटनेची स्थापना.
- १८५२ मुंबई - बॉम्बे असोसिएशनची स्थापना.
- १८५५ इंग्लडमध्ये ईस्ट इंडिया असोसिएशनच्या मार्फत भारतीय जनतेचे प्रश्न ब्रिटीश सरकारकडून निदर्शनास आणुन देण्याचे कार्य केले.
- १८६५ लंडन येथे लंडन इंडिया सोसायटीची स्थापना.
- १८६६ भारतीय जनतेचे प्रश्न इंग्लडच्या पार्लमेंट मध्ये मांडता यावे यासाठी ईस्ट इंडिया असोसिएशनची स्थापना.
- १८६६ इंग्लडमध्ये ईस्ट इंडिया सोसायटीची स्थापना.
- १८६७ भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा अंदाज लावण्याचा पहिला प्रयत्न केला.
- १८७३ ब्रिटीश पार्लमेंटच्या समिती समोर भारताच्या आर्थिक स्थितीबद्दल साक्ष दिली. त्याच वेळी लुटीचा सिद्धांत - नि:सारण सिद्धांत (Drain theory) मांडला.

- १८७५-१८८३ मुंबई महानगरपालिकेचे सदस्य.
- १८८३ लाहोर व १९०६ कलकत्ता येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष.
- १८८५ मुंबई प्रांतिक कायदेमंडळाचे सदस्य म्हणून नियुक्ती.
- १८८५-१९०५ मवाळ मनवादी कालखंडातील काँग्रेसचे नेतृत्त्व केले.
- १८८५, १८९३, १९०६ या ३ वेळा राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष.
- १८८६ कलकत्त्यातील काँग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनाचे ते पहिले पारशी अध्यक्ष.
- १८९२ इंग्लडच्या हुजुर पक्ष्यामार्फत फिन्सबरी मतदार संघातून निवडून आले. हाऊस ऑफ कॉमन्स वर निवडून जाणारे पहिले भारतीय.
- १८९७ वेल्बी कमिशनपुढे साक्ष
- १९०२ हाऊस ऑफ कॉमन्सचे सदस्य इंग्लडच्या फिन्सबरी मतदार संघातून निवड. ब्रिटिश संसदेचे ते पहिले हिंदी सदस्य बनले. रॉयल कमिशनचे पहिले भारतीय सदस्यही तेच.
- १९०६ कलकत्ता येथील अधिवेशनाच्या अध्यक्षीय पदावरून बोलतांना त्यांनी स्वराज्य हे राष्ट्रीय काँग्रेसचे ध्येय आहे. हे जाहिर केले. स्वदेशी स्वराज्य राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार चतु:सुत्रीचा ठराव पास केला.
- पॉवर्टी अँड अन ब्रिटीश रूल इन इंडिया या त्यांच्या ग्रंथात त्यांनी सिद्ध केले की, भारतीय जनतेच्या दारिद्र्यास ब्रिटीश शासनच जबाबदार आहे.
  याच पुस्तकात मांडलेल्या सिद्धांतापैकी लुटिचा सिद्धांत महत्त्वाचा माणला जातो.
- राजकीय व सामाजिक कार्यातील संस्था ज्ञान प्रसारक सभा बॉम्बे असोसिएशन स्टुडंट लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी, पार्शी जिम खाणा कावसनी इन्स्टीट्यूट अल्बट म्युझिअम इ. संस्थामध्ये प्रमुख सहभाग.
- न्या. रानडे यांनी भारतीय राजकारणातील अद्विदल व्यक्ती' त्यांचे अशा शब्दात वर्णन केले.
- दादाभाई नौरोजी हे उदार मतवादाचे पुरस्कर्ते होते.
- भारताचे 'पितामह' म्हणून नौरोजी यांना ओळखले जाते.
- भारतीय अर्थशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाते.

## ३०. प्रकाश आमटे (२६ डिसेंबर १९४८)

**निवासस्थान :** हेमलकसा, गडचिरोली
**शिक्षण :** एमबीबीएस

- १९७३ पासुन समाजसेवेत कार्यरत
- १९८४ आदिवासी सेवक पुरस्कार
- २००२ पद्मश्री पुरस्कार
- २००८ रॅमन मॅगसेस
- २००९ गॉडफ्रे फिलिप्स जीवनगौरव पुरस्कार
- २०१२ लोकमान्य टिळक पुरस्कार
- २०१३ प्रकाशवाटा (२०१३ पर्यंत २५ आवृत्या)
- २०१३ रानमित्र
- २०१४ मदर तेरेसा पुरस्कार
- १० ऑक्टोबर २०१४ डॉ. प्रकाश आमटे - द रियल हिरो चित्रपट प्रदर्शीत
- २०१७ पिंपरी येथील संस्कार प्रतिष्ठानतर्फे श्री स्वामी विवेकानंद जीवनगौरव पुरस्कार
- **संस्था :** लोकबिरादरी प्रकल्प या नावाने आदिवासी लोकांसाठी दवाखाना.

## ३१. पु. ल. देशपांडे (१९१९-२०००)

**नाव :** पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे
**टोपन नाव :** पु. ल. भाई
**जन्म :** ८ नोव्हेंबर १९१९ (मुंबई)
**मृत्यू :** १२ जून २०००, पुणे
**पुरस्कार :**

- पद्मश्री सन्मान
- साहित्या अकादमी
- साहित्य संमेलनाचे अध्यक्ष
- संगीत नाटक अकादमी
- महाराष्ट्र भुषण
- महाराष्ट्र राज्य वाङमय पुरस्कार
- विष्णुदास भावे पुरस्कार

**शिक्षण :**

- पार्ले टिळक विद्यालय शालेय शिक्षण
- फर्ग्युसन कॉलेजमधुन बी. ए. व एम. ए. झाले.
- मुंबईत इस्माईल युसुफ कॉलेजमधून एल. एल. बी. झाले.

**कार्यक्षेत्र :** मराठी लेखक, नाटककार, नट, कथाकार, दिग्दर्शक, पटकथाकार, संगीत दिग्दर्शक, विनोदकार, गायक

- ओरिएंटल हायस्कुलमध्ये शिक्षक म्हणून काम केले.
- १९४४ साली पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेले पहिले व्यक्तिचित्रे भय्या ''भय्या नागपूरकर''
- १९४६ सुनिता देशपांडे सोबत विवाह.
- १९४७ ते १९५४ चित्रपटांमध्ये काम केले. 'गुळाचा गणपती, या चित्रपटात त्यांनी अष्टपैलू कामगिरी केली.
- १९५५ ला आकाशवाणीत नोकरीला लागले.
- १९५९ पु. ल. देशपांडे भारतातील पहिले दुरचित्रवाणी कार्यक्रम निर्माते झाले.
- पंडित नेहरुची दुरदर्शनसाठी मुलाखत घेणारे पु. ल. हे भारतीय दुरदर्शनचे पहिले मुलाखतकार होते.
- नाचरे मोरा नाच हे गाणे प्रसिद्ध झाले.
- गोळाबेरीज (१९६०), नस्ती उठाठेव (१९५२)
- मराठी वाङमयाचा इतिहास (१९९४) इत्यादी कादबंऱ्या प्रसिद्ध आहे.

## ३२. बाबा आमटे (१९१४-२००८)

**जन्म :** २६ डिसेंबर १९१४
**मृत्यू :** ९ फेब्रुवारी २००८
**पुर्ण नाव :** मुरलीधर देवीदास आमटे
**टोपन नाव :** बाबा आमटे
**बाबा आमटे यांना भारताचे आधुनिक संत असेही म्हणतात.**

- १९३४ बी. ए. पूर्ण केले.
- १९३६ एल. एल. बी. पूर्ण केले.
- १९४३ वंदे मातरम् ची घोषणा केल्याबद्दल २१ दिवसांचा तुरूंगवास.
- १९४९ महारोगी सेवा समीतीची स्थापना.
- १९४९-५० जवाहरलाल नेहरुंच्या शिफारशीमुळे कुष्ठरोगनिदानातील आणि चिकित्सेवरील निदानासाठी अभ्यास.

- १९५२ वरोड्याजवळ आनंदवनाची स्थापना (कुष्ठरोग्यांसाठी)
- १९८५ भारत जोडो अभियान (राष्ट्रीय एकात्मतेचा प्रसार करण्यासाठी)
- ९ फेब्रुवारी २००८ रक्ताच्या कर्करोगाने मृत्यू.

- **बाबा आमटे यांच्या कुष्ठरोग्यांसाठी स्थापना केलेल्या संस्था :**

१) आनंदवन - चंद्रपूर (वरोरा) २) सोमनाथ प्रकल्प - मुल (चंद्रपूर)
३) अशोकवन - नागपूर ४) लोकबिरादरी प्रकल्प - हेमलका

- **बाबा आमटे यांनी लिहीलेली पुस्तके :**

१) ज्वाला आणि फुले - कवितासंग्रह २) उज्ज्वल उदयासाठी - काव्य
३) माती जागवील त्याला मत

- **पुरस्कार :**

१. १९८३ डेमियन डट्टन पुरस्कार - अमेरिका
२. १९८९ आंतरराष्ट्रीय जिराफे पुरस्कार - अमेरिका
३. १९९० टेपल्टन बहुमान पुरस्कार - अमेरिका
४. १९९१ पर्यावरण विषयक कामासाठी संयुक्त राष्ट्रे यांचा रोल ऑफ ऑनर
५. ग्लोबल ५०० पुरस्कार
६. १९९१ राईट लाइव्हलीहूड आवार्ड - स्वीडन
७. १९९८ संयुक्त राष्ट्र मानवी हक्क पुरस्कार
८. १९९९ डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार आणि रॅमन मॅगसेस पुरस्कार
९. ४ डिसेंबर २००४ पावलीस मार ग्रेगारियस पुरस्कार

- **भारतीय पुरस्कार :**

१. १९७१ पद्मश्री
२. दलीत मित्र पुरस्कार
३. १९७८ राष्ट्रीय भुषण पुरस्कार
४. १९७९ जमनलाल बजाज पुरस्कार
५. १९८० एन. डी. दिवाण पुरस्कार
६. १९८० डी. लिट पुरस्कार - नागपूर विद्यापीठ
७. १९८५ मध्यप्रदेश सरकारचा इंदिरा गांधी पुरस्कार
८. १९८५-८६ डी. लिट पुरस्कार - पुणे विद्यापीठ
९. १९८६ पद्मविभुषण
१०. १९८६ अपंग कल्याण पुरस्कार
११.१९८६ पहिला जी. डी. बिर्ला पुरस्कार
१२. १९८७ राजाराममोहन रॉय पुरस्कार
१३.१९८८ जी. डी. बिर्ला आंतरराष्ट्रीय पुरस्कार
१४. १९९१ महाराष्ट्रातील आदीवासी सेवक पुरस्कार
१५.१९९८ जस्टीस के. एस. हेगडे पुरस्कार - कर्नाटक
१६. १९९८ महाराष्ट्र शासनाचा सावित्री फुले पुरस्कार
१७.१९९९ गांधी शांतता पुरस्कार
१८ २००८ भरतवास पुरस्कार
१९.१ मे २००५ महाराष्ट्रभूषण पुरस्कार २००४ (महाराष्ट्राचा सर्वोच्च पुरस्कार)

## ३३. प्रबोधनकार ठाकरे (१८८५-१९७३)

**नाव :** केशव सिताराम ठाकरे

**जन्म :** १७ सप्टेंबर १८८५ (रायगड जिल्ह्यातील पनवेल येथे झाला.)

हे मराठी पत्रकार, समाजसुधारक, वक्ते, संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे पुढारी होते. त्याचबरोबर इतिहास संशोधकही होते. शिवसेनेचे संस्थापक बाळ ठाकरे हे त्यांचे पुत्र महात्मा फुले हे केशव ठाकरेंचे आदर्श होते. महात्मा फुलेंच्या साहित्याचा अभ्यास करूनच केशव ठाकरेंच्या समाजसुधारनेबाबत संकल्पना स्पष्ट झाल्या.

सामाजिक सुधारणा हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. बालविवाह, विधवांच्या केशवपनाची अभद्र रुढी, देवळातील ब्राह्मण पुजाऱ्यांची अरेरावी, हुकूमशाही असो की, अस्पृश्यता किंवा हुंडाप्रथा असो ते या सर्व आघाड्यांवर आखेरपर्यंत लढत राहीले.

अन्याय्य रुढी, जाती-व्यवस्था आणि अस्पृश्यता दूर करण्यासाठी वक्तृत्व, लेखन व प्रत्यक्ष कृती ही तीन शस्त्रे वापरून त्यांनी पुराणमतवाद्यांशी लढा दिला. समाजातील सर्व विकारांचे मर्म ब्राह्मणी कर्मकांडात आहे असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांनी ब्राह्मणशाहीला नेहमी विरोध केला खरा ब्राह्मण या नाटकाच्या माध्यमातून त्यांनी खऱ्या ब्राह्मणाची भूमिका मांडली.

मुंबईत त्यांनी हुंडाप्रतिबंधक चळवळ हाती घेतली. हुंडाप्रतिबंधक स्वयंसेवक सेना स्थापन केली. शाहू महाराज म्हणतात. ''लाच देऊन ज्याला वश करता येत नाही किंवा विकत घेता येणार नाही अशी एकच व्यक्ती मी पाहिली आहे. ती म्हणजे प्रबोधनकार होय.''

- **नियतकालिके :** प्रबोधन, सारथी, लोकहितवादी
- **ग्रंथ :** कोदंडाचा टणत्कार, भिक्षुकशाहीचे बंड, देवाचा धर्म की, धर्माची देवळे, ग्रामधान्याचा इतिहास, क्रमरिकांचे शाप, वक्तृत्वशास्त्र सातारचे दैव की देवाचा साताश, ग्रामण्याचा साद्यंत इतिहास, हिंदवी स्वराज्याचा खून, शेतकऱ्याचे स्वराज्य, शानिमहात्म्य इ. ग्रंथ त्यांनी लिहिले.
- **चरित्र :** समर्थ रामदास, संत गाडगे महाराज, रंगो बापूजी, पंडिता रमाबाई, माझी जीवनगाथा हे आत्मचिरत्र लिहिले.
- **नाटके :**

खरा ब्राह्मण, टाकलेले पोर, संगीत सीताशुद्धी, संगीत विधिनिषेध

त्यांचे हे साहित्य समाजसुधारणेसाठी क्रांतीकारकच ठरले.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ हा त्यांच्या जीवनातील सर्वात मोठा लढा होता. या चळवळीत त्यांनी वेगवेगळ्या विचारांच्या व्यक्ती आणि पक्ष यांना बांधून ठेवण्यात यश मिळवले. ते कुशल संघटकही होते.

केशव ठाकरे यांचे आधुनिक महाराष्ट्राच्या, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, वाङमयीन, इतिहासविषयक व नाट्य क्षेत्रातील योगदान मोलाचे आहे.

- १९०२ ठाकरेंचे वडिल सिताराम रामचंद्र घोडपकर यांचे निधन झाले.
- शिक्षण - पाचवीपर्यंतचे शिक्षण पनवेल येथे झाले. सहावीसाठी कल्याणला गेले. पुढील शिक्षणासाठी देवास (मध्य प्रदेश) येथील व्हिक्टोरिया हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला.
- १९०५-०६ च्या स्वदेशी आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला होता.
- १९१० मध्ये त्यांचा विवाह रमाबाई यांचीशी झाला.
- १९१६-१७ होमरूळ लीग चळवळीत सहभाग विविध नेत्यांची भाषणे टिपूण ते शब्दलिखित करून वृत्तपत्रात प्रकाशित करायचे.
- १९१४-१८ या काळात वक्तृत्वशास्त्र या ग्रंथाचे लेखन केले.
- १६ ऑक्टोबर १९२१ प्रबोधन पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.

सत्यशोधक विचारसरणीच्या प्रचारासाठीच त्यांनी प्रबोधन हे नियतकालिक सुरू केले. हे खूपच गाजले होते.

त्यातूनच त्यांना प्रबोधनकार ही पदवी प्राप्त झाली.

- १७ नोव्हेंबर १९१८ कोदंडाचा टणत्कार हा ग्रंथ प्रकाशित झाला.
- १९४७ प्रतापसिंग छत्रपती आणि रंगो बापूजी हा ग्रंथ प्रकाशित केला.

## ३४. पांडुरंग महादेव बापट (सेनापती बापट) (१८८०-१९६७)

**जन्म :** १२ नोव्हेंबर १८८०, पारनेर (जि. अहमदनगर)
**मृत्यू :** २८ नोव्हेंबर १९६७ - मुंबई
**वडील :** महादेव बापट
**आई :** गंगाबाई बापट
**चळवळ :** भारतीय स्वातंत्र्यलढा

- **शिक्षण :**

- सेनापती बापट यांचे प्राथमिक, माध्यमिक व बी. ए. पर्यंतचे उच्च शिक्षण पुणे येथे झाले.
- अहमदनगरला मॅट्रीकची परीक्षा दिली, तेव्हा त्यांना संस्कृतची 'जगन्नाथ शंकरशेठ' शिष्यवृत्ती मिळाली.
- १९०३ साली बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मुंबई विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळवून इंग्लंडला गेले.
- एडिंबरो येथे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.
- पारनेर मधील घर सेनापती बापट स्मारक म्हणून ओळखले जाते.

**कार्य :**

- स्वातंत्र्यवीर सावरकरांनी गुप्तपणे बॉम्ब तयार करण्याची कला शिकली व त्यांचे सहकारी सेनापती बापट आणि हेमचंद्र दास या सहकारी मित्रांना हे तंत्र शिकण्यास पॅरिसला पाठवले.
- अलीपूर बॉम्ब खटल्यात सहभागी असल्याचा अरोप सेनापती बापट यांच्यावर होता.
- १९२१ पर्यंत स्वत:च्या गावी शिक्षक म्हणून राहीले व समाजसेवा हेच व्रत घेतले.
- १९२१ ते १९२४ या कालखंडात पुणे जिल्ह्यातील मुळशी पेटा येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांना जमीन मिळविण्याकरिता सत्याग्रह अंदोलन चालवले.
- स्वातंत्र्योत्तर काळातही भाववाढ विरोधी आंदोलन, गोवामुक्ती आंदोलन, संयुक्त महराष्ट्र आंदोलन इत्यादी आंदोलनात बापटांचा पुढाकार.
- एप्रिल १९१५ मध्ये पुण्यात वासुकाका जोशी यांच्या चित्रमयजगत या मासिकेत नोकरी करु लागले.
- लोकमान्य टिळकांच्या इंग्रजी वृत्तपत्रात, दैनिक मराठात ही नोकरी केली.
- मराठा सोडल्यानंतर लोकसंग्रह नावाच्या दैनिकात राजकारणावर लिखाण करू लागले.
- डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या ज्ञानकोशाचे कामही बघत.
- सेनापती बापट यांनी मुंबईत झाडूवाल्यांचे नेतृत्त्व केले.
- त्यासाठी मुंबईच्या संदेश नावाच्या वृत्तपत्रात मोठे निवेदन दिले.
- बापट यांनी झाडू-कामगार मित्रमंडळाची स्थापना केली.
- अंदमानमध्ये काळ्या पाण्याची जन्मठेप भोगत असलेल्या कैद्यांच्या सुटकेसाठी डॉ. नारायण दामोदर सावरकर यांच्यासह एक सह्यांची मोहिम चालविली.
- यासाठी राजबंदी मुक्ती मंडळ स्थापन केले.
- १९४४ साली नागपूर येथे बापट यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी परिषदेचे आयोजन कण्यात आले.

## ३५. विनायक दामोदर सावरकर (१८८३-१९६६)

**जन्म :** २८ मे १८८३, भगूर (नाशिक)

- भारतीय स्वातंत्र्य सैनिक, मराठी कवी आणि लेखक
- विज्ञानाचा पुरस्कार व जातीभेदाचा विरोध करणारे समाज क्रांतीकारक
- भाषाशुद्धी, लीपी शुद्धी चळवळीचे प्रनेते

**प्रभाव -** शिवाजी महाराज, जोसेफ मॅझिनी

**प्रभावित -** नथुराम गोडसे, अटलबिहारी वाजपेयी, नरेंद्र मोदी, अमित शहा

- चाफेकर बंधुना फाशी दिल्याचे कळाल्यावर - कुलदेवता भगवतीच्या पुढे 'मारिता मारिता मरेतो झुंजेन' अशी शपत घेतली.
- १९०९ मध्ये यमुना बाई सोबत विवाह
- १९०२ फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश.
- १९०६ उच्च शिक्षणासाठी लंडन.
- राष्ट्रभक्त समुह ही गुप्त संघटना - पागे व म्हस्कर यांच्या मदतीने स्थापन. या संघटनेचे पुढे अभिनव भारत संघटनेत रुपांतर.
- १९०५ मध्ये पुण्यात विदेशी कापडाची होळी.
- श्यामजी कृष्णवर्मा यांनी ठेवलेली शिवाजी शिष्यवृत्ती वि.दा.सावरकर यांना मिळवून देण्याचे काम लोकमान्य टिळकांनी केले.
- लंडनला - इंडिया हाऊसमध्ये भारताचे क्रांतीपर्व सुरु केले.
- मदनलाल धिंद्रा हा सावरकरांचा पहिला हुतात्मा शिष्य.
- १८५७ मध्ये झालेल्या उठावाचा साधार इतिहास सावरकरांनी लिहीला. १८५७ चे स्वातंत्र्य समर हा ग्रंथ प्रकाशनापूर्वी ब्रिटीशांनी हा ग्रंथ जप्त केला.
- सावरकरांचा मित्र कुटिन्हो यांनी या ग्रंथाची मुळ हस्तलिखीत प्रत जपून ठेवली होती. स्वातंत्र्यानंतर प्रकाशित.
- सावरकरांना २ जन्मठेपांची सुमारे ५० वर्षे अंदमानच्या तुरुंगात ठेवण्यात आले.
- बाभळीच्या काट्यांनी त्यांनी तुरुंगाच्या भिंतीवर महाकाव्ये लिहिली.
- विठ्ठलभाई पटेल, रंगस्वामी अय्यंगार यांच्या प्रयत्नांनी आणि सावरकरांनी ब्रिटीशांची काही बंधने मान्य केल्यामुळे सुटका.
- रत्नागिरी येथे पतित पावन मंदीराची स्थापना केली.
- जातीभेद कमी करण्यासाठी - सामाईक भोजनालये सुरु.
- १९३७ हिंदू महासभेचे अध्यक्षपद भुषवले (७ वर्षे)
- १९३८ अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाचे अध्यक्ष - मुंबई
- **सावरकर साहित्य :**

\- निबंधकार, नाटककार, कादंबऱ्यांचा लेखक, ग्रंथकार, इतिहासकार, भाषाशास्त्रज्ञ.
पहिले काव्य - फटका (११ व्या वर्षी)

- **ग्रंथ व पुस्तके :**

**प्रचंड प्रसिद्ध कविता :**

१. सागरा प्राण तळमळला
२. हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा
३. जयोस्तुते
४. तानाजीचा पोवाडा

- **महत्त्वाची पुस्तके :**
  १) अखंड सावधान असावे. २) १८५७ चे स्वातंत्र्य समर
  ३) अंधश्रद्धा भाग १ आणि भाग २ ४) गांधी आणि गोंधळ
  ५) माझी जन्मठेप ६) हिंदूत्व
  ७) क्ष-किरण
- **इतिहास :**
  १. भारताच्या इतिहासातील ६ सोनेरी पाने २. हिंदूपदपादशाही
- **कादंबरी :**
  १) काळेपाणी २) मला काय त्याचे (मोल्यांचे मंड)
- **आत्मचरित्रपर :**
  १) माझी जन्मठेप २) शत्रुच्या शिबीरात ३) अथांग
- **नाटके :**
  १) बोधीवृक्ष (अपूर्ण) २) संगीत उत्तरक्रिया
- **महाकाव्ये :**
  १) कमला २) गोमांतक ३) विरहोच्छवास ४) सप्तर्षी
- **पुरस्कार :** (सावरकरांच्या नावाने अनेक पुरस्कार दिले जातात)

१) निनाद तर्फे - स्वातंत्र्यवीर सावरकर ध्येयवादी
२) दादर - स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या वतीने
   १. स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय पुरस्कार २. विज्ञान पुरस्कार
   ३. समाजसेवा पुरस्कार ४. शौर्य पुरस्कार
३) वीर सावरकर फाऊंडेशन - वीर सावरकर पुरस्कार

- **संपादीत लेख -** गाय हा एक उपयुक्त पशू
- सावरकरांना स्वातंत्र्यवीर ही उपाधी - प्रसिद्ध मराठी लेखक व पत्रकार प्रल्हाद केशव अत्रे यांनी दिली.
- मृत्यूपत्रात - माझे प्रेत शक्यतो विद्युत चितेवरच जाळण्यात यावे.
  **मृत्यू :** १ फेब्रुवारी १९६६ (वयाच्या ८३ व्या वर्षी)
  अन्न, पाणी, औषधांचा त्याग करण्याचा निर्णय
- २६ फेब्रुवारी १९६६ ला मृत्यू.

## ३६. लोकमान्य टिळक (१९५६-१९२०)

**जन्म :** २३ जुलै १८५६
**मृत्यू :** १ ऑगस्ट १९२० (पुणे - महाराष्ट्र)
**पूर्ण नाव :** केशव गंगाधर टिळक
**जन्मस्थान :** रत्नागिरी, महाराष्ट्र
**मुळ गाव :** चिखलगाव
**आई :** पार्वतीबाई
**पुरस्कार :** लोकमान्य, भारतीय असंतोषाचे जनक
**प्रभाव :** शिवाजी महाराज, तात्या टोपे, महाराणा प्रताप
**प्रभावित :** महात्मा गांधी, चाफेकर बंधू, स्वातंत्र्यवीर सावरकर, नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणविस, बाळासाहेब ठाकरे.

**वडील :** गंगाधर रामचंद्र टिळक

**पत्नी :** सत्यभामाबाई

**अपत्ये :** श्रीधर बळवंत टिळक

- जानेवारी १८८० न्यु इंग्लिश स्कूलची स्थापना
- १८८४ डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना.
- १८८५ वरील याच संस्थेतर्फे १८८५ मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.
- १८९६ यांच्या काळात महाराष्ट्र दुष्काळ
- १८९७ पुण्यात प्लेग ची साथ.
- १८८१ केसरी व मराठा वृत्तपत्र सुरु.
- ८ जून १९१४ या दिवशी मांडलेल्या कारागृहातून टिळक सुटले तुरुंगात असताना गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला.
- १८८१ चिपळुनकर, टिळक व आगरकर यांनी १८८१ मध्ये आर्यभुषण छापखाना काढला. त्यात केसरी व मराठा ही वृत्तपत्रे सुरु केली. केसरी हे मराठीतून तर मराठा हे इंग्रजीतून प्रसिद्ध केले.
- प्रारंभी आगरकर केसरीचे व टिळक मराठाचे संपादक होते.
- १८८१ ते १९२० या चाळीस वर्षाच्या काळात टिळकांनी ५१३ अग्रलेख लिहीले.
- १८९३ गणेशोत्सव
- १८९५ शिवाजी जयंती हे सार्वजनिक व सामाजिक सण म्हणून साजरे केले.
- ८ सप्टेंबर १८९७ या रोजी टिळकांवर देशद्रोहाचा खटला झाला.
- १४ सप्टेंबर १८९७ वरील खटल्याचा निकाल लागून १८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली.
- ६ सप्टेंबर १८९७ टिळकांची कारागृहातून सुटका.

  ''काँग्रेसचे एकदाही अध्यक्षपद न मिळवलेली व्यक्ती म्हणजे लोकमान्य टिळक.''

  ''टिळकांना भारतीय असंतोषाचे जनक असे संबोधतात.''

  लोकमान्य टिळकांनी सावरकरांना 'शिवाजी शिष्यवृत्ती देऊन' इंडिया हाऊस लंडनला पाठविले.

  संमती वयाच्या विधेयकास त्यांचा नकार होता.

  बॅ. जोसेफ बॅरिस्टा यांनी लो. टिळकांच्या सांगण्यावरून 'सेल्फ डिटरमेशन फॉर इंडिया' ही पुस्तिका लिहून इंग्लडमध्ये प्रस्तूत केली.
- **लोकमान्य टिळकांच चतु:सुत्री योग्य क्रम :**

  १) स्वदेशी २) बहिष्कार ३) राष्ट्रीय शिक्षण ४) स्वराज्य
- सर व्हॅलेटिन चिरोल यांनी लोकमान्य टिळकांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हटले आहे.
- विठोबाला स्मरून स्वदेशीची शपथ घ्या. हे उद्गार त्यांचे आहे.
- लोकमान्य टिळकांना तेल्यातांबोळ्याचे पुढारी असे म्हणत.
- १९०८ लो. टिळकांना सहा वर्षाची तुरुंगवासाची (मंडाले) शिक्षा.
- १९१४ मंडालेच्या तरुंगातून सुटका.
- १९१६ होमरुळ चळवळ सुरु केली.

  टिळकांनी असे म्हटले होते. ''देव जर शिवाशिव मानत असेल तर मी त्याला देव मानणार नाही.''
- होमरुळ लीगचे प्रमुख नेते लो. टिळक इ. स. १९१८ च्या शेवटी इंडियन अनेरस्टचे लेखक व्हॅलेटिन चिरोल यांच्या विरुद्ध मानहानीचा दावा दाखल करण्यासाठी इंग्लंडला गेले.
- **साहित्य :**

  १) ओरायन (orion) २) ऑर्क्टिक होम ऑफ वेदाज ३) गीतारहस्य

- **त्यांच्या घोषणा :**
  ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच.''
  ''सरकारचे डोके ठिकाणावर आहे का? राज्य करणे म्हणजे सुड उगवणे नव्हे !''

## ३७. नरेंद्र दाभोळकर (१९४५-२०१३)

- महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे - अध्यक्ष आणि संस्थापक (स्थापना - १९८९)
  **जन्म :** १ नोव्हेंबर १९४५
  **आई :** ताराबाई दाभोळकर
  **वडील :** अच्युत दाभोळकर
  **शिक्षण :** एमबीबीएस (गर्व्हमेंट कॉलेज, मिरज)
- शिवाजी छत्रपती कब्बडी टिमचे भारताचे प्रतिनिधीत्व (भारत विरुद्ध बांग्लादेश)
- बाबा आढाव एक गाव एक पनवठा (विहीर) मध्ये सहभाग.
- १९८० सामाजिक कार्याला सुरुवात.
- अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सदस्य / उपाध्यक्ष
- महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे संस्थापक आणि अध्यक्ष.
- जाती संबंधित हिंसाचाराच्या चळवळीत सहभाग.
- बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर करण्यास समर्थन.
- जादुटोणाविरोधी कायदा आणि काळा जादू विरूद्ध आदेश त्यांच्यामुळे देण्यात आला.
- विरोध - वारकरी, बीजेपी आणि शिवसेना
- २० ऑगस्ट २०१३ रोजी हत्या.
  हत्त्येच्या ४ दिवसांनंतर अंधश्रद्धा आणि काळा जादू अध्यादेश घोषणा.
- २०१४ पद्मश्री
- १२ वर्षे डॉक्टर म्हणून कार्य नंतर समाज कार्य.
- साने गुरूजी यांनी स्थापित केलेल्या प्रसिद्ध मराठी साप्ताहिक साधानाचे संपादन.

## ३८. क्रांतीसिंह नाना पाटील (१९००-१९७६)

**मुळ नाव :** नाना रामचंद्र पिसाळ
**जन्म :** ३ ऑगस्ट १९००
**जन्म ठिकाण :** बहे बोरगाव, ता. वाळवा, जि. सांगली
**मुळ गाव :** येडेमच्छींद्र, ता. वाळवा, जि. सांगली
**मृत्यू :** ६ डिसेंबर १९७६ - वाळवा

- आपुला आपण करु कारभार हे सुत्र १९४२ च्या चले जाव आंदोलनात प्रतिसरकार स्थापन करून प्रत्यक्ष अंमलात आणले.
- १९१६ मुलकी परीक्षा उत्तीर्ण, काही काळ तलाठी म्हणून नोकरी.
- १९१९ प्रार्थना समाजात सहभाग.
- संस्थापक सदस्य - हिंदूस्थान रिपब्लीक असो.
- १९३० संविनय कायदेभंग चळवळीत सहभाग.

- १९४२ छोडो भारत आंदोलनात सहभाग.
- प्रतिसरकारची स्थापना (सातारा - सांगली)
- १९४३-४६ सातारा व सांगली जिल्ह्यात १५०० गावात प्रतिसरकार कार्यरत.
- १९४२-४६ भुमीगत राहून प्रतिसरकार चालवले.
- १९४६ कऱ्हाड येथे बाहेर आले.

प्रतिसरकार चालवण्यासाठी तीन दलांची स्थापना (सेनेची स्थापना)
१) तुफान सेना - तुफान सेनेची कुंडल येथे युद्धशाळा.
२) आझाद सेना - जि. डी. लाड फिल्ड मार्शल - तुफान सेना
३) राष्ट्रसेवा दल
प्रतिसरकार हे पत्रीसरकार म्हणूनही ओळखले जाते.

- स्वातंत्र्यानंतर शेतकरी कामगार पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्ष या पक्षांच्या माध्यमातून काम केले.
- १९५७ उत्तर सातारा मतदारसंघातून पहिल्यांदा लोकसभेवर निवडून आले.
- संसदेत मराठीत भाषण करणारे पहिले खासदार.
- १९६७ बीड मतदारसंघातून दुसऱ्यांदा लोकसभेवर निवडून आले. (कम्यूनिस्ट पक्ष)

गांधी - विवाह पद्धती - कमी खर्चात विवाह करण्याची पद्धत रुजवण्याचा प्रयत्न.

## ३९. ग. दी. मांडगूळकर (१९१९-१९७७)

**जन्म :** २ ऑक्टोबर १९१९ (शेटफळे - सांगली)
**मृत्यू :** १४ डिसेंबर १९७७ (पुणे)
**नाव :** गजानन दिगंबर मांडगूळकर
**टोपन नाव :** गदिमा
**वडीलांचे नाव :** दिगंबर बळवंत मांडगूळकर (औंध संस्थान कारकून)
**आईचे नाव :** बनुताई दिगंबर मांडगूळकर
**अपत्ये :** आनंद व श्रीधर
**कार्यक्षेत्र :** साहित्य व चित्रपट
**साहित्य प्रकार :** गीतरचना कथा, कादंबरी
**प्रसिद्ध साहित्यकृती :** गीतरामायण
**शिक्षण :** नॉन मॅट्रिक

- १९३५ मराठी चित्रपट सृष्टीत प्रवेश (ब्रह्मचारी)
- १९४२ प्रथम गीतलेखन (भक्त दामाची व पहिला पाळणा)
- १९४२ सातारा, सांगली येथे प्रतिसरकारचा प्रसार अप्रत्यक्ष स्वातंत्र्य लढ्यात सहभाग.

**अध्यक्ष / सदस्य :**

- १९६१ महाराष्ट्र राज्य तमाशा परिषद अध्यक्ष
- १९६१ महाराष्ट्र राज्य ग्रंथ निवड सदस्य.
- १९६१ फिल्म ॲडव्हायसरी बोर्ड सदस्य.
- १९६२-७४ महाराष्ट्र विधान परिषद सदस्य (आमदार)
- १९६४ नाट्य परीक्षण मंडळ सदस्य.
- १९६७ तुरुंग आणि कारावास सल्लागार समिती सदस्य.

- १९६४-६९ पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य
  - मराठी चित्रपट महामंडळ उपाध्यक्ष
- १९६९ मराठी नाट्य परिषद सदस्य
- १९७६ महाराष्ट्र राज्य कुटूंब नियोजन सल्लागार समिती सदस्य.
- १९७६ मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष पुणे.
- १९७३ मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष, यवतमाळ
- १९७६ मराठी साहित्य संमेलन (विभागीय अध्यक्ष), इंदौर, बडोदरा, म्हापसा, ग्वाल्हेर

**पुरस्कार :**

- १९६९ पद्मश्री
- १९६९ : संगीत नाटक आकादमी व विष्णूदास भावे सुवर्णपदक
  - महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार
  - शाहीर परशुराम पुरस्कार
  - फाळके गौरव चिन्ह.
  - सुरसिंगार अकादमी सन्मान.
  - रेडिओ मिरची म्युझिक सन्मान.
  - सर्वोत्कृष्ट अल्बम - लाखाचे गोष्ट

## ४०. यशवंतराव चव्हाण (१९१३-१९८४)

**नाव :** यशवंतराव बळवंतराव चव्हाण

**वडील :** बळवंतराव चव्हाण

**आई :** विठाबाई

**भाऊ :** ज्ञानदेव

**जन्म :** १२ मार्च १९१३, सातारा - कराड - देवराष्ट्र

**मृत्यू :** २५ नोव्हेंबर १९८४

**शिक्षण :** साताऱ्यातील टिळक महाविद्यालयात

**प्रभाव :** फुले आणि शाहु महाराज

- हे राज्य मराठ्यांचे नाही तर मराठी माणसांचे आहे असे त्यांचे मत.
- सहकारी संस्था स्थापन करुन विकेंद्रीकरणाला चालणा.
- १९३० वयाच्या १७ व्या वर्षी गांधीजींच्या असहकार चळवळीत भाग घेतला.
- १९३२ साताऱ्यात तिरंगा फडकवला म्हणून १८ महिन्यांची सजा झाली.
- १९३८ मुंबई विद्यापिठातून इतिहास व राज्यशास्त्र मधून बी. ए. केले.
- १९४० सातारा जिल्ह्याचे कॉंग्रेस अध्यक्ष झाले.
- १९४१ एल. एल. बी. पूर्ण केले.
- १९४२ विवाह संपन्न पत्नी - वेणूबाई
- १९४२ चले जाव च्या चळवळीत पुन्हा तुरुंगवास. (२ वर्षानंतर सोडण्यात आले.)
- १९४६ साताऱ्यातून एमएलए म्हणून निवडून आले. याच वर्षी त्यांना बॉम्बे स्टेट होम चे होम मिनीस्टर चे पार्लमेंट सेक्रेटरी म्हणून निवडले गेले.
- १९५० द्विभाषीक बॉम्बे स्टेटचे मुख्यमंत्री (मुंबईसहित महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जतात.)
- १९६२ अती महत्त्वाचा को-ऑपरेटीव्ह सोसायटी ॲक्ट पास केला.
- १९६२ नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांना दिल्लीला बोलवून घेतले. (कारण १९६२ च्या चीन च्या युद्धातील पराभव)
- युद्धानंतरची परिस्थिती अतिशय कौशल्याने हाताळली.

- युद्धातील अपंग सैनिकांना कायम नौकरीची सोय आणि शहिद सैनिकांच्य मुलांसाठी मोफत शिक्षणाची सोय केली.
- १९७०-७४ पर्यंत अर्थमंत्री (पंतप्रधान - इंदिरा गांधी)
- स्वर्णसिंग पंतप्रधान असतांना परराष्ट्र मंत्री होते.
- १९७९-८० चरणसिंह आणि मोरारजी देसाई पंतप्रधान असतांना यशवंतराव चव्हाण गृहमंत्री होते.
- २८ जुलै १९७९ ते १७ जानेवारी १९८० - उपपंतप्रधान
- मुंबईचे पहिले मुख्यमंत्री १ मे १९६० ते १९ नोव्हेंबर १९६२
  वर्णन - आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार
- चिनच्या युद्धावेळीचे वर्णन - हिमालयाच्या संरक्षणाला सह्याद्री धावून गेला.
- लेखनसंपदा - ऋणानुबंध, कृष्णकाठ
- आत्मवृत्त - कृष्णाकाठ
- यशवंतराव चहाणांना त्यांच्या जीवनाचे आत्मचरित्र लिहायचे होते.
  त्यांच्या जीवनाचे तीन टप्पे होते.
  १) बालपण २) मुंबईचे पहिले मुख्यमंत्री ३) दिल्लीचे वास्तव्य
  त्यांनी त्याला नावे दिली होती - १) कृष्णातीर, २) सागरतीर, ३) यमुनातीर
  परंतु कृष्णतीर पूर्ण झाल्यावर २५ नोव्हेंबर १९८४ रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी हृदय विकाराने निधन झाले.
- **मृत्यू -** २५ नोव्हेबर १९८४

- **प्रतिक्रिया :**

१) खांडेकरांच्या मते - यशवंतराव राजकारणात नसले असते तर ते उत्तम साहित्यीक झाले असते.
२) तळवळकरांनी यशवंतरावांचा 'सुसंस्कृत मराठी नेता' या शब्दात गौरव केला.

राजकारणात असतांना महत्त्वाचे घेतलेले निर्णय :

१) पंचायतराज या त्रिस्तरीय व्यवस्थेची सुरुवात.
२) राज्य पंचवार्षिक योजनेचा प्रारंभ
३) कोल्हापूर बंधाऱ्यांचा प्रचार. कोयना आणि उजनी ह्या प्रमुख प्रकल्पांच्या उभारणीला गती.
४) १८ सहकारी साखर कारखान्यांची स्थापना (सहकारला चालणा)
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ स्थापना.
६) राज्यातील कृषी विद्यापीठांच्या स्थापनेतही संकल्पनात्मक सहभाग.
७) मराठी साहित्य संस्कृती महामंडळ व विश्वकोष मंडळाची स्थापना केली.

## ४१. बाळशास्त्री जांभेकर (१८१२-१८४६)

**जन्म :** ६ जानेवारी १८१२
**जन्मगाव :** पोंभुर्ले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी (देवगड)
**मृत्यू :** १७ मे १८४६ (वनेश्वर)
**आयुष्य :** ३४ वर्षे
**पूर्ण नाव :** बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर
**वडिलांचे नाव :** गंगाधरशास्त्री जांभेकर (न्युत्पन्न पुराणीक)

**महत्तवाच्या घटना :**

- १८२५ मुंबईला येऊन इंग्रजी शाळेत प्रवेश घेतला.
- १८३० वयाच्या १८ व्या वर्षी 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे डेप्युटी सिक्रेटरी' म्हणून निवड.
- ६ जानेवारी १८३२ मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पणची सुरुवात केली. (वयाच्या २० व्या वर्षी)
- या वृत्तपत्रातील इंग्रजी भाग लिहण्याचे कार्ये हाती घेतले.
- २१ सप्टेंबर १८३२ दर्पण मध्ये पुणे येथील इंग्रजी शिक्षणाची दखल.
- १८३२ बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे नेटीव्ह सिक्रेटरी म्हणून निवड.
- २४ ऑगस्ट १८३२ विद्या हे बळ हे शिर्षक असणारा लेख दर्पणच्या अंकात लिहिला.
- २६ जून १८४० दर्पणचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. (८ व्या वर्षी)
- १८४० बाळशास्त्री जांभेकर व भाऊ महाजन यांनी दिग्दर्शन हे साप्ताहिक सुरु केले. (मराठीतील पहिले मासिक)
- इंग्रजांनी बाळशास्त्री जांभेकरांना जस्टीस ऑफ द पीस ही पदवी दिली. (जेम्स कर्नाऊ या इंग्रज अधिकाऱ्याने)
- १३ सप्टेंबर १८४३ श्रीपती शेषाद्री प्रकरण.
  बाळशास्त्री जांभेकर, जगन्नाथ शंकरशेठ, दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्या सहाय्याने श्रीपतीला हिंदू धर्मात घेतले.
- १७ मे१८४६ वनेश्वर येथे प्राचीन शिलालेखांच्या अभ्यासासाठी गेले असता तापाने मृत्यू झाला. (वयाच्या ३४ व्या वर्षी)
  - सार्वजनिक जिवनाचा पाया घातला.
- **बाळशास्त्री जांभेकरांबद्दलची मते :**
  - मराठी पत्रकारितेचे जनक
  - आधुनिक महाराष्ट्राचे आद्यऋषी.
  - अक्कलकोटच्या युवराजाचे शिक्षक.
  - एल्फीस्टन कॉलेजात पहिले भारतीय असिस्टंट प्रोफेसर (बीजगणित व गृहगणित शिकवत)
- मुंबई विभागात शाळा तपासणी निरीक्षक, ट्रेनिंग कॉलेजचे संचालक इत्यादी पदावर कार्य.
- मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक
- जन्मदिवस पत्रकार दिन (६ जानेवारी)
- मराठी भाषेतील पहिली शालेय पाठ्युपुस्तके रचली
- आद्यइतिहासकार
- पुन्नरजीवनवारी सुधारणावादाचा किंवा परंपरानिष्ठ परिवर्तनवादाचा पाया घातला.
- ज्ञानेश्वरीचे पाठभेदासह संपादन केले.
- शिलालेख व ताम्रपट यांचे विद्वत्तापूर्ण लेखन करून शोधनिबंध रॉयल एशायटिक सोसायटीच्या नियतकालिकात प्रसिद्ध.
- राष्ट्रजागृतीचे अग्रदूत, सुधारणावादाचे आद्यप्रवर्तक व्यासंगी पंडीत, आद्य समाजसुधारक.
- आधुनिक महाराष्ट्राच्या सार्वजनिक जिवनाची गंगोत्री.
- स्त्री-शिक्षण व विधवाविवाहाचे पुरस्कर्ते
- ह. म. घोडके महाराष्ट्रनामा ग्रंथात - आधुनिक महाराष्ट्राचे आद्य प्रबोधनकार म्हटले पाहिजे.
- दादाभाई नौरोजी - अद्वीय विद्वान, पश्चिम भारतातील विद्यामुकुटमणी
- न्या. चंदावरकर - पश्चिम भारतातील प्रख्यात पंडीत आद्यऋषी.
- प्रा. शेजवलकर - सरकारचा करशास्त्री

- **ग्रंथसंपदा :**

  १. शुन्यलब्धी - मराठी भाषेतील पहिले पुस्तक
  प्राचीन भारतातील शिलालेख व ताम्रपट यावर लेख लिहलेले आहेत.
  २. नियतकथा (१८३८)
  ३. छंदशास्त्र
  ४. इंग्लंडदेशाची बखर - भाग -१, २ (१८३२) (इनसायक्लोपिडक हिस्ट्री ऑफ इंडिया)
  ५. बालण्याकरण (१८३६)
  ६. हिंदूस्थानचा इतिहास
  ७. भूगोलविद्या (१८३६)
  ८. सागरसंग्रह (१८३७)
  ९. इंग्रजी, मराठी धातुकोश
  १०. ज्योतिशशास्त्र (१८३५)
  ११. भारतातील इंग्रजांचा इतिहास (१८४६)
- यांचा जन्मदिवस (६ जानेवारी) पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो.

## ४२. गणेश दामोदर सावरकर (१८७९-१९४५)

**जन्म :** १३ जून १८७९, भगूर - नाशिक
**मृत्यू :** १६ मार्च १९४५
**चळवळ :** भारतीय स्वातंत्र्य लढा
**संघटना :** अभिनव भारत, मित्रमेळा
**प्रभाव :** शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक
**वडील :** दामोदर सावरकर
**आई :** राधाबाई सावरकर
**पत्नी :** यशोदा उर्फ येसूताई

- **लेखन :**

  राष्ट्रमीमांसा व हिंदूस्थानचे राष्ट्रस्वरूप, दुर्गातनम या टोपण नावाने काशी येथे लिहीले. १९३४ साली प्रकाशन
  - हिंदुराष्ट्र - पुर्वी - आता - पुढे
  - शिवरायांची आग्रावरील गरूडझेप
  - वीरा - रत्ना - मंजुषा
  - ख्रिस्तपरिचय अर्थात ख्रिस्ताचे हिंदूत्व
  - धर्म कशाला हवा ?
  - मोपल्यांचे बंड
  - वीर बैरागी, मुळ हिंदी भाषेतील पुस्तकावरुन भाषांतरीत केलेले पुस्तक.
- **कार्य :**

- १ जानेवारी १९०० मित्रमेळा संस्था उघडपणे सुरु. बाबाराव या संस्थेचे कार्यवाहक होते.
- १९०४ मित्रमेळाची संस्था म्हणून अभिनव भारत संस्था स्थापन.
  अभिनव भारत जहालवाद्यांची संस्था होती.
- १९०३ मित्रसमाज नावाची विद्यार्थ्यांची संस्था स्थापन.
- १९०५ आत्मनिष्ठ युवतीसंघ नावाची स्त्रियांची संघटना स्थापन करण्यात आली.
- २६ फेब्रुवारी १९०९ बाबारावांना मुंबई येथे अटक व देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला.
- ८ जून १९०९ जन्मठेपेची शिक्षा.
- इ. स. १९११ अंदमानला काळ्या पाण्याची शिक्षा भोगण्यासाठी पाठविण्यात आले.
- इ. स. १९२१ अंदमान मधून सुटका.
- इ. स. १९२२ शिक्षा संपल्याचे कळवून सुटका.

## ४३. संत तुकाराम (१६०७-१६५०)

**मुळ नाव :** तुकाराम बोल्होबा अंबिले (मोरे)
**जन्म :** १ फेब्रुवारी १६०७
**ठिकाण :** देहू महाराष्ट्र (पुणे, देहू - इंद्रायणी नदी काठी)
**मृत्यू :** १९ मार्च १६५०
**ठिकाण :** देहु, महाराष्ट्र
**संप्रदाय :** वारकरी संप्रदाय, चैतन्य संप्रदाय
**गुरू :** केशव चैतन्य (बाबाजी चैतन्य) ओतुर
**शिष्य :** संत निळोबा, संत बहिणाबाई
**भाषा :** मराठी
**साहित्य रचना :** तुकारामाची गाथा
**कार्य :** समाजसुधारक, कवी, विचारवंत, लोकशिक्षक
**तीर्थक्षेत्र :** देहू
**व्यावसाय :** वाणी
**वडिल :** बोल्होबा अंबिले
**आई :** कनकाई अंबिले.
**पत्नी :** आवली (पुण्याचे आप्पाजी गळवे यांची कन्या)
**अपत्ये :** महादेव, विठोबा, नारायण, भागुबाई

- तुकोबा हे १७ व्या शतकातील वारकरी
- आराध्यदैत - पंढरपुरचा विठ्ठल / विठोबा
- वारकरी त्यांना जगदगुरू म्हणून ओळखत असत.
- जगदगरू तुकाराम लोककवी होते.
- तुकाराम महाराज हे साक्षत्कारी, निर्भीड व एका अर्थाने संत कवी होते.
- अभंगाचा अर्थ - जे कधी भंग पावत नाही असे.
- तुकाराम जन्मवर्षाबद्दल इतिहासकारामध्ये मतभेद आहेत. त्यातल्या संभाव्य तारखा -
  १) १५६८ २) १५७७ ३) १६०८ ४) १५९८
- घराणे - मोरे
- सुदुंबरे गावातील त्यांचा बालपणीचा मित्र संभाजी जगनाडे यांनी तुकारामाचे अभंग लिहिण्याचे काम केले.
- पुण्याजवळील वाघोली गावातील रामेश्वर भट यांनी तुकारामांना संस्कृत भाषेतील वेदांचा अर्थ प्राकृत भाषेत सांगितला म्हणून त्यांच्या अभंगाच्या गाथा इंद्रायणी नदीत बुडवून टाकण्याची शिक्षा दिली.
- तुकारामांनी बहिणाबाईला बौद्धांच्या वज्रसुची या बंडखोर ग्रंथाचे मराठीत भाषांतर करायला सांगितले होते.
- पुस्तक - गीतगाथा
- शिवाजी महाराज व संत रामदास हे तुकारामांचे समकालीन होते.

## ४४. गणेश वासुदेव जोशी (ग. वा. जोशी) (१८२८-१८८८)

**जन्म :** ९ एप्रिल १८२८ - सातारा

सार्वजनिक संस्थेचे मुख्य संस्थापक आणि आधारस्तंभ म्हणुन सार्वजनिक काकांची ओळख.

**शिक्षण -** पुणे

- १८५२ सर्वप्रथम स्वदेशीचा पुरस्कार, खादीचा प्रचार
  स्वदेशी व्यापार उत्तेजक मंडळे स्थापन.
- १८७० एल. एल. बी. (कायद्याची पदवी) - पुणे
- १८७० भारतात राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपुर्वी पुणे येथे सनदशीर मार्गाने कार्य करणारी सार्वजनिक सभा औधचे श्रीमंत श्रीनिवासराव पंत यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाली. यात मुख्य सहभाग काकांचाच होता.
- १८७० सार्वजनिक सभेचे पहिले सरचिटणीस.
- १८७१ काकांच्या पत्नी सरस्वतीबाई यांनी स्त्री विचारवती संस्था स्थापन केली.
- १८७३ ब्रिटीश सरकारला दुष्काळाचा अहवाल पाठवला.
- १८७६ काकांनी सार्वजनिक सभेमार्फत दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांना भरीव मदत मिळवून दिली.
- १८७७ लॉर्ड लिटन यांनी भरवलेल्या दिल्ली दरबार रत्न ग. वा. जोशी यांनी मान पत्राचे वाचन केले.
- १८७८ मुद्रण स्वातंत्र्यावरील (प्रेस) निर्बंध कायद्याचा सार्वजनिक सभेच्या वतीने विरोध केला.
- सार्वजनिक क्षेत्रात सेवा म्हणून लोकांनी त्यांचे नाव सार्वजनिक काका असे ठेवले.
- १८७९ कुणालाही न डगमगता वासुदेव बळवंत फडके यांचे वकीलपत्र घेतले.
  सार्वजनिक सभेला सामाजिक व राजकीय स्वरूप देण्याचे काम न्यायमुर्ती रानडे व सार्वजनिक काका (ग. वा. जोशी) यांनी केले.
- **मृत्यू -** २५ जुलै १८८८

## ४५. संत ज्ञानेश्वर (११९७-१२७५)

**संपूर्ण नाव :** ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी

**जन्म व निर्वान :** जन्मगाव - आपेगाव

**समाधी आळंदी -** पुणे

**जन्म :** शके ११९७, इ. स. १२७५

स्वईच्छेने समाधी वयाच्या २१ व्या वर्षी

- **लेखन -**
  १) भावार्थ दीपीका किंवा ज्ञानेश्वरी (शके १२१२ इ. स. १२९०)
  (आठरा आध्याय नऊ हजार ओवी)
  २) पसायदान
  ३) हरिपाठ
- **विचार :** समतेचा पालनकर्ता, सर्वधर्म समभाव

## ४६. संत एकनाथ महाराज (१५३३-१५९९)

- संत एकनाथ महाराज हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील एक संत होते. त्यांचा जन्म इ. स. १५३३ मध्ये पैठण जि. औरंगाबाद येथे झाला.
- श्री. संत एकनाथ महाराजांच्या वडिलांचे नाव सूर्यनारायण होते व आईचे नाव रुक्मिनी होते.
- आई वडिलांचा सहवास फार काळ लाभला नाही. त्यांचे पालनपोषण त्यांच्या आजोबांनी केले. चक्रपाणी आणि सरस्वती हे त्यांचे आजोबा व आजी होत.
- एकनाथांना लहानपणापासून अध्यात्मज्ञानाची व हरिकीर्तनाची आवड होती.
- एकनाथांचे गुरू सदगुरू जनार्दन स्वामी हे देवगड (देवगिरी) येथे यवन दरबारी अधिपती होते. हे मुळचे चाळीसगावचे होते. त्यांचे आडनाव देशपांडे होते. ते दत्तोपासक होते.
- गुरू म्हणून संत एकनाथांनी त्यांना मनोमन वरले होते. नाथांनी परिश्रम करून गुरूसेवा केली आणि साक्षात दत्तात्रयांनी त्यांना दर्शन दिले आणि द्वारपाल म्हणून नाथांच्या दारी उभे असत असे म्हणतात.
- नाथांनी अनेक तिर्थयात्रा केल्या. नाथांनी एका मुलीशी विवाह केला. ही मुलगी पैठणजवळच्या वैजापूरची होती. त्यांचे नाव गिरजाबाई असे होते.
- संत एकनाथ आणि गिरजाबाई यांना गोदावरी व गंगा या दोन मुली व हरी नावाचा मुलगा झाला. त्यांचा हा मुलगा हरिपंडित झाला. त्याने नाथाचे शिष्यत्व पत्करले. एकनाथांनी समाधी घेतल्यानंतर हरिपंडितांनी नाथाच्या पादुका दरवर्षी आषाढीवारीसाठी पंढरपूरास नेण्यास सुरूवात केली.
- संत ज्ञानेश्वरांच्या नंतर सुमारे २५० वर्षांनी नाथांचा जन्म झाला. 'बये दार उघड' असे म्हणत नाथांनी भारुड, जोगवा, गवळणी, गोंधळ यांच्या सहाय्याने जनजागृती केली.
- संत एकनाथ हे संतकवी, पंतकवी व तंतकवी होते. त्यांनी रंजन व प्रबोधन केले, ते 'एका जनार्दन म्हणून स्वत:चा उल्लेख करतात एका जनार्दन ही त्यांची नाममुद्रा आहे. अनेक रचना, अभंग, गवळणी असे स्फुट लेखन त्यांनी केले.
- एकनाथी भागवत' हा त्यांचा ग्रंथ लोकप्रिय आहे. ही एकादश स्कंदावरील टीका आहे. मुळात एकूण १३६७ श्लोक आहेत. परंतु त्यावर भाष्य म्हणून १८,८१० ओव्या संत एकनाथांनी लिहील्या आहेत. मुळ भागवत १२ स्कंदाचे आहे. हे (व्यासकृत) आहे. नाथांनी लिहीलेल्या भावार्थ रामायणाच्या सुमारे ४० हजार ओव्या आहेत.
- रूक्मीणी स्वयंवर हे ही काव्य त्यांनीच लिहीले आहे. नाथांनी दत्ताची आरतीही 'त्रिगुणात्मक त्रयमुर्ती' दत्त हा जाण त्यांनीच लिहीले आहे.
- सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध केली. नाथ हे महावैष्णव होते. दत्तभक्त होते, देवीभक्त होते. जातीभेद दुर करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. अनेक रचना, अभंग, गवळणी असे स्फुट लेखन एकनाथांनी केले.
- फाल्गुन वद्य षष्ठी, शके १५२१ (२६ फेब्रुवारी १५९९) या दिवशी संत एकनाथांनी देह ठेवला.
- फाल्गुन वद्य षष्ठी हा दिवस एकनाथ षष्ठी म्हणून ओळखला जातो.

- **कार्य व लेखन:**

- एकनाथी भागवत - भागवत पुराणातील आकराव्या स्कंधावर ओवीबद्ध मराठी टिका.
- चतु:श्लोकी भागवत
- एकनाथी अभंग गाथा.

- **संत एकनाथ महाराज कृत हरिपाठ एकुण २५ अभंग -**

| | | |
|---|---|---|
| १) हस्तमालक टीका | २) शुकाष्टक टीका | ३) स्वात्म बोध |
| ४) चिरंजीवपद | ५) आनंदलहरी | ६) अनुभवानंद |
| ७) मुद्राविलास | ८) लघुगीत | |

- भावार्थ रामायण (४० हजार ओव्या) हिंदीसह अनेक भाषांत भाषांतरे
- संत ज्ञानेश्वरांच्या आळंदी येथील समाधीस्थळाचा शोध.

## ४७. अवंतिकाबाई गोखले (१८८२-१९४९)

**जन्म :** १७ सप्टेंबर १८८२-१९४९

**पती :** बबनराव

- गांधीजींच्या पट्शिष्या होत्या.
- मराठी बरोबरच इंग्रजी भाषेवरही प्रभुत्व
- हिंदी महिला समाजाची स्थापना
- भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात गांधीजीची पहिली भारतीय शिष्या म्हणून अवंतीकाबाईंना ओळखले जाते.
- १९१६ गांधी लखनौ काँग्रेस अधिवेशनात ओळख.
- १९१९ मध्ये नाशिक येथे केलेले भाषण ऐकून लो. टिळक प्रभावित झाले होते.
- १९२२ मुंबई महापालिकेत प्रचंड मताने निवडून आल्या परंतु काही तांत्रिक कारणामुळे त्यांची निवडणूक रद्द करण्यात आली.
- १९२६ मुंबई महापालिकेच्या महत्त्वाच्या स्वार्थ समितीवर नियुक्त.
- १९३०-३२ सालच्या मिठाच्या सत्याग्रहात मुंबईतून शेकडो स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. त्याचे सर्व श्रेय अवंतीकाबाईंना जाते.

- २६ जानेवारी १९३० कमिशनचा रूल मोडून आझाद मैदानावर थंडविला.
- १९४२-४३ च्या आंदोलनात सहभागी होऊ शकल्या नाहीत.
- १९४७ मध्ये कर्करोग झाल्याचे निदान
- २६ मार्च १९४९ मध्ये मुंबईत राहत्या घरी निधन.
- १९१८ साली महात्मा गांधीचे चरित्र लोकमान्य टिळकांच्या प्रस्तावनेसहित प्रकाशित केले.

## ४८. कृष्णराव पांडुरंग भालेकर (१८५०-१९१०)

**जन्म :** १८५० (भांबुर्डे - पुणे)

- इ. स. १८१७ मध्ये ग्रंथालयाची निर्मिती - भांबुर्डे
- लोककल्याणेच्छू व ज्ञानचक्षु - लिखाणास प्रेरणा देणारे वृत्तपत्र हे वृत्तपत्रे वाचुन दीनबंधु वृत्तपत्र काढण्याची स्फुर्ती.
- १८७१ हितोपदेशक भजन समाज संस्था.
- भालेकरांची सत्यशोधक समाज कार्यकारिणीवर निवड.
- १८७४ कॉंट्रेक्टर म्हणनू काम.
- १८७५ दयानंद सरस्वतींची मिरवणूक उधळून लावण्याचे प्रयत्न कर्मठांचे चालू होते. ते कार्य त्यावेळी म. फुले व कृष्णराव भालेकर यांनी केले. (भालेकरांचे हे एतिहासिक कार्य ठरले.)
- १८७७ सत्यशोधक चळवळीतील पहिले पत्र (दीनबंधू)

- **मालेकरांचे इतर ग्रंथ :**

१) पोवाडे
२) हितोपदेश
३) शेतकऱ्यांचे मधुर गायन
४) उपदेशपर लाावण्या
५) बळीबा पाटील (कादंबरी)
६) पंचखेळ
७) शस्त्राधार
८) शेतकऱ्यांनो डोळे उघडा

- १८८३ पुणे सुशिक्षणग्रहाची स्थापना.
  प्रत्येक तालुक्याला बोर्डिंगची स्थापना.
  परंतु काही दिवसांनी हे सुशिक्षणग्रह फुले यांच्या स्वाधीन.
- १८८४ दीनबंधू सार्वजनिक सभा.
  उद्देश : राजास आपल्या लोकांच्या सार्वजनिक अडचणी कळून दाद मागणे.
  लोकांत विद्येचा प्रसार करण्यासाठी.
  लोकांतील वाईट चाली बंद करणे.
- १८८८ दीनबंधू फ्री स्कूलची स्थापना.
  भालेकरांनी या संस्थेच्या आधारे शिक्षण सक्तीचे असावे असा प्रचार केला - ४ वर्षे
  स्कूल स्थापणेस मदत करणारे सहकारी :
  १) गणपत सखाराम पाटील
  २) सीताराम रघुनाथ तारकूंडे
- दीनबंधू फ्री स्कूल स्थापनेस सयाजीराव गायकवाड यांचे विशेष आर्थिक सहाय्य.
- देणग्या मिळवून देण्यासाठी न्यायमुर्ती रानडे व गोपाळ हरी देशमुख यांची मदत.
- इ. स. १८८५ सत्यशोधक समाजाच्या झेंड्याची मिरवणूक
  मिरवणुकीचे वर्णन - दिनमित्र वृत्तपत्रात (हरिशचंद्र नवलकर)
  मिरवणुक विसर्जित ठिकाण - डॉ. गावंडे घरासमोर (सोमवार पेठ)
  मिरवणुकीत सामील असलेले महत्त्वाचे व्यक्ती -
  १) न्यायमुर्ती रानडे २) रामय्या वेंकय्या अय्यवाह ३) म. गो. रानडे (महादेव गोविंद रानडे)
- १८८९ दीनबंधू सार्वजनिक सभेच्या वतीने राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात पास केलेले ठराव.
  एकंदर ९९ टक्के लोकांस राष्ट्रीय सभा काय आहे हे माहित नसेल तर त्यास राष्ट्रीय सभा म्हणता येणार नाही.
- १८९५ राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनातील भालेकरांचा प्रचार कौशल्यातील अप्रतिम नमुना.
  भारतात ब्रिटिशांनी आणलेल्या सोयीबद्दल ब्रिटिशांचे यावेळी भालेकरांनी स्वागत केले. त्यासाठींच २२ फुट उंची असलेला कापडी पुतळा उभा करण्याचे धाडस त्यांनी केले.
- १८९३ शेतकऱ्यांचा कैवारी भालेकरांचे पत्र -
  शेतकऱ्यांना जमिनीची मशागत करण्यासाठी वेगवेगळी मंडळे पाहिजेत यावर उद्देशून बोललेले वाक्य शेतकरी व कारागीर हेच देशाचे खंबीर खांब आहे.
- १९०४ विहिरीतून पाणी काढण्याची यंत्रप्रयोग
  - जुलै १९०४ - अमरावती
  यशवंतराव देशमुख यांची मदत
  भालेकरांचे दीनबंधू मधून हितोपदेश नावाचे भजनी अभंग प्रसिद्ध आहे.
- **भालेकरांचे डिप्रेस्ट मिशन मधील कार्य :**
  प्रचारक म्हणून जबाबदारी.
  मिशनतर्फे चालवणे जाणारे जानोजी बोर्डिंग येथे व्यवस्थापक म्हणून कार्य. (जानोजी बोर्डिंग - अकोला)
- **१९०८ राजीनामा - डिप्रेस्ड मिशन :**

निराश्रित हिंदू व ब्राम्हण क्षत्रिय - पुस्तिका (कृष्णराव भालेकर)
भालेकरांनी केलेली समाज विभागणी :
ब्राह्मण, क्षत्रिय व पारशी वगळता सर्व समाज निराश्रित हिंदू आहे.
**मृत्यू -** १९१०

## ४९. काशीबाई कानिटकर (१८६१-१९४८)

**जन्म :** १८६१ (आष्टे - सातारा)
**वडिलांचे नाव :** कृष्णराव बापट (मामलेदार)

- १८७७ विवाह (गोविंदराव कानिटकरांशी)
- काशीबाईंनी शिक्षणाची सुरवात जॉन स्टुअर्ट मिल यांचे Subjection of women liberation या पुस्तकाचा अर्थ समजावून केली. (गोविंदरावांची मदत)
- १९२९ ह. ना. आपटे यांची पत्र काशीबाईंनी प्रकाशित केली.
- **काशीबाई कानिटकरांच्या कादंबऱ्या :**
  १) रंगराव - १९०३ २) पालखीचा गोंडा - १९२८
- १८८९ मध्ये काशीबाईंने आनंदीबाई जोशी यांचे चरित्र लिहले.
- काशीबाईंच्या पहिल्या कथालेखिका म्हणून उल्लेख -
  प्रकाशित कथासंग्रह - चांदण्यातील गप्पा
- **प्रकाशित कथासंग्रहाचे शिर्षक :**
  १) शिसवी पेटी २) मारुतीचा प्रसाद ३) वनवास
  ४) सारसबाग ५) लावण्यवती ६) धर्मजागृती
- पुर्वीच्या स्त्रिया हल्लीच्या स्त्रिया - पतीच्या आग्रहास्तव निबंध काशीबाईंनी लिहीलेला आहे.
  सुबोधपत्रिकेत प्रकाशित
- **मृत्यू -** १९४८

## ५०. दादासाहेब गायकवाड (१९०२-१९७१)

**नाव :** भाऊराव कृष्णराव गायकवाड
**जन्म :** १५ ऑक्टोबर १९०२
**मृत्यू :** २९ डिंसेंबर १९७१
**ओळख :** राजकारणी, समाजसेवक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वासू सहकारी.

- १९३० काळाराम मंदीर सत्याग्रहात भाग.
- १९३७-४६ मुंबई विधानसभेचे सदस्य.
- १९५६ धर्मांतर बौद्ध धर्माची दिक्षा.
- १९५७-६२ लोकसभेचे सदस्य
- १९६२-६८ राज्य सभेचे सदस्य.
- १९६८ पद्मश्री पुरस्कार प्राप्त
- मुंबईत दादासाहेब गायकवाड सांस्कृतीक केंद्र नावाची संस्था.
- २००२ महाराष्ट्रात शासनाद्वारे कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड पुरस्कार दिल्या जातो.

- २००४ कर्मवारी दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभीमान योजना.
- दादासाहेब गायकवाड यांच्या बाबत संदर्भ / गौरव ग्रंथ.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दादासाहेब गायकवाडांना पत्रे - प्रा. वामन निंबाळकर
- आंबेडकरी चळवळीतील दादासाहेब गायकवाड यांचे योगदान - डॉ. अविनाश दिगंबर फुलझेले.
- पद्मश्री दादासाहेब गायकवाड - रंगनाथ डोळस
- जननायक कर्मवीर दादासाहेब गायकवाड - अरूण रसाळ
- न्योकाग्रणी दादासाहेब गायकवाड - भावना भार्गवे

## ५१. अनुताई वाघ (१९१०-१९९२)

**जन्म :** १७ मार्च १९१० (मोरगाव - पुणे)
**वडील :** बालकृष्ण वाघ
**आई :** यमुनाबाई वाघ
**शिक्षण :** बी. ए.

- **कार्य :**

- बोर्डी (ठाणे) येथे आदिवासींसाठी असलेल्या ग्राम बाल शिक्षण केंद्रामध्ये १९४७ ते १९९२ अशी ४७ वर्षे निरपेक्ष वृत्तीने ग्रामशिक्षणाचे कार्य केले.
- कोसबाडच्या नूतन बाल शिक्षण केंद्राच्या चालक.
- राष्ट्रीय शिक्षण अनुसंधान व प्रशिक्षण मंडळाच्या कार्यकारीणी सदस्य म्हणून कार्य.
- अखिल भारतीय पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष म्हणून कार्य.

- **पुस्तके :**

१) बालवाडी कशी चालवावी (१९५६)
२) कुराणशाळा
३) विकासाच्या मार्गावर
४) शिक्षणमित्र माला
५) अजब सातभाई
६) आटपाट नगरात
७) सकस आहार गीते
८) टिल्लूची करामत
९) कोसबाडच्या टेकडीवरून (१९८०)
१०) सहजशिक्षण आणि गुरूमाऊलींचा संदेश
११) दाभणेच्या जंगलात
१२) विकासवाडी दर्शन नाटक

- **पुरस्कार :**

- १९७२ महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षिका किताब.
- १९७५ दलित मित्र किताब.
- १९७८ इचलकरंजीकचा 'फाय फाऊंडेशन' पुरस्कार.
- १९८० आदर्श माता, सावित्रीबाई फुले, बालकल्याण राष्ट्रीय पुरस्कार.
- १९८५ जमनालाल बजाज पुरस्कार
- १९९२ अशा भोसले पुरस्कार (दीनानाथ प्रतिष्ठाण)
- १९८५ पद्मश्री पुरस्काराने सन्मानित.

- **मासिके :**

शिक्षणपत्रिका - संपादिका
सावत्री - संपादिका

- **मृत्यू :** २७ सप्टेंबर १९९२ (कोसबाड)

## ५२. विष्णुबुवा ब्रह्मचारी (१८२५-१८७१)

**जन्म :** १८२५
**मृत्यू :** १८ फेब्रुवारी १८७१ (मुंबई)
**जन्मस्थान :** शिरवली, जि. कुलाबा (रायगड)
**मुळ नाव :** विष्णु भिकाजी गोखले

- विष्णुबुवा ब्रह्मचारी पाच वर्षाचे असताना त्यांचे वडील वारल्याने बालपण कष्टात गेले. त्यामुळे फारसे शिक्षण घेता आले नाही.
- वयाच्या सातव्या वर्षी मुंज झाल्यानंतर त्यांनी काही काळ वेदाध्ययन व व्यवहारिक शिक्षण घेतले.
- आर्थिक अडचणींमुळे त्यांना वेगवेगळी कामे करावी लागली.
- विष्णुबुवांचा ओढा धर्मग्रंथ संस्कृत अभ्यास याकडे होता. त्यांनी परिक्षमपूर्वक धार्मिक ग्रंथांचा अभ्यास केला. यांच्या जोडीला कथा, कीर्तन पुराण प्रवचन यात त्यांना गोडी होती.
- पुढे १८४७ मध्ये वयाच्या तेविसाव्या वर्षी त्यांनी घर सोडले. सप्तशृंगीच्या डोंगरावर त्यांनी साधनेस सुरवात केली. तेथे त्यांना पाखंड मताचे खंडन करून वैदिक धर्माची पुन:स्थापना करावी असा साक्षात्कार झाला. तेव्हापासुन वैदिक धर्माचा प्रचारास प्रारंभ केला.
- विष्णुबुवा ब्रह्मचारी महाराष्ट्रातील नाशिक, पंढरपूर अशा निरनिराळ्या गावी गेले आणि वैदिक धर्माचे महत्त्व विषद करणारी भाषणे देऊन समाजामध्ये अपार लोकप्रियता मिळवली तेव्हापासुन 'ब्रह्मचारी बुवा' या नावाने ते ओळखले जाऊ लागले.
- सन १८५६ मध्ये विष्णुबुवा मुंबईत आल्यानंतर ख्रिस्तीधर्मीय ज्याप्रमाणे आपल्या धर्माचा प्रचार व प्रसार करत होते ते पाहून विष्णुबुवांनी त्यांचा या हिंदूधर्मावरील आक्रमणाचा प्रतिकार करण्याचा संकल्प केला.
- १८५७ पासुन मुंबईच्या समुद्रकिनारी दर गुरुवारी त्यांचे ख्रिस्ती मिशनऱ्यांशी वादविवाद सत्र होऊ लागले. सर्वधर्मियांना खुले असे. त्यापैकी रेव्हरंड विल्सन या ख्रिस्त धर्मापदेशकांबरोबर त्यांचे वादविवाद खुप गाजले.
- या ठिकाणी झालेले वादविवाद / भाषणे रेव्हरंड जॉर्ज बोएन यांनी १८९० मध्ये संपादित केलेल्या समुद्रकिनारीचा वादविवाद या पुस्तकात वाचायला मिळतात.
- विष्णुबुवांनी पुनर्विवाह, घटस्फोट शुद्धीकरण, प्रौढविवाह याविषयी आयुष्यात बरेच प्रयत्न केले तसेच समाजातील अंधश्रद्धा, खुल्या समजूती व लोकभ्रम दुर करण्यासाठी ते नेहमी कार्यशिल राहिले.
- विष्णूबुवांनी वर्तमानदीपिका या वृत्तपत्राद्वारे वैदिक धर्मावरील टिकेला चोख प्रत्युत्तर दिले. त्यासाठी समाजाचे सर्व घटक समान आहेत असे प्रतिपादन केले.
- विष्णूबुवांनी सेतुबंधिनी नावाची गीतेवर टीका लिहिली ही टीका अध्याय १८ श्लोक १७ पर्यंत लिहिली. पुढील टीका त्यांच्या एका शिष्याने लिहिली याचे वैशिष्ट्ये म्हणजे ती गद्य व तत्कालीन ज्ञान वैधानिक परिभाषेत लिहिलेली ही पहिलीच टीका मानावी लागेल.
- विष्णुबुवांनी वेदोक्त धर्मप्रकाश ग्रंथ लिहीला यात २५ पैकी १५ वे राजनीतीपर प्रकरण स्वतंत्र दिले असून पुढे त्यातील मतांचा विचार करून १८६७ मध्ये सुखदायक राज्यप्रकरणी निबंध हे पुस्तक लिहिले. या पुस्तकाची तुलना कार्ल मार्क्सच्या दास कॅपिटलशी केली गेली. यात त्यांनी आदर्श राज्याची कल्पना मांडली व सर्व प्रजा म्हणजे एक कुटूंब अशी भूमिका विष्णुबुवांनी घेतली. यातून त्यांच्या समाजवादी मनोवृत्ती दिसून आल्याने काही अभ्यासक त्यांना महाराष्ट्राचा पहिला समाजवादी म्हणतात.
- **भाष्य व भाष्यकार :**

**१) ह. मो. मराठे (महाराष्ट्रगाथा ग्रंथात)**

विष्णूबुवांनी आपल्या विचारांचा सर्वत्र प्रचार केला पण महाराष्ट्रावर त्यांच्या विचाराचा परिणाम नाही.

**२) ग. त्र्य. मांडखोलकर :**

विष्णूबुवा म्हणजे कम्युनिझमचा पहिला प्रतिपादक असे म्हटले.

**३) प्रभाकर वैद्य :**

विष्णूबुवा हे खऱ्या अर्थाने विचारकही नव्हते. क्रांतीकारक तर मुळीच नव्हते.

- **ग्रंथसंपदा**

१) सेतुबंधनी टीका
२) भावार्थ सिंधू
३) वेदोक्त धर्मप्रकाश (आई-मुलीचा संवाद)
४) सुखदायक राज्यप्रकरणी निबंध
५) सहजस्थितीचा निबंध
६) चतु:श्लोकी श्रीमद्‌भागवताचा मराठी भाषेत अर्थ
७) बोधसागर रहस्य

## ५३. आचार्य विनोबा भावे (१८९५-१९८२)

**जन्म :** ११ सप्टेंबर १८९५ (गागोदे, ता. पेण, जि. रायगड)
**मृत्यू :** १५ नोव्हेंबर १९८२ (पवनार आश्रम, वर्धा)
**संपूर्ण नाव :** विनायक नरहर भावे
**मुळ गाव :** वाई
**वडिल :** नरहर शंभुराव भावे
**आई :** रुख्मीणी (रखमाबाई)
**टोपण नाव :** विनोबा (गांधीजीकृत नाव)
**प्रभाव :** महात्मा गांधी
**उपाधी :** आचार्य

- १९१३ बडोदा येथे मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण
- १९१४ बडोदा कॉलेजात विद्यार्थी मंडळाची स्थापना.
- ७ जून १९१६ कोचरब येथील सत्याग्रहाश्रमात गांधीजीशी विनोबाची पहिली भेट.
- ८ एप्रिल १९२१ वर्धा आश्रमाचे संचालक म्हणून नेमणुक.
- जानेवारी १९२३ महाराष्ट्र धर्म मासिक सुरु.
- १३ एप्रिल १९२३ नागपूर - झेंडा सत्याग्रहात सहभाग.
- १८ जून १९२४ महाराष्ट्र धर्म मासिकाचे साप्ताहिकात रुपांतर.
- १९३१ आईच्या इच्छापूर्तीसाठी भगवत गितेचे अध्ययन करुन 'गीताई' हे समश्लोकी मराठीत भाषांतर.
- १९ फेब्रुवारी १९३२ धुळे तुरुंगात १८ व्याख्याने
- १९ जून १९३२ गिता प्रवचन म्हणून प्रसिद्ध झाली.
  - भारतातील सर्व भाषामध्ये प्रकाशित.
  - यामध्ये गीतेला विनोबांनी साम्ययोग हे नाव दिले.
- १४ जुलै १९३२ गीताईच्या पहिल्या आवृत्तीचे धुळे जेलमध्ये प्रकाशन.
- ६ मे १९३२ वर्ध्याजवळ ग्रामसेवा मंडळाची (गोपुरची) स्थापना.

- २ ऑक्टोबर १९३६ फैजपूर येथिल राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनात मुहूर्तमेढ विनोबाच्या हस्ते.
- १९३६ महारोगी सेवा मंडळाची स्थापना वर्धा येथे.
- २० ऑक्टोबर १९४० गांधीच्या वैयक्तीक सत्याग्रह आंदोलनातील पहिले वैयक्तीक सत्याग्रही विनोबा भावे.
- ऑगस्ट १९४२ चले जाव चळवळी दरम्यान विनोबांना अटक.
  - वेल्लोरे तुरुंगात विनोबांनी १०८ दिवस प्रवचने दिली, ती वेल्लोर प्रवचने म्हणून विनोबा साहित्य खंड ५ मध्ये प्रसिद्ध.
  - शिवणी तुरुंगात गीतेवर १८ प्रवचने दिली ती स्थितप्रत दर्शन या नावाने प्रसिद्ध आहे.
- १८ एप्रिल १९५१ भूदान चळवळ - सब भूमी गोपाल की तेलंगणातील नालगोंडा जिल्ह्यातील पोचमपल्ली गावातून चळवळ प्रारंभ.
  - याच गावातील श्री. रामचंद्र रेड्डी यांनी आपली १०० एकर जमीन दान देऊन भूदान चळवळीचा प्रारंभ केला.
- ११ जुलै १९५७ केरळ येथे शांतीसेना स्थापन केली.
  - पहिले सेनापती म्हणुन केलप्पनजी यांची निवड विनोबांनी केली.
- १९५८ रॅमन मॅगसेस पुरस्कार मिळवणारे पहिले भारतीय.
- १५ ऑगस्ट १९६० इंदूर येथे सर्वोदय कार्यकर्त्यासाठी विसर्जन आश्रमाची स्थापना.
- ५ मार्च १९६२ भारत-चीन सिमेवरील नेफा येथे मैत्री आश्रमाची स्थापना.
- ८ मार्च १९६६ बिहारमधील कहलगाव येथे आचार्य कुलाची स्थापना.
- ७ जून १९६६ सूक्ष्म कर्मयोगाचा प्रारंभ (पवनार आश्रम)
- १९७५ वर्धा येथील पवनार गावात परमधाम आश्रमाची स्थापना.
- ११ सप्टेंबर १९७६ गोहत्या विरोधात आमरण उपोषणाची घोषणा.
- १५ नोव्हेंबर १९८२ वयाच्या ८७ व्या वर्षी वर्धा येथील पवनार आश्रमात सकाळी ९ : ३० वा. ब्रहनिर्वाण
- १९८३ भारत सरकारकडून मरणोत्तर भारतरत्न.

- **ग्रंथसंपदा :**

| | |
|---|---|
| गिताई | विचार पोथी |
| स्थित प्रदर्शन | अनुशासन |
| संतांचा प्रसाद | ऋग्वेदसार |
| वेदनासुधा | मधुकर |
| अभंगवृत्ते | ख्रिस्त धर्मप्रसार |
| गीता-प्रवचने | विनयांजली |
| कुराण सार | आष्टादशी (सार्थ) |

## ५४. प्रल्हाद केशव अत्रे / आचार्य अत्रे (१८९८-१९६९)

**जन्म :** १३ ऑगस्ट १८९८ **मृत्यू :** १३ जून १९६९
**जन्मगाव :** कोडित खुर्द, ता. पुरंदर **टोपण नाव :** केशवकुमार
**वडिल :** केशव विनायक अत्रे
**आई :** अन्नपूर्णाबाई

- मराठीतील प्रसिद्ध लेखक, कवी, नाटककार, संपादक, पत्रकार, मराठी व हिंदी चित्रपट निर्माते, शिक्षणतज्ञ, राजकारणी व वक्ते
- संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील प्रमुख नेते.
- १९२३ अध्यापन मासिक
- १९२४ मुंबईच्या सरकारी ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिक्षणशास्त्राचे प्रशिक्षण घेऊन बी. टी. परीक्षेत वर्गात प्रथम.
- १९२६ रत्नाकर मासिक
- १९२९ मनोरमा मासिक
- १९३४ नारद - नारदी चित्रपटाची कथा व संवादावर लेखन.
- १९३५ नवे अध्यापन मासिक
- १९३७ धर्मवीर पटकथा (हंस पिक्चर्ससाठी)
- १९३७ पुणे नगरपालिकेत निवडून आल्यानंतर शिक्षकांसाठी गांधी ट्रेनिंग कॉलेज सुरु.
- १९३८ 'हंस' साठीच ब्रह्मचारी कथा लेखन.
- १९३९ इलाखा शिक्षक मासिक
- १९४० नवयुग पिक्चर्सतर्फे लपंडाव चित्रपटाची कथा अत्र्यांनी लिहीली.
- १९ जानेवारी १९४० - नवयुग साप्ताहिक (१९६२ पर्यंत चालू)
- २ जून १९४७ - जयसिंग सांजदैनिक मासिक
- १५ नोव्हेंबर १९५६ - मराठा दैनिक

- **अध्यापन कार्य :**

- मुंबई - सँडर्स्ट हायस्कूलमध्ये इंग्रजी व गणित शिकवले.
- फोर्टमधल्या भरडा न्यू हायस्कूल - संस्कृत शिक्षक
- पुणे - कॅम्प एज्यूकेशन सोसायटीच्या शाळेत १८ वर्षे मुख्याध्यापक.

- **इतर :**

- पुणे - राजा धनराज गिरजी व मुलींची आगरकर हायस्कूल यांची स्थापना.
- नवयुग वाचनमाला (प्राथामिक शाळेसाठी) व अरूण वाचनमाला (दुय्यम शाळेसाठी) ह्या दोन क्रमिक पुस्तकाच्या माला लिहील्या.
- अत्र्यांनी दिग्दर्शित केलेल्या श्यामची आई चित्रपटाला १९५४ साली सुरू झालेल्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे पहिले सुवर्ण कमळ मिळाले होते.

- **नाटके :**

उद्याचा संसार, एकच प्याला, विडंबन, कवडी चुंबक, गरुदक्षिणा, घराबाहेर, डॉ. लागू, जग काय म्हणेल?, तो मी नव्हेच, पराचा कावळा, प्राणीग्रहण, प्रल्हाद (नाटक), प्रितीसंगम, भ्रमाचा भोपळा, ब्रह्मचारी, मी उभा आहे, मी मंत्री झालो, मोरुची मावशी, लग्नाची बेडी, वंदे भारतम, वीरवचन, शिवसमर्थ

- **काव्य :** गितगंगा, झेंडूची फुले
- **कादंबऱ्या -** चांगुणा, मोहित्यांचा शाप
- **आत्मचरित्र -** कऱ्हेचे पाणी
- **पुरस्कार :** विष्णुदास भावे पुरस्कार

## ५५. अण्णा हजारे (१९३६)

**संपूर्ण नाव :** किसन बाबूराव हजारे
**जन्म :** १५ जून १९३६ (भिंगार, अहमदनगर - महाराष्ट्र)
**निवासस्थान :** राळेगणसिद्धी
**राष्टीयत्व :** भारतीय
**टोपणनाव :** अण्णा
**शिक्षण :** सातवी
**पेशा :** समाजसेवा
**कारकिर्दीचा काळ :** १९६२-१९७८ (सैन्यदल)
**प्रसिद्ध कामे -** माहितीचा अधिकार, भ्रष्टाचाराविरुद्ध जनजागृती
**कार्यकाळ -** १९७८ पासून (समाजसेवक)
**वडिल :** कै. बाबूराव
**आई :** कै. लक्ष्मीबाई
**प्रकाशित साहित्य :** माझे गाव माझे तिर्थ (लेखक - अण्णा हजारे)

- भारतातील एक ज्येष्ठ महाराष्ट्रीय समाजसेवक आहेत.
- १९९० साली समाज सेवेच्या कार्याबद्दल भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार.
- १९९२ साली पद्मभूषण या पुरस्काराने सन्मानित
- ग्रामस्थांच्या सहकार चळवळीद्वारे राळेगण सिद्धी या गावाचा कायापालट घडवून आणला.
- माहितीचा अधिकार कायाद्यासाठी आंदोलने.
- भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलने
- लष्करात असतांना पाच पदके.

**लष्करी सेवा :**

- १९६२ मध्ये सैन्यात भरती.
- १९६३ मध्ये त्यांना वाहनचालकाचे पद दिले गेले.
- १९७८ मध्ये त्यांनी भारतीय लष्कराचा राजीनामा दिला.

**उपोषणे :** एकूण १६ उपोषणे, त्यापैकी १३ उपोषणे महाराष्ट्र सरकारच्या विरोधात तर ३ उपोषणे केंद्र सरकारच्या विरोधात.

- १५ वे आणि १६ वे उपोषण हे जनलोकपाल विधेयकासाठी.
- १९८० साली पहिले यशस्वी उपोषण - अहमदनगर जिल्ह्यातील नापासांची शाळा
- १ ते ६ मे १९९४ भ्रष्टाचार विरोधातील उपोषण (पाचवे उपोषण)
- ९ ऑगस्ट २००३ ला उपोषणास सुरूवात - माहितीचा अधिकार कायदा. (नववे उपोषण)
- ९ फेब्रुवारी २००४ ला उपोषणास सुरूवात - माहितीचा अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीसाठी (दहावे उपोषण)
- ९ ऑगस्ट २००६ ला उपोषण सुरूवात - माहितीचा अधिकार कायद्यात सुधारणा मान्य नव्हती. (आकरावे उपोषण)

**पुरस्कार :**

| वर्षे | पुरस्काराचे नाव | पुरस्कार देणारी संस्था |
|---|---|---|
| २००७ | जिट गिल मेमोरिअल अवॉर्ड | वल्ड बँक |
| २००५ | मानद डॉक्टरेट | गांधीग्राम रूरल युनिव्हर्सिटी |
| २००३ | इंटिग्रिटी पुरस्कार | ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल |
| १९९८ | केअर इंटरनॅशनल पुरस्कार | केअर (संस्था) |
| १९९७ | महावीर पुरस्कार | - |
| १९९६ | शिरोमणी पुरस्कार | - |
| १९९२ | पद्मभूषण पुरस्कार | राष्ट्रपती |
| १९९० | पद्मश्री पुरस्कार | राष्ट्रपती |
| १९८९ | कृषिभूषण पुरस्कार | महाराष्ट्र सरकार |
| १९८६ | इंदिरा प्रियदर्शिनी वृक्षमित्र पुरस्कार | भारत सरकार |
| २०१५ | मोहन धारिया राष्ट्रनिर्माण पुरस्कार | वनराई फाउंडेशन |

## ५६. रमेशचंद्र दत्त (१८४८-१९०९)

**जन्म :** १३ ऑगस्ट १८४८ (कोलकाता)

**मृत्यू :** ३० नोव्हेंबर १९०९ (बडोदा)

- रामायण आणि महाभारताचा इंग्रजीत अणुवादन

**शिक्षण** - कोलकाता विश्वविद्यालय, युनिवर्सिटी कॉलेज लंडन

**व्यवसाय** - इतिहासकार, अर्थशास्त्री, भाषाशास्त्री, सिविल सेवक, राजनेता

**पत्नी** - मनमोहिनी दत्त

- १८६८ आर. सी. रास परीक्षेसाठी इंग्लंडला
- १८६९ परीक्षा उत्तीर्ण
- १८७१ थ्री ईयर्स इन इंग्लंड
- उडीसाचे कमिशनर, बडोदाचे दिवान, रॉयल कमिशनचे सदस्य
- १८९९ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (लखनौ अधिवेशन अध्यक्ष)
- १८९७-१९०४ लंडन विश्वविद्यालय - भारतीय इतिहासाचे प्राध्यापक
- **ग्रंथ :**

१) ए हिस्ट्री ऑफ सविलिजेशन इन एशेंट इंडिया
२) लेटर हिंदू सिविलिजेशन
३) इकॉनोमिक हिस्ट्री ऑफ इंडिया
४) इंडियंस इन दि विक्टोरियन एज
५) ए हिस्ट्री ऑफ दि लिटरेचर ऑफ बंगाल
६) दि महाभारत रोड दि रामायण
७) लेज ऑफ एन्शीएंट इंडिया
८) ग्रेट एपिक्स ऑफ एन्शीएंट इंडिया
९) शिवाजी
१०) लेक ऑफ पाम्स
११) दि स्लेव गर्ल ऑफ आगरा
१२) थ्री ईसर्स इन इंग्लंड
१३) वि पेजैंट्री ऑफ बंगाल
१४) ऋग्वेद
१५) इंग्लंड ॲन्ड इंडिया
१६) बंगबिजेता (१८७४)
१७) माधबीकंकण (१८७७)
१८) महाराष्ट्र जीवन प्रभात (१८७८)

१९) राजपुत जीवन संध्या (१८७९)
२०) संसार (१८८६)
२१) समाज (१८९४)
२२) शतवर्ष
२३) संसार कथा

## ५७. उषा मेहता (१९२०-२०००)

**जन्म :** २५ मार्च १९२०
**मृत्यू :** ११ ऑगस्ट २०००
**प्राथमिक शिक्षण -** खेडा
**वडिल :** ब्रिटीश राजवटीतील न्यायाधीश
**शिक्षण :** मॅट्रीक (१९३५)

- १९२८ सायमन कमिशन विरोधी मोर्चात कार्यकर्ते
- १९४२ नंतर पूर्ण वेळ स्वतंत्र चळवळीत
- ६ मार्च १९४२ अंतरिम सरकारमध्ये गृहमंत्री मोरारजी देसाई यांच्या आदेशावरुन मुंबईत सोडण्यात येणारी पहिली राजकीय कैदी.
- ९ ऑगस्ट १९४२ गोवालिया टँक ग्राऊँडवर तिरंगा फडकविणाऱ्या एक, त्या मैदानाला ऑगस्ट क्रांती मैदान नाव.
- २७ ऑगस्ट १९४२ इंटेलिजेंस काँग्रेस रेडिओ चे पहिले प्रसारण 'धिस इज वेव्हेलंग्थ ४२.३४ मीटर्स फ्रॉम समव्हेअर इन इंडिया.
- १९८० मुंबई विद्यापिठातून निवृत्ती.
- १९९८ भारत सरकारकडून पद्मविभूषण व नागरी पुरस्कार
- १ ऑगस्ट १९४२ भारत छोडो चळवळीत सहभाग.
- राजकीय विचारावर पी. एच. डी.
- गांधी विचारात पी. एच. डी.
- प्रसिद्ध - भारताच्या गांधीवादी आणि स्वातंत्र्यसेनानी
- नागरी राजकारण विभागाच्या प्रमुख.
- गांधी स्मारक विधीच्या अध्यक्षा.
- गांधी पिस फाउंडेशनच्या सदस्या.
- नियोक्ता - विल्यम कॉलेज, मुंबई (१९८०)
- **मृत्यू -**११ ऑगस्ट २००० - तापाने
- **त्यांचे पुतने :**

१) केतन मेहता : बॉलीवुडचे नामांकित चित्रपट निर्माते.
२) डॉ. निरज मेहता : पिडी हिंदूजा नॅशनल हॉस्पीटल (मुंबई)
३) डॉ. यतीन मेहता : गुडगाव - मेडिसिटीशी संबंधीत

## ५८. दादोबा पांडुरंग तर्खडकर (१८१४-१८८२)

**जन्म :** ९ मे १८१४ (मुंबई)
**मुळ गाव :** तर्खड (वसई जि. ठाणे)
**प्राथमिक शिक्षण :** बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी शाळेत.

- १८३५ जावरा संस्थानच्या नवाबाचे शिक्षक.
- १८३६ मराठी भाषेचे व्याकरण हे पुस्तक म्हणून - पाणिनी
- एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्ये असिस्टंट टीचर.
- १८४४ मिठाच्या कराविरुद्ध मोर्चा
- १८४४ सुरतमध्ये दुर्गाराम मंचाराम, दीनमणी शंकर दलपतराय यांच्या सहकार्याने मानवधर्म सभा स्थापन.
- १८४६ बाळशास्त्री जांभेकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या जागी ट्रेनिंग कॉलेजचे संचालक म्हणून नियुक्ती.
- १८४८ ज्ञानप्रसारक सभेची स्थापना.
- १८४९ परमहंस सभेच्या स्थापनेत महत्त्वाचा वाटा.
- १८५२ बॉम्बे असोसिएशनच्या स्थापनेत मोलाचे कार्य.
- १८५२ अहमदनगरचे डेप्युटी कलेक्टर म्हणून नियुक्ती.
- १८५७ नगर येथील भिल्लांचे बंड मोडून काढल्याबद्दल सरकारकडून रावबहादूर हा किताब.
- १८६२ नोकरीतून निवृत्त.
- **ग्रंथसंपदा :**

  १) मराठी भाषेचे व्याकरण - १८३६
  २) मराठी व गुजराती नकाशांचे पुस्तक - १८३६
  ३) मराठी लघु व्याकरण - १८६५
  ४) धर्मविवेचन १८६८
  ५) विधवा श्रुमार्जन - संस्कृत लेख
  ६) परमहांसिक ब्राहम धर्म १८८०
  ७) मराठी भाषेच्या व्याकरणाची पुराणिका (१८६०)
  ८) शिशुबोध - १८८४ (मरणोत्तर प्रकाशित)
- **मृत्यू -** १७ ऑक्टोबर १८८२

## ५९. गोपाळ गणेश आगरकर (१८५६-१८९५)

**जन्म :** १४ जुलै १८५६ (टेंभू - जि. सातारा)
**वडिल :** गणेश आगरकर
**प्राथमिक शिक्षण :** कऱ्हाड (मामाकडे)
**मॅट्रिक पर्यंत शिक्षण -** अकोला

- वऱ्हाड समाचार लेख
- पुण्यात १८८१ इतिहास व तत्वज्ञान विषय घेऊन एम. ए. केले. १८८० न्यु इंग्लिश स्कूल, स्थापनेत पुढाकार घेतला. (आगरकर, विष्णुशास्त्री चिपळूनकर, टिळक)

**शैक्षणिक :**

- २४ ऑक्टोबर १८८४ आगरकर आणि टिळक यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना.
- १८८५ फर्ग्युसन कॉलेज स्थापना.
- आगरकर १८९२-९५ मध्ये फर्ग्युसन कॉलेजचे प्राध्यापक.
- १८८५ न्यु इंग्लिश स्कूलचे सुप्रीटेडंट म्हणून नियुक्ती
- १८९० फर्ग्युसन कॉलेज व डेक्कन एज्यु. सोसायटी सदस्यांचा राजीनामा.
- प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे.
  जे पालक मुलामूलींना प्राथमिक शिक्षण देणार नाही त्यांना दंड.
- मुलामूलींना बरोबरीने शिक्षण देण्याची भूमिका.
- विद्यापीठ शिक्षणाचे माध्यम देशी असावे असे त्यांना वाटत होते.
- प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने घ्यावी.

- **वाङमयीन कार्य :**
- लोकमान्य टिळकांनी सुरु केलेल्या केसरी व मराठा यापैकी केसरीचे संपादक आगरकर.
- इष्ट असेल तर बोलणार व साध्य असेल तेच करणार - हे केसरीचे ब्रिद वाक्य.
- मतभेदामुळे २५ ऑक्टोबर १८८७ ला केसरीचे संपादकत्व सोडले.
- १५ ऑक्टोबर १८८८ सुधारक हे साप्ताहिक काढले. (मराठी लेखन)
- आगरकरांच्या मृत्यूनंतर १९१४ पर्यंत देवधर व पटवर्धन यांनी वृत्तपत्र चालवली. तर १९१४-१६ पर्यंत रामचंद्र विष्णु करनडे यांनी सुधारक चालविली.
- स्त्रियांनी जाकिटे घातलीच पाहिजे असा लेख लिहीला.
- हिंदूस्थानचे राज्य कोणासाठी या निबंधात त्यांनी सरकारचा स्वार्थीपणा अधोरेखित केला.
- गुलामांचे राष्ट्र या पुस्तकात त्यांनी भारतीयाकडे धैर्य, ज्ञान, उत्साह यांची उणीव आहे, ते कष्टाळू नाहीत आणि त्यांच्याकडे सत्य सांगण्याची हिम्मत नाही असे लिहिले.

- **सामाजिक कार्य :**
- बुद्धीवादाचा आधार घेऊन सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला.
- व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केला.
- आगरकरांनी सुधारक वृत्तपत्राच्या पहिल्या अंकात हिंदू सामाजाच्या दुरावस्थेची कारणे -

| | |
|---|---|
| १) लोकांची भूगोल व इतिहासाविषयीचे अज्ञान | २) समाजातील तर्कहीन आकार - विचार |
| ३) समाजातील जातीभेद अस्पृश्यता | ४) समाजातील स्त्रीयांची हलाखीची परिस्थिती |
| ५) देशातील परंपरागत राजेशाही | ६) लोकांतील देशाभिमानाचा अभाव |

- पुणे पालिकेच्या ताब्यातील पाण्याच्या हौदावर 'ब्राह्मणासाठी' व 'क्षुद्रांसाठी' असे फलक होते. त्यावर ३० जानेवारी १८९३ ला आगरकरांनी मुन्सिपल हौद व 'ब्राह्मन्यांवर गदा' हा लेख लिहून अस्पृश्यतेवर टिका केली.
- **स्त्री सुधारणा :**
- त्यांच्या मते स्त्रियांच्या दु:स्थितीचे सर्वात मोठे कारण म्हणजे बालविवाह.
- विद्यार्थी व सुशिक्षीत तरुणांना बालविवाह विरोध पुढाकार घ्यायला सांगितले, त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र बालविवाह निर्बंधक मंडळी स्थापावी व त्याची संख्या २००० असावी व निधि उभारावा म्हणजे बालविवाह विरोधात यशस्वी कार्य करता येईल असे सांगितले.
- स्त्रीयांच्या स्वयंवर विवाह पद्धतीस विरोध
- ५०/६० वर्षाचा पुरुष व ११/१२ वर्षांची मुलगी यांचा विवाहाला जरठ विवाह म्हणतात. त्यांनी जरठविवाहास विरोध केला.
- **स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार :**
- सुधारकमध्ये मराठमोळा व मराठमोळ्याची पूरवणी हे लेख लिहीले.
- स्त्री पुरुषात समानता.
- संतती नियमाला पाठींबा दिला.
- **धार्मिक विचार : मूर्तीपुजा मान्य नव्हती.**
- मुर्तीपूजेचा उद्रेक व मुर्तीपूजेचे प्रकार हा लेख लिहिला.
- ईश्वराचे अस्तित्व नाकारले.
- पशुहत्येवर टीका केली.
- आगरकरांनी १९ व २६ डिसेंबर १८९२ रोजी सुधारकमध्ये प्रेनक्रिया व प्रेतसंस्कार शिर्षकाचे २ लेख लिहिले.
- सोवळ्यांची मिमांसा व सोवळ्या ओवळ्यांची पूरवणी हे दोन लेख लेहून सोवळ्या ओवळ्यांची कल्पना मांडली.
- आगरकरांना बद्धीवादाचे जनक म्हटले जाते.

- **इतर :**

- अकोल्यातील शिक्षण 'व्ही. एम. महाजनी' या शिक्षकाच्या मदतीने विधवा विवाहाचा पुरस्कार केला व केशव कर्वे आणि गोंदूताईचा विवाह घडविला.
- पुण्यातील सनातनी मंडळींनी आगरकर जिवंत असतानाच त्यांची प्रेत यात्रा काढली.
- वाक्य मिमांसा व वाक्याचे पृथ्थकरण (१८८८), केसरीतील निवडक निबंध भाग - १ व २ (१८८७) जात्युच्छोक निबंध शेठ माधवदास रघुनाथदास व धनकुवरबाई यांचे पूनर्विवाह चरित्र लिहीले.
- शब्दापेक्षा ज्ञान व ज्ञानपेक्षा विज्ञान शेष्ठ अशी भावना.

- **भाष्यकार :**

- **गो. कृ. गोखले -** विद्वान पंडित, देशभक्त, निर्भय शक्तीवान पुरुष म्हणजे आगरकर. यांच्यासारखी माणसे कित्येक वर्षात एखाद्या वेळीच जन्माला येतात म्हणून त्यांचा मृत्यू राष्ट्रीय आपत्ती ठरतो.
- **मे. पु. रेगे -** 'आगरकर हे विवकवादाचा संत होते.
- गोपाळ गणेश आगरकर याच्या स्मृतीप्रित्यर्थ आचार्य अत्रे यांनी पुण्यात इ. स. १९३४ साली 'आगरकर हायस्कूल' ही मूलींची शाळा स्थापन केली.
- **मृत्यू -** १८९५

## ६०. आण्णाभाऊ साठे (१९२०-१९६९)

**जन्म :** १ ऑगस्ट १९२०
**मृत्यू :** १८ जुलै १९६९
**जन्म ठिकाण :** वाटेगाव ता. वाळवा, जि. सांगली
**पूर्ण नाव :** तुकाराम भाऊराव साठे
**वडिल :** भाऊराव
**आई :** वालुबाई
**पत्नी :** कोंडाबाई साठे, जयवंता साठे
**आपत्य :** मधुकर, शांता, शकुंतला

- १४ व्या वर्षी प्राथमिक शिक्षणाला सुरुवात.
- रेठर्याच्या जत्रेत क्रांतीसिंह नाना पाटील यांचे भाषण ऐकले त्यांचा परिणाम भाऊवर झाला.
- कमुनिस्ट पक्षाचे काम करत असताना त्याच्या तुकाराम नावाचे अण्णा मध्ये रुपांतर झाले.
- वयाच्या १७ व्या - १८ व्या वर्षी अण्णांवर कुटूंबाची जबाबदारी आली व गिरणी कामगार म्हणुन कामाला सुरुवात केली. - कोहिनुर मिल
- मिलमधील नोकरी सुटल्यानंतर कुटूंबासह वाटेगावला आले इथे गावाकडे रमले नाही व ते नातेवाईकांच्या तमाशा फडात शामिल झाले.
- भारतीय स्वातंत्र्य चळवळीसह संयुक्त महाराष्ट्र चळवळ गोवा मुक्तीसंग्रामाच्या चळवळीत त्यांनी जनजागृती केली.
- वाटेगावात ते चलेजाव चळवळीत बर्डे गुरूजींसोबत त्यांच्यावर अटकवॉरंट निघाले पुढे ते कम्युनिस्ट पक्षाचे पुर्णवेळ काम करू लागले.
- १९४४ लालबावटा कलापथकाची स्थापना (सहकारी - शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर)
- मुंबईतील माटुंगा लेबर कॅम्प या दलीत वस्तीत कमुनिस्ट चळवळीत कार्य सुरु.
(सहकारी - आर. बी. मोरे, के. एम. साळवी, शंकर पगारे)

- पहिले गाणे - लेबरकॅम्प मच्छरांवर लिहीले.
- १९५० ते १९६२ हा काळ आण्णांचा साहित्य क्षेत्रातील सुवर्णकाळ.
- मुंबई सरकारने लालबावटा कलापथकावर बंदी घातली.
- तमाशावर बंदी आल्याने आण्णांनी तमाशाचे लोकनाट्यात रूपांतर करून तमाशा कलेचा उद्धार केला.
- ३०० पेक्षा जास्त कथा.
- १६ ऑगस्ट १९४७ भारतीय स्वातंत्र्यानंतर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य नव्हते म्हणुन मुंबई येथे २० हजार लोकांचा मोर्चा काढला.
- मोर्चातील घोषणा - ये आझादी झुटी है, देश कि जनता भुखी है !
- १९५८ बॉम्बे - दलित साहित्य संमेलन
  उद्‌घाटन भाषणात त्यांनी म्हटले की, 'पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसुन दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे.'
- १ ऑगस्ट २००१ - ४ रू. टपाल तिकिटावर साठेंचे चित्र ठेवले होते.

- **साहित्य - कथासंग्रह :**

| | | |
|---|---|---|
| १) निखारा | २) नवती | ३) फरारी |
| ४) पिसाळलेला माणुस | ५) जिवंत काडतुस | ६) आबी |
| ७) खुळंवाडा | ८) गजाआड | ९) बरबाद्या कंजारी (१९६०) |
| १०) चिरानगरीची भुतं (१९७८) | ११) कृष्णाकाढच्या कथा | १२) उपकाराची फेड |
| १३) कोंबडी चोर | १४) बंडवाला | १५) मरीआईचा गाडा |
| १६) रामोशी | १७) वळणसापळा | |

- **कादंबऱ्या :**

\- १९६१ फकिरा कादंबरीला महाराष्ट्र सरकारचा सर्वोत्त्कृष्ठ कादंबरीचा पुरस्कार.

| | | | |
|---|---|---|---|
| १) चित्रा (१९४५) | २) फकिरा (१९५९) | ३) माकडीचा माळ | ४) वारणेचा वाघ (१९६८) |
| ५) रानगंगा | ६) चिखलातील कमळ | ७) वैजयंता | ८) रत्ना |
| ९) गुलाम | १०) रुपा | ११) चंदन | १२) मथुरा |
| १३) आवडी | १४) वैर | १५) पाझर | १६) अग्निदिन्य |
| १७) संघर्ष | १८) अलगुज | १९) अहंकार | २०) आग |
| २१) आघात | २१) केवड्याच कर्णास | २३) कुरूप | २४) ठासलेल्या बंदुका |
| २५) डोळे मारीत राधा चाले | २६) धुंद रानपुलाचा | २७) फुलपाखरू | २८) तास |
| २९) मंगला | ३०) मास्तर | ३१) मुर्ती | ३२) रावा |
| ३३) रानबोका | | | |

- **लोकनाट्य :**

| | | |
|---|---|---|
| १) अकलेची गोष्ट (१९४५) | २) देशभक्त घोटाळे (१९४६) | |
| ३) शेटजीचे इलेकशन (१९४६) | ४) बेकायदेशी (१९४७) | |
| ५) पुढारी मिळाला (१९५२) | ६) लोकमंत्र्यांचा दौरा (१९५२) | |
| ७) माझी मुंबई | ८) कापऱ्या चोर | |
| ९) मुक मिरवणुक | १०) कलंत्री | |
| ११) बिलंदर बुडाचा | १२) दुष्काळात तेरावा | १३) निवडणुकीतील घोटाळे |

- **नाटके :**

  १) इमानदार (१९५८)   २) पेंग्याच लगीन   ३) सुलतान

- **लेखनावर आधारित चित्रपट :**

  १) वैजयंता (१९६१, कादंबरी वैजयंता)
  २) टिका लावते मी रक्ताचा (१९६९) कादंबरी - आवडी
  ३) डोंगराची मैना (१९६९ कादंबरी- माकडीचा माळ)
  ४) १९६९ मुरली मल्हारीरायाची (कादंबरी चिखलातील कमळ)
  ५) १९७० वारणेचा वाघ (कादंबरी - वारणेचा वाघ)
  ६) १९७४ अशी ही साताऱ्याची तऱ्हा (कादंबरी - अलगुज)
  ७) फकिरा (कादंबरी - फकिरा)
  ८) २०१२ चित्र (कादंबरी - चित्रा)

- **पोवाडे :**

  १) अमळनेरचे अमर हुतात्मे
  २) तेलंगणाचा संग्राम
  ३) नानकीन नगरापुढे
  ४) पंजाब दिल्लीचा दंगा
  ५) बंगालची हाक
  ६) बर्लिनचा पोवाडा
  ७) काळ्या बाजाराचा पोवाडा
  ८) महाराष्ट्राची परंपरा
  ९) मुंबईचा कामगार
  १०) स्टॅलीन ग्राडचा पोवाडा

- **आण्णाभाऊ साठे साहित्य :**

  कादंबऱ्या - ३५
  लोकनाट्य - १४
  कथासंग्रह - १३
  पोवाडे - १०
  पटकथा - ८
  नाटके -३
  प्रवासवर्णन - १
  उपहासात्मक लेख - १२

- अण्णांच्या 'शाहिर' या पुस्तकाला जेष्ट कम्युनिस्ट नेते एस. ए. डांगे यांनी प्रस्तावणा लिहून अण्णांचा गौरव केला.
- अण्णांच्या इमानदार नाटकास हिंदी प्रयोगासाठी कम्युनिस्ट पक्षाची संबंधीत इंडियन पिपल्स थिएटर असोसिएशन (ईप्टा) च्या बलराज सहानी पुढाकार घेतला.
- पुढे आण्णा इप्टाचे अध्यक्ष झाले.
- चिनी जणांची मुक्तीसेवा हे चिनी क्रांतीवरील व जग बदल घालुनी घाव - सांगुन गेले भिमराव हे आंबेडकरावरील गाणे गाजले.
- मराठीतील ग्रामिण - प्रादेशिक, दलित साहित्यावर अण्णा भाऊंचे प्रभुत्व होते.
- अण्णांचे साहित्य - जगातील २७ भाषांत भाषांतरीत झाले आहे. (रशियन, फ्रेंच, पोर्तुगिज झेक इ.)
- रशियातील कलावंत ॲगले अण्णाभाऊंचे मित्र होते.
- प्रमोद महाजनांनी महाराष्ट्राचे संत असा त्यांचा गौरव केला.

## ६१. गोपाळबाबा वळंगकर (१८४०-१९००)

**नाव :** सुबेदार गोपाल बाबा वलंगकर
**जन्म :** १८४० (महाराष्ट्र - महाड जिल्ह्यातील रावढळ गावात)
**मृत्यू :** इ. स. १९००
**वडिल :** विठ्ठल नाक वलंगकर

- रत्नागिरीमधील अस्पृश्यता निमूर्लनाचे कार्यकर्ता होते. महार समाजामध्ये जन्म झाला होता.
- १८८६ लष्करातून हवालदार म्हणून सेवानिवृत्त झाले.
- १८८६ सामाजिक कार्याला सुरुवात. त्यांच्यावर महात्मा ज्योतीबा फूलेंचा प्रभाव होता.
- १८८८ विटाट विध्वंसन या पुस्तकातून अस्पृश्यतेचे खंडन केले.
- अनार्य दोष परिहार - पहिली अस्पृश्योद्धारक संस्था स्थापन - १८९०
- दलितांमधील पहिले वृत्तपत्र वार्ताहार म्हणून ओळखले जातात.
- गोपाळबाबा वलंगकर यांच्या सामाजिक कार्याची स्तूती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली.
- १८८८ - सामाजिक आंदोलनासंबंधी क्रांतीकारी पुस्तक लिहिले, त्यामध्ये २६ प्रश्न विचारले. हे सर्व प्रश्न धर्मग्रंथावर आधारित होते. यामध्ये त्यांनी सनातनी हिंदी किती स्वार्थी आणि मतलबी आहेत, हे सांगितले आहे.
- अस्पृश्यांच्या दयनीय अवस्थेला जबाबदार हिंदू आणि त्यांचे धर्मग्रंथ आहेत, असे त्यांचे मत होते.
- सामाजिक उत्थान संबंधित पत्र-पत्रिकामध्ये लेख लिहिले. यामध्ये दलितांची दयनीय अवस्था व त्यांच्यावरील अत्याचारावरच आधारित लेख असायचे.
- १८८५ गोपाळबाबा वलंगकर यांचे सामाजिक कार्य बघून इंग्रजांनी त्यांना महाड जिल्ह्यामध्ये लोकल बोर्डचे सदस्य म्हणून निवड करण्यात आली.
- १८९४ गोपाळबाबा वलंगकर यांनी मुंबई प्रांताच्या मुख्य लष्कराधिकाऱ्याला लांबलचक विनंतीपत्र लिहून महार समाजाच्या व्यथा मांडल्या.
- विनंतीपत्र हे कोकणातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील दलितांचा पहिला दस्तऐवज समजला जातो.
- एका दृष्टीने हे विनंतीपत्र म्हणजे महार जातीच्या लढवय्या बाप्याचा हतिहासच आहे.

## ६२. आनंदीबाई जोशी (१८६५-१८८७)

**जन्म :** ३१ मार्च १८६५
**ठिकाण :** पुणे (महाराष्ट्र)
**मृत्यू :** २६ फेब्रुवारी १८८७
**शिक्षण :** एम. डी.
**पेशा :** वैद्यकीय
**ख्याती :** भारतातील पहिल्या महिला डॉक्टर
**लहानपणचे नाव :** यमुना

- वयाच्या ९ व्या वर्षी गोपाळराव जोशी यांच्याशी विवाह. (हे गोपळरावांचे दुसरे लग्न होते.)
- गोपाळरावांनी लग्नानंतर यमुना हे नाव बदलून आनंदीबाई जोशी हे नाव ठेवले.
- १४ वर्षांनी एका मुलास जन्म, १० दिवसात मुलगा मरण पावला तेव्हा शिक्षणाचा निश्चय केला.
- शिक्षणासाठी मिसेल टी. ई. कार्पेन्टर यांनी मदत केली.

- १७ व्या वर्षी (अमेरिकेत) फिलकेल्फीया येथिल वुमेन्स मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश.
- ११ मार्च १८८६ रोजी पेनसिल्वानिया विद्यापीठातून एम. डी. ची परीक्षा उत्तीर्ण.
- विषय - हिंदू आर्य लोकांमधील प्रसूतीशास्त्र
- व्हिक्टोरिया राणीकडून सुद्धा त्यांचे अभिनंदन झाले.
- २६ नोव्हेंबर १८८६ भारतात परतल्या.
- त्यांना कोल्हापूरमधील अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटलमधील स्त्री-कक्षाचा ताबा देण्यात आला.
- क्षय रोगाच्या व्याधीने वयाच्या २१ व्या वर्षी २६ फेब्रुवारी १८८७ रोजी पुणे येथे निधन.
- चित्रपट - आनंदी गोपाळ (२०१९) मध्ये प्रदर्शित.
- डॉक्यड्रामा हा लघूपट त्यांच्या जीवनावर तयार केला व त्यास महाराष्ट्राचा सर्वोत्कृष्ट लघूपट पुरस्कार मिळाला.
- **जीवनाबद्दलची पुस्तके :**

  १) कै. सौ. डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र - काशीबाई कनेटकर

  २) आनंदी गोपाळ - श्री. ज. जोशी यांची कादंबरी

  ३) डॉ. आनंदीबाई जोशी - काक आणि कर्तृत्व

## ६३. विष्णुशास्त्री चिपळूणकर (१८५०-१८८२)

**जन्म :** २० मे १८५०

**मृत्यू :** १७ मार्च १८८२

**जन्मगाव :** पुणे - महाराष्ट्र

**कार्यक्षेत्र :** साहित्य, पत्रकारिता, शिक्षण, राजकारण

**पूर्ण नाव :** विष्णूशास्त्री कृष्णशास्त्री चिपळूणकर

**वडिलांचे नाव :** कृष्णशास्त्री हरिपंत चिपळूणकर (नामवंत लेखक होते)

**पत्नी नाव :** काशीबाई

**भाषा :** मराठी

**साहित्य प्रकार :** निबंध

**चळवळ :** भारतीय स्वातंत्र्यलढा

**प्रसिद्ध साहित्य :** निबंधमाला

**महाविद्यालयीन शिक्षण :** पुना कॉलेज (डेक्कन कॉलेज) येथे.

- १८५७ प्राथमिक शिक्षण इन्फंड स्कूल पुणे येथे.
- १८६१ पुना हायस्कूलमध्ये इयत्ता ४ थी पर्यंत इंग्रजीत शिक्षण.
- १८६५ मॅट्रिकचे शिक्षण पुणे येथे पूर्ण.
- १८६६ महाविद्यालयीन शिक्षण सुरवात डेक्कन कॉलेज (पुना कॉलेज) पुणे येथे.
- १८६८ वडिलांनी सुरु केलेल्या शालापत्रक या मासिकाचे संपादक म्हणून काम सुरु केले.
- १८७५ ब्रिटीश सरकारचे धोरण व ख्रिश्चन मिशनरी टीकेमुळे शालापत्रक हे मासिक ब्रिटीशांनी बंद पाडले.
- जानेवारी १८७१ बाबा गोखले यांच्या शुक्रवार पेठ, पुणे येथील शाळेत शिक्षकाची नोकरी स्वीकारली.
- १८७१ मराठी व्याकरणातील निबंध व जॉन्सनच्या 'रासेलस' कादंबरीचे मराठीत भाषांतर केले.
- १८७३ शाळा खाते प्रमुख चॅटफिल्ड यांनी वि. चिपळूनकरांची नियुक्ती पुना हायस्कूलमध्ये उपशिक्षकपदी केली.
- २५ जानेवारी १८७४ : २४ वर्षी निबंधमाला हे मासिक पुणे येथुन सुरु केले.
- मासिक जाहिरात सर्वप्रथम डिसेंबर १८७३ चा ज्ञानप्रकाश या प्रसिद्ध वृत्तपत्रातून दिली.

- निबंधमाला मासिकाचा पहिला प्रास्ताविक लेख - मराठी भाषेची सांप्रतची स्थिती (पहिला निबंध) शेवट 'आमच्या देशाच्या स्थिती' या निबंधाने
- निबंधमालेचे एकूण ८४ अंक प्रसिद्ध झाले होते.
- ८ वर्षे हे मासिक अखंड चालले.
- निबंधमालेचा उद्देश : बहूश्रुतता व योगय पुस्तकाची लोकांना माहिती देऊन मराठी भाषा समृद्ध करणे.
- जून १८७६ विष्णूशास्त्रींनी Red Rag to a bull. (बैलाला तांबडी चिंधी) हा इंग्रजांना चिथावणारा लेख लिहिला. हा निबंधमाला मासिकातील ३० वा लेख होय.
- जानेवारी १८७८ वि. चिपळूणकरांनी काशीनाथ नारायण साने, जर्नादन बालाजी मोडक यांच्या सहकार्याने काव्येतिहास संग्रह हे ४८ पानी मासिक काढले. या मासिकाचे व्यवस्थापक कृष्णाजी रघुनाथ केळकर व शंकर तुकाराम शालिग्राम हे होते.
- १८७८ बाळकृष्ण जोशी यांना सोबत घेऊन किरण छापखान्याचे समान विकत घेऊन 'चित्रशाळा' व किताबखाना सुरु केले.
- १८७९ रत्नागिरीतील शाळेच्या शिक्षक पदाचा राजीनामा दिला.
- २ जानेवारी १८८० - लो. टिळक, गो. ग. आगरकर, बाळाजी प्रभाकर भागवत, करंदीकर यांच्या सोबत पुण्यात 'न्यु इंग्लिश स्कूल' ची स्थापना केली.
- १८८० आर्यभूषण हा छापखाना टिळक, आगरकर, नामजोशी यांच्या पुढाकाराने सुरु केला.
- ४ जानेवारी १८८१ केसरीच्या पहिल्या अंकापासून केसरीतील मुख्या अग्रलेख विष्णुशास्त्री लिहीत असत. केसरीच्या पहिल्या अंकात त्यांनी उपाद्धात लिहिला आहे.
- नोव्हेंबर १८८१ वयाच्या ३२ व्या वर्षी निबंधमाला या मासिकातील आमया देशाची स्थिती हा निबंध शेवटचा लिहिला.
- २१ मार्च १८८२ विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे पहाटे ५:३० वाजता विषमज्वरामुळे निधन झाले.

- **महत्त्वाचे :**

१) शिवाजी महराज हे चिपळूणकर यांचे आराध्य दैवत होते.

२) यांचे वडिल कृष्णाजीपंत यांना बृहस्पती या पदवीने सन्मानित केले होते. कृष्णाजीपंत हे संस्कृत वेदपंडित, इंग्रजी पंडित या पाठशाळा चालवत असत.

\- १८५२ ला कृष्णजीपंत हे ट्रान्सलेटर व पुना ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपल होते व १८५१ मध्ये दक्षिणा प्राईज कमिटीचे सेक्रेटरी होते.

३) निबंधमालेतुन विष्णशास्त्री यांनी लोकभ्रंम, डॉ. जॉक्सन व मोरोपंताच्या कविता, लोकभ्रंम, शकुन, अपशकुन, धर्म चिंतन, आचारधर्म, विद्वत्व व कवित्व, भाषादूषण, लेखनशुद्धी, भाषापद्धती, भाषा शोधन, इतिहास, वकृत्व लोकहितवादी व भाषांतर अशा विषयांवर अनेक निबंध लिहिले आहेत.

४) विष्णूशास्त्री यांना सनातनी, प्रतिगामी विष्णूशास्त्री म्हटले गेले होते कारण विष्णूशास्त्री यांनी स्वामी दयानंद यांचा पुणे भेटीदरम्यान त्यांना 'निर्दयानंद स्वरस्वती' अशा शब्दांत टिका केली होती.

५) विष्णूशास्त्रींनी चित्रशाळा, आर्यभूषण, किताबखाना, न्यू इंग्लिश स्कूल या संस्था काढलेल्या होत्या.

६) विष्णूशास्त्री हे एक प्रखर राष्ट्रवादी आणि भारतीय संस्कृतीचे कट्टर स्वाभिमानी विचारवंत होते.

- **विचार :**

१) भूक लागली म्हणजे व्याकरण खाता येत नाही, तहान लागली म्हणजे काव्यरस पिता येत नाही.

२) मेलेल्या माणसांना जिवंत करण्याची कला म्हणजेच चरित्रकला होय.

३) Coming events cast their shadows before (पुढे येणाऱ्या प्रसंगाच्या सावल्या आधीच पडतात.)

४) Hero is a hero at all point.

प्रभाव : वि. चिपळूणकर यांच्यावर डॉ. जॅक्सन, मेकॉले, ॲसिडन यांचा प्रभाव होता आणि डॉ. जाक्सन यांच्या रासेलस ही कादंबरी व Vanity of human wishes या दीर्घकाव्याचा प्रभाव होता.

## ६४. सावित्रीबाई फुले (क्रांतीज्योती) (१८३१-१८९७)

**पूर्ण नाव :** सावित्री ज्योतीबा फुले
**जन्म :** ३ जानेवारी १८३१ (नायगाव, सातारा - महाराष्ट्र)
**मृत्यू :** १० मार्च १८९७ (पुणे - महाराष्ट्र)
**आई :** लक्ष्मीबाई नेवसे
**वडिल :** खंडोजी - नेवसे पाटील
**पती :** महात्मा फुले (समाजसुधाकर)
**विवाह :** १८४० (वयाच्या ९ व्या वर्षी)

- **समाजकार्य :**
- भारतातील प्रथम महिला शिक्षिका व मुख्यध्यापिका म्हणून कार्य.
- महाराष्ट्राच्या स्त्रिविषयक वळवळीतील अग्रगण्या नेत्या, प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या आणि आद्यशिक्षिका म्हणून मोलाचे कार्य.
- विनावेतन शिक्षण देण्याचे कार्य केले.
- सावित्रीबाई या मराठीतील पहिल्या कवयित्री आहेत.
- ३ जानेवारी - सावित्रीबाई फुलेंचा जन्मदिवस बालीकादीन व स्त्रीमुक्तीदिन म्हणून साजरा केला जातो.
- रंगभेद, जातीभेद, लिंगभेद याच्या विरुद्ध होत्या.
- अस्पृश्यता मानवजातीस कलंक आहे. असे त्या म्हणत.
- सावित्रीबाईंनी स्त्रीमुक्त व शिक्षणचा पाया रचला.
- विधवांचे होणारे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला.
- समाजसुधारनेसाठी ठिकठिकाणी भाषणे केली.
- १ मे १८४७ ला सावित्रीबाईंनी मागासांच्या वस्तीत एक शाळा काढली. ही त्यांची प्रथम शाळा होय.
- १ जानेवारी १८४८ महात्मा फुलेंसोबत प्रथम मुलींची शाळा सुरु केली. ठिकाण - भिडेवाड्यात, पुणे
- ४ वर्षात १८ शाळा चालवल्या.
- मुंबई गिरगावात कमळाबाई हायस्कूल ची स्थापना त्याच काळात झाली.
- बालविवाह, सतीप्रथा, केशवपन, अस्पृश्यता या क्रुर प्रथांना विरोध केला.
- अनाथालयातील विधवा (ब्राम्हण) काशबाई यांच्या यशवंत या मूलास दत्तक घेतले.
- १८५५ मध्ये शेतकरी व मजूर यांच्यासाठी रात्रशाळेच आयोजन (फुले दाम्पत्य) केले.
- १८६३ शाली उभारलेल्या बालहत्या प्रतिबंध गृहात मोलाचे योगदान दिले.
- पती ज्योतीबांच्या निधनानंतर सावित्रीबाई फुले यांनी सत्यशोधक समाजाची धुरा सांभाळली. (स्थापना - २४ सप्टेंबर १८७३)
- कवयित्री म्हणून लेखन -
  काव्यसंग्रह - १) काव्यफुले २) बावनकशी सुबोध रत्नाकर
- पुणे येथिल शिक्षणाच्या कार्यासंदर्भात १८५२ ला ईस्ट इंडिया कंपनीकडून सन्मान.
- सावित्रीबाईंनी गृहीनी नावाच्या मासिकात लेखही लिहिले.
- पुणे विद्यापिठाच्या नावाचा विस्तार करून ते सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ करण्यात आले. (जून २०१४)

- १८९६-९७ सालच्या प्लेगच्या साथित प्लेगच्या रुग्नांनी शुश्रूषा करतांना प्लेगची बाधा झाल्याने १० मार्च १८९७ ला मृत्यू झाला.

## ६५. सिंधूताई सपकाळ (१९४७)

**जन्म :** १४ नोव्हेंबर १९४७ (वर्धा जिल्ह्यातील जंगल भागातील नवरगाव ही त्यांची जन्मभूमी)

- अनेक खडतर प्रसंगांना तोंड देत हजारो अनाथ मुलांचा सांभाळ केला.

**टोपण नाव :** चिंधी

**वडिल :** अभिमान साठे (व्यवसाय - गुरे वळत)

**विवाह :** श्रीहरी सपकाळ यांच्यासोबत (वयाच्या ९ व्या वर्षी)

(सिंधूताई ह्या वाचनप्रिय होत्या.)

- १८ व्या शतकापर्यंत माईंनी तीन बाळंतपण झाली. त्या चौथ्या वेळी गर्भवती असताना त्यांनी त्यांच्या आयुष्यातला पहिला संघर्ष केला.
- नवऱ्याच्या मनात त्यांच्याबद्दल संशय निर्माण झाला आणि पूर्ण दिवस भरलेल्या ताईंना त्याने बेदम मारुन घराबाहेर काढले. (कारण - दमणजीने सिंधूताईच्या पोटातील मूल आपले असल्याचा प्रचार मग सुरु केला) - नंतर गावातील लोकांनी व आईने सुद्धा पाठ फिरवली.
- नंतर त्या परभणी-नांदेड-मनमाड रेल्वेस्टेशनांवर भीक मागत हिंडायच्या (आत्महत्येचा प्रयत्न - पिंपराळा -जळगाव स्टेशनवर)
- त्यांनी कधीच एकटे खाल्ले नाही. सर्व भिकाऱ्यांना बोलावून त्या मिळालेल्या अन्नाचा कला करायच्या व सर्वजन एकत्र बसून खात असे.

**ममता बाल सदन :**

- १९९४ कुंभारवळण (पुरंदर तालुका, पुणे जिल्ह्यात ही संस्था स्थापन.
  उद्देश - अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देणे.
- येथे लहान मुलांना शिक्षण दिले जात असे.
- त्यांच्या भोजन, कपडे, अन्य सुविधा संस्थेकडून दिल्या जात.
- संस्थेत - १०५० मुले राहिलेली आहे.

**अन्य संस्था :**

१) बाल निकेतन हडपसर, पुणे
२) सावित्री फुले मूलांचे वसतीगृह, चिखलदरा
३) अभिमान बाल भवन, वर्धा
४) गोपिका गाईरक्षण केंद्र, वर्धा
५) ममता बाल सदन, सासवड
६) सप्तसिंधू महिला आधार बालसंगोपन व शिक्षणसंस्था, पुणे

- आंतरराष्ट्रीय पातळीवर परदेशी अनुदान मिळणे सोपे जावे या हेतूने त्यांनी मदत ग्लोबल फाऊंडेशनची स्थापना केली आहे.
- त्यांनी आतापर्यंत ७५० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले.

| | | |
|---|---|---|
| १) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुरस्कार - | पुणे कॉलेज | २०१२ |
| २) अहिल्याबाई होळकर पुरस्कार | महाराष्ट्र शासन | २०१० |
| ३) मुर्तिमंत आईसाठीचा पुरस्कार | राष्ट्रीय | २०१३ |
| ४) दत्तक माता पुरस्कार | IT profit org. | १९९६ |

५) डॉ. निर्मलकुमार फडकुले स्मृती पुरस्कार सोलापूर

- CNN - IBN- Reliance Foundation ने दिलेला Real Hero पुरस्कार - २०१२
- सह्याद्रीची हिरकणी पुरस्कार - दै. लोकसत्ता - २००८
- डॉ. राम मनोहर त्रिपाठी पुरस्कार - २०१७
- अहिल्याबाई होळकर पुरस्कार - महाराष्ट्र शासन
- जीवन गौरव पुरस्कार - पुणे युनिर्व्हसिटी
- डॉ. बाबासाहेब समाज भुषण पुरस्कार - २०१२
- सिंधूताईच्या जीवनावर आधारलेला 'मी सिंधुताई सपकाळ' हा मराठी चित्रपट प्रदर्शित झाला आहे. भूमिका - तेजस्विनी पंडित
- १६ फेब्रुवारी २०१४ - अनुबोधपट - 'अनाथांची यशोदा' by the भार्गव Films and Production (सिंधूताई सपकाळ यांच्या जीवनावर)

## ६६. विष्णूशास्त्री पंडीत (१८२७-१८७६)

**नाव :** विष्णु परशुराम पंडीत

**टोपण नाव :** महाराष्ट्राचे ईश्वरचंद्र विद्यासागर

**गाव :** बावधान (सातारा)

**सहाध्यायी :** १) महादेवशास्त्री कोल्हाटकर २) कृष्णशास्त्री चिपळूणकर

**शिक्षण :** १) सातारचे प्रख्यात गजेंद्रगडकर यांच्याकडे न्याय व व्याकरणाचा अभ्यास.

२) नंतर पुण्याच्या शाळेत इंग्रजीचे अध्ययन

- १८४८ सरकारी शिक्षणखात्यात नोकरी.
- १८६४ नोकरीचा राजीनामा
  मुंबईच्या इंदूप्रकाश वृत्तपत्राचे संपादक
  त्यांनी स्वत: विधवेशी विवाह करून आपण कर्ते सुधारक असल्याचे दाखवून दिले.
- ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या विधवाविवाह या ग्रंथाचे भाषांतर.
- हिंदूधर्म व्यवस्थापक सभेची स्थापना.
- विधवा विवाह व स्वदेशीचा पुरस्कार करणारे लेख.
- १८७० पुण्यात विधवा पुर्नविवाहविषयक वादात आपले विचार मांडले.

**ग्रंथसंपदा :**

१) नाना फडणवीसाची संक्षिप्त बखर (१८५९) २) हिंदूस्थानचा इतिहास (१८६१)

३) मराठी व इंग्रजी कोश (१८६४) ४) संस्कृत व महाराष्ट्र धातुकोश (१८६५)

५) तुकारामांच्या अभंगाच्या गाथेचे दोन खंड (१८६९-१८७३)

६) ब्राह्मणकन्याविवाह विचार

- १) मराठी ग्रंथकार व वृत्तपत्रकार
  २) इंग्रजी व संस्कृतचे मोठे जाणकार
  ३) ग. बा. सरदार यांच्या महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी या ग्रंथात गौरव.

## ६७. माधवराव खंडेराव बागल (१८९५-१९८६)

**जन्म :** २८ मे १८९५ (कोल्हापूर)

**वडिल -** खंडेराव

- माधवरावांचे वडिल हे एक प्रख्यात वकिल, तहसिलदार आणि समाजसुधारक होते.
- बागल यांचे शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले आणि नंतर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथून चित्रकला, मॉडेलिंग आणि म्युरल सजावट अभ्यासक्रम पूर्ण केले.

**सामाजिक कार्य :**

- १९३० भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश.
- १९३९ कोल्हापूरात प्रजा परिषदेची स्थापना.
- १९४०-४७ पर्यंत महात्मा गांधी, वल्लभभाई पटेल आणि जवाहरलाल नेहरू यांच्या सारख्या नेत्यांसोबत काम केले.
- भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ते अग्रेसर होते.
- समाजसुधारक म्हणून दलितांच्या उत्कर्षासाठी काम केले.
- कोल्हापूरचे स्वातंत्र्य सैनिक होते.

**साहित्य :**

- १९६६ कालाविहार, बहुजन समाजाचे शिल्पकार.
- १९७० जिवनसंग्राम, आगरा, सिंहवालोकाना, सहवासंताना
- १९९८ भाई माधवरावजी निवडक लेखासंग्रह.

**पुरस्कार :**

- १९७२ सामाजिक सेवा या क्षेत्रामध्ये भारत सरकारकडून पद्मभूषण प्रदान करण्यात आला.
- भाई माधवराव बागल पुरस्कार कोल्हापूरच्या माधवरावजी बागल विद्यापीठातर्फे दिला जातो. दरवर्षी एखाद्या व्यक्तीला समाजात उल्लेखनिय योगदानासाठी दिला जातो.
- **मृत्यू :** १९८६ मध्ये त्यांचे निधन झाले.

## ६८. गोपाळकृष्ण गोखले (१८६६-१९१५)

**जन्म :** ९ मे १८६६ (कोतळूक जि. रत्नागिरी)

**मृत्यू :** १९ फेब्रुवारी १९१५

- १८७६ शिक्षण - कोल्हापूर
- १८८१ मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण
- १८८२ कोल्हापूरातील राजाराम कॉलेजमध्ये शिक्षण
- १८८४ मुंबई येथील एल्फिस्टन कॉलेजमधून बी. ए.
- १८८५ न्यु इंग्लिश स्कूल येथे शिक्षक.
- १८८६ डेक्कन एज्युकेशन सोसायटीची आजीव सदस्य झाले.
- १८८६ फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी स्वीकारली.
- १८८७ पुणे येथील सार्वजनिक सभेचे सरचिटणीस.
- १८८८ बॉम्बे प्रॉव्हिन्सिअल कॉन्फरन्सचे सेक्रेटरी म्हणून निवड.
- १८८८ गोपाळ गणेश आगरकर यांनी सुरु केलेल्या सुधारक साप्ताहिकाच्या इंग्रजी विभागाचे संपादक.

- १८८९ काँग्रेसच्या अधिवेशनात हजर राहून अधिवेशनातील चर्चेत भाग घेण्यास सुरुवात.
- १८८९ काँग्रेसच्या व्यासपीठावरुन पहिल्या भाषणास सुरुवात.
- १८९१ डेक्कन ऐज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी.
- १८९६ डेक्कन सभा स्थापन करण्यात पुढाकार.
- १८९६ महात्मा गांधी यांची प्रथम भेट घेतली.
- १८९७ वेल्बी कमिशन समोर साक्षी देण्यासाठी इंग्लडला गेले.
- १८९९ मुंबई प्रांतिक कायदे मंडळाचे सदस्य.
- १९०२ फर्ग्युसनमधून निवृत्त होऊन पुणे नगरपालिकेचे अध्यक्ष झाले.
- १९०५ सर्व्हेंरस ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना.
- १९०५ बनारस येथील काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष बनले.
- १९०८ डिसेंट्रलायझेशन कमिशनसमोर साक्ष.
- १९१२-१४ पब्लिक सर्व्हिसेस कमिशनर नेमणूक.
- १९१२ गांधीजींच्या विनंतीवरुन आफ्रिकेचा दौरा केला.
- १९१४ सरकारच्या के. सी. आय. ई. या पदवीस नकार.
- १९१५ - १९ फेब्रुवारी, पुणे येथे मृत्यू.
- १९१६ रानडे यांच्या स्मरणार्थ इंडिस्ट्रीयल व इकोनॉमिक इन्स्टिट्यूटची स्थापना.
- गोपाळकृष्ण गोखले हे भारतातील पहिल्या श्रेणीचे अर्थतज्ञ होते.
- १९३० रावबहादूर काळे यांनी पुण्यात गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकोनॉमिक्स व पॉलीटिक्सची स्थापना केली.
- चळवळ : भारतीय स्वातंत्र्यलढा, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सुधारणा
- संघटना : भारत सेवक समाज

- **गोपाळकृष्ण गोखले यांच्या संबंधीत पुस्तके :**

  १) गोखले : नवदर्शन - मु. गो. देशपांडे

  २) नामदार गोखल्यांचं शहाणपण - नरेंद्र चपळगावकर

  गोपाळकृष्ण गोखले हे मवाळवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते होते.

## ६९. तात्या टोपे (१८१४-१८५९)

**पूर्ण नाव :** रामचंद्र पांडुरंग टोपे
**टोपण नाव :** तात्या टोपे
**जन्म :** १८१४ (येवला - नाशिक)
**मृत्यू :** १८ एप्रिल १८५९ (शिवपूरी - मध्यप्रदेश)
**चळवळ :** १८५७ चे स्वातंत्र्य युद्ध
**धर्म :** हिंदू
**वडील :** पांडुरंगराव टोपे
**आई :** रखमाबाई

- तात्या टोपे हे १८५७ च्या उठावामधील सेनानी होते.

तात्या टोपे यांचा जन्म १८१४ मध्ये नाशिक जिल्ह्यातील येवला या गावी झाला. पांडुरंग टोपे यांच्या आठ अपत्त्यांपैकी तात्या हे दुसरे अपत्य. त्यांचे मूळ नाव रघुनाथ, त्यांचे नाव रामचंद्र असेही ठेवण्यात आले होते. रघुनाथचे वडील पेशव्यांकडे दानाध्यक्षज्ञाचे काम पाहण्यासाठी ब्रह्मावर्तास येऊन राहिले. पर्यायाने रघुनाथचे अर्थात

तात्यांचे बालपण नानासाहेब पेशवे आणि राणी लक्ष्मीबाई यांच्याबरोबर गेले. पुढे बरीच वर्षे नानांच्या दरबारात तात्या कारकुनी कामांत गुतलेले होते. १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात ग्वाल्हेरहून तात्यांनी आणलेल्या सैन्यावर मुख्य सेनापती म्हणून नानासाहेबांनी त्यांचीच निवड केली. त्या वेळी तात्यांच्या कर्तृत्वाचा कस लागला. कानपूरवर चढाई करण्यासासाठी तात्या सज्ज झाले.

१८५७ मधील दिल्ली, लखनौ, जगदीशपूर व कानपूर या ठिकाणच्या उठावांचे सुत्रधार तात्या टोपेच होते. त्यांचा धाडसी स्वभाव, गनिमी काव्याचे अवगत तंत्र, स्वदेशावरची श्रद्धा आणि स्वामिनिष्ठा यांच्या बळावर त्यांच्या तलवारीला धार आली होती.

कानपूर, लखनौ, झाशी असे कूच करताना तात्यांचा पराक्रम पणाला लागला. कमकुवत सैन्य, नियोजनाची कमतरता, पैसा-रसद-तोफा या साधनांची कमतरता असताना त्यांना यशापयशाची चव चाखायला लागत होती, पण तात्यांची ध्येयासक्ती प्रचंड होती.

नानासाहेब पेशवे यांचा अज्ञातवास, ग्वाल्हेरच्या लढाईत राणी लक्ष्मीबाईचा पराभव या पार्श्वभूमीवर एकच मराठी वाघ शत्रूला तोंड देत होता. शत्रूवर जबर बसवत होता, वेळोवेळी इंग्रजांच्या तावडीतून सुटून पुढचे ध्येय गाठण्याचा त्यांचा यत्न इंग्रजांना मेटाकुटीला आणत होता. तात्यांच्या या पराक्रमाची गाथा जगभर पसरली. काही युरोपियन इतिहासकारांनी तात्यांच्या शौर्याचा गौरव त्या काळी केला होता.

तात्यांची एकाकी झुंज थकली, जिंकण्याची आशा लोपली. इंग्रजांपुढे वाकायचे नाही हा निश्चय मात्र कायम होता. तात्या शत्रूपासून बचाव करताना मानसिंग या मित्राच्या आश्रयाला गेले. तात्यांच्या पराक्रमाला थिटी पाडणारी घटना घडली, तात्यांचा मागमूस काढणारी इंग्रजी फौज मानसिंगापर्यंत पोहोचली. मानसिंगाची फितुरी नडली आणि तात्या इंग्रजांचे कैदी झाले.

७ एप्रिल १८५९ रोजी आरोपांना उत्तर देताना तात्यांच्या चेहेऱ्यावर भीती नव्हते, अपराधीपणा नव्हता, दु:ख तर नव्हतेच, देशाभिमान आन् हौतात्म्याचे समाधान मात्र होते. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धातल्या होमकुंडात तात्यांची शेवटची आहुती पडली. १८ एप्रिल १८५९ रोजी त्यांना मध्यप्रदेशातील शिवपूर येथे फाशी देण्यात आली. या ठिकाणीच त्यांचा पुतळा उभारण्यात आलेला आहे. तसे तात्या टोपेंचे पुतळे मध्य प्रदेशात अनेक ठिकाणी आहेत. तात्या टोपे स्टेडियम आहे, शेजारी टोपेंचा भव्य पूतळा आहे.

- Tatya Tope's OPERATION RED LOTUS या पुस्तकात अनेक असे पुरावे दिलेले आहेत जे सिद्ध करतात की १८५७ चे स्वातंत्र्य युद्ध हे एक वेल प्लॅन्ड ऑपरेशन होते.
- नवी दिल्ली - केंद्रीय सांस्कृतीक मंत्री महेश शर्मा यांनी १८५७ च्या संग्रामातील शहीद नायक तात्या टोपे यांच्या सन्मानार्थ २०० रुपयांचे स्मृती नाणे आणि १० रुपयांचे नाणे आणले.

## ७०. गोविंद पानसरे (१९३३-२०१५)

**जन्म :** २६ नोव्हेंबर १९३३

- **जीवन :**

गोविंद पानसरे यांचा जन्म २६ नोव्हेंबर १९३३ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील राहता या तालूक्यातील कोल्हार या गावी झाला. ते गरीब कष्टकऱ्यांच्या परिवारात वाढले. कोल्हार येथून प्राथमिक शिक्षण व राहुरी येथून माध्यमिक शिक्षणानंतर ते उच्च शिक्षणासाठी कोल्हापूरला गेले. तिथे त्यांनी बी. ए. (ऑनर्स) व एल. एल. बी. पूर्ण केले. सुरुवातीला वर्तमानपत्र विक्रेता, मुन्सिपालिटीत शिपाई. माध्यमिक शाळा मंडळाात प्राथमिक अशा अनेक नोकऱ्या केल्यानंतर ते शिवाजी विद्यापीठात असोसिएट प्रोफेसर म्हणून रुजू झाले. सोबत ते कामगार व वकीली सुद्धा करू लागले.

पुढे चालून ते कोल्हापूरमधील एक नावजलेले वकील झाले व अनेक वर्षे कोल्हापूरातील वकीलांच्या संघटनेचे

अध्यक्ष राहिले.

- **चळवळ :**

गोविंद पानसरे शालेय जीवनापासुनच सामाजिक चळवळीकडे आकर्षित झाले होते. सुरूवातीला राष्ट्रसेवा दल व त्यानंतर भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ते सक्रीय कार्यकर्ते होते १० वर्षासाठी ते भाकपचे महाराष्ट्र सेक्रेटरी होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळ व गोवा मुक्त चळवळ ते तबक्क्यांच्या हक्कासाठी लढणारे ते कार्यकर्ते होते.

ते कष्टकऱ्यांच्या शेकडो संकर्षामध्ये सहभागी झाले व अनकांचे नेतृत्त्व देखील केले. विशेषत: असंघटित क्षेत्रातील कामगार, शेतमजुर, घरकामगार, ऑटोरिक्षा युनियन, दुध उत्पादक, झोपडपट्टी रहिवासी इ. कोल्हापुरमधील टोलविरोधी आंदोलनातही त्यांचा सक्रिय सहभाग होता.

- **साहित्य :**

पानसरे एक लेखक सुद्धा होते व त्यांनी अनेक पुस्तक लिहिली आहेत. शांतता व धर्मनिरपेक्षतेच्या अभियानामध्ये ते अथकपणे कार्यरत होते. ''शिवाजी कोण होता?'' हे त्यांचे सर्वात प्रसिद्ध लेखणांपैकी आहे.

अथक परिश्रमांती त्यांनी ह्या पुस्तकाच्या माध्यमातुन शिवाजी महराजांची इतिहासाशी इमान राखणारी प्रतिमा लोकांपर्यंत पोहचवून लोकशिक्षणाची महत्त्वाची कागगिरी बजावली आहे. ह्या पुस्तकाचे अनेक भाषांमध्ये भाषांतर झाले. व १.५ लाखाहून जास्त प्रती विकल्या गेल्या आहेत.

कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या वाङमयाचे डॉ. अशेक घोसाळकर आणि डॉ. रणधीर शिंदे यांनी संपादित केलेले दोन खंड प्रसिद्ध झाले आहेत. कॉ. गोविंद पानसरे यांनी लिहिलेले शिवाजी कोण होता हे पुस्तक आपल्याला शिवाजींचे दर्शन घडवले.

- **गोविंद पानसरे यांनी लिहिलेली काही पुस्तके :**

१) अजून न स्वीकारलेला मंडल आयोग
२) अवमूल्यन : कळ सोसायची कुणी?
३) कश्मीरबाबतच्या कलम ३७० ची कुळकथा
४) कामगार विरोधी कामगार धोरणे
५) काही कामगार कायद्यांची तोंडओळख.
६) धर्म, जात, वर्ग आणि परविर्तनाच्या दिशा
७) पंचायत राज्यांचा पंचनामा
८) मंडल आयोग आणि मागसलेले मुस्लिम
९) मंडल आयोग आणि राखीव जागांचा प्रश्न
१०) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी पर्यायी दृष्टीकोन
११) मार्क्सवादाची तोंडओळख
१२) मुस्लिमांचे लाड
१३) --- राजर्षी शाहू : वसा आणि वारसा
१४) शिवाजी कोण होता?
१५) शेती धोरण परधार्जिणे

- **पुरस्कार व सन्मान :**

- २००३ साली भारतीय पोस्टाने त्याचे छायाचित्र असलेले तिकिट प्रकाशित केले.
- पानसरे यांच्या नावाने कॉम्रेड गोविंद पानसरे प्रबोधन पुरस्कार देण्यास सुरुवात झाली आहे.
- ३ जून २०१५ रोजी पहिली कॉम्रेड गोविंद पानसरे प्रबोधन पुरस्कार मुक्ता मनोहर यांना देण्यात आला.

१९५२ सालापासून कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य असलेले पानसरे अनेक सामाजिक चळवळीत सक्रीय होते, त्यांनी कामगारांसाठी घर कामगार, महिलांसाठी अनेक लढे उभारले. ते कोल्हापूर ठोल आंदोलनातही अग्रभागी होते.

- २० फेब्रुवारी २०१५ रोजी त्यांचा कोल्हापूरमध्ये खून झाला.

- **मृत्यू :**

पानसरे आणि त्यांच्य पत्नी उमा यांच्यावर १६ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ९ वाजून २५ मिनिटांनी २ अज्ञात इसमांनी गोळीबार केला, नंतर हल्लेखोर मोटारसायकलवरून भरधाव वेगाने निघून गेले. ह्या हल्ल्यामध्ये दोघेही गंभीर जखमी झाले होते.

पानसरे यांच्या छातीला आणि पोटाला इजा झाली होती आणि त्यांच्या पत्नीला डोक्याला इजा झाली होती. उपचारादरम्यान गोविंद पानसरे यांच्या २० फेब्रुवारी २०१५ रोजी मुंबईमध्ये निधन झाले.

- **संदर्भ** - गोविंद पानसरे यांच्याच्यावर प्राणघातक हल्ला.

## ७१. रघुनाथ धोंडो कर्वे (१८८२-१९५३)

**जन्म :** १४ जानेवारी १८८२
**मृत्यू :** १४ ऑक्टोबर १९५३
**जन्म ठिकाण :** मुरुड (रत्नागिरी)
**वडिल :** धोंडो केशव कर्वे
**आई :** राधाबाई धोंडो कर्वे
**पत्नी :** गंगू गोडे (मालतीबाई कर्वे) मृत्यू १९४४
(गंगू गोडेंनी आण्णसाहेब कर्वे यांच्या आश्रमात शिक्षण घेतले.)
**शिक्षण :** बी. ए. गणित (पुणे)

- समान नागरी कायद्याचे पुरस्कर्ते होते.
- समागम स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते
- कामस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते
- लैंगिक संबंधाबाबत कर्वे उदारमतवादी पुरस्कर्ते होते.
- धर्मविरोधी होते, नास्तिक होते.
- बुद्धवादी विचारांचे होते.
- संततीनियमन शब्द - शोधला
- **ग्रंथ :**

१) संतती नियमन २) तेरा गोष्टी ३) न्यायाचा शोध

**पुस्तके :**

- १९२१ संतती नियमनाचे सल्ला देण्याचे केंद्र सुरु केले.
- १९२३ संततीनियमन मराठी पुस्तक लिहिले.
- १९२७ गुप्तरोगापासून बचाव संबंधीत पुस्तक लिहिले.
- १९३२ आधुनिक कामशास्त्र.
- १९३५ त्वचेची निगा
- १९३८ आधुनिक आहारशास्त्र

**नियतकालिक :**

- १५ जुलै १९२७ सजाजस्वास्थ मासिक - पहिला अंक प्रकाशित
- रघुनाथ कर्वे यांनी मुंबईत एल्फिस्टन कॉलेज व विल्सन कॉलेज येथे गणिताचे प्राध्यापक म्हणून काम केले.
- स्पष्टवक्तेपणा आणि संततीनियमनामुळे नोकरी गमावली.
- राईट एजन्सी - भारतातील पहिले कुटूंब कल्याण केंद्र.
- हिंदू धर्मातील चालीरितीला विरोध होता.
- स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा मान्य नव्हत्या.
- डॉ. य. दि. फडके यांनी र. धो. कर्वे नावाचे पुस्तक लिहिले.
- रघुनाथ कर्वे हे स्त्रिला एक भोगवस्तू म्हणून पाहतात अशी डॅ. य. दि. फडके यांनी टिका केली.
- समागम, स्वातंत्र्य, कामशास्त्र, स्त्रीमुक्ती इ. विषयांवर लेखन केले.
- १९५७ पंडित नेहरू संततीनियमनाच्या बाजूने प्रथम बोलले.

- मालतीबाई कर्वे यांनी पूर्णपणे सहकार्य केले.
- संततीनियमनाची साधने जर्मनीहून खरेदी करत असत. त्यासाठी समाजस्वास्थ्य मासिकाद्वारे संपूर्ण माहिती देत असत व साहित्य खरेदी करत असे.

## ७२. शिवराम महादेव परांजपे (१८६४-१९२९)

**जन्म :** २७ जून १८६४ (महाड - महाराष्ट्र)

**मृत्यू :** २७ सप्टेंबर १९२९

**पेशा :** पत्रकारिता, साहित्य

**साप्ताहिक :** काळ

**शिक्षण :** महाड, रत्नागिरी व पुणे

- मॅट्रिकच्या परीक्षेत त्यांना संस्कृत भाषेसाठी जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळाली.
- या शिष्यवृत्तीचे ते पहिले मानकरी होत.
- शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी पुणे येथील महाविद्यालयात संस्कृत शिकवले.

**१८९८ :**

- काळ हे वृत्तपत्र सुरु केले.

वक्रोत्की हा नवा अलंकार त्यांनी मराठी भाषेला दिला.

- विष्णूशास्त्री चिपळूणकर शिक्षक म्हणून लाभले.
- आपल्या वकृत्वाच्या माध्यमातून त्यांनी लोकांमध्ये राष्ट्रभक्ती स्वातंत्र्य या मूल्यांचा प्रचार केला.
- १९०८ काळ या वृत्तपत्रामधील लिखाणासाठी भारतातील इंग्रज सरकारने अटक केली.
- १९२० स्वराज्य हे साप्ताहिक काढले.
- १९२२ मुळशी सत्याग्रहात भाग घेतला.

**पुस्तके :** विंध्याचल, संगती कादंबरी, मराठ्यांच्या लढ्याचा इतिहास

- १९२९ बेळगाव येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.
- **कथा :** १) आम्रवृक्ष २) एक कारखाना ३) प्रभाकरपंतांचे विचार
- **प्रकाशित साहित्य :**

| क्र. | वर्ष | नाव | साहित्य प्रकार |
|---|---|---|---|
| १. | १९०४ | अर्थसंग्रह | पूर्वमीमांसा विषयक |
| २. | १९०६ | रामदेवराव | नाटक |
| ३. | - | रामायणाविषयी काही विचार | संशोधनात्मक |
| ४. | - | भीमराव | नाटक |
| ५. | १८९७ | संगीत कादंबरी | नाटक |
| ६. | १९२४ | विंध्याचल | कादंबरी |
| ७. | १९२८ | मराठ्यांच्या लढ्यांचा इतिहास | इतिहास |

## ७३. रमाबाई रानडे (१८६२-१९२४)

**जन्म :** २५ जानेवारी १८६२ (देवराष्ट्रे - सातारा)

**मृत्यू :** २६ एप्रिल १९२४
**चळवळ :** स्त्री हक्क, स्त्री शिक्षण
**पती :** महादेव गोविंद रानडे

- १८४२ महादेव गोविंद रानडे (माधवराव) यांचा जन्म (१८ जानेवारी)
- १८५४ माधवरावांचा पहिला विवाह - सखु दाडेकर
- १८६२ रमाबाई रानडे (यमुना कर्लेकर) यांचा जन्म (२५ जानेवारी)
- १८७३ रमाबाई (युमना कर्लेकर) यांचा माधवरावांशी विवाह (३० नोव्हेंबर) त्याच दिवशी लिपीशिक्षणास प्रारंभ
- १८७६ इंग्रजी शिक्षणाची सुरुवात.
- १८७७ माधवरावाचे वडिल, रमाबाईंचे सासरे गोविंदराव यांचे निधन (२० फेब्रुवारी)
- १८७८ माधवरावांची नाशिकला बदली.
- १८७८ माधवरावांची नाशिक येथील मुलींच्या शाळेचा बक्षीस समारंभ.
  - रमाबाई रानडे यांचे पहिले भाषण.
- माधवरावांची धुळ्यात बदली.
- १८८१ आर्य महिला समाजाची स्थापना.
  पंडिता रमाबाई यांच्याशी परीचय
  मीस हरफर्डची इंग्रजी शिक्षण सुरू.
- १८८२ सार्वजनिक सभेतून बोलण्यास प्रारंभ.
  - इंग्रजीतून निवेदन.
- १८८४ पुण्यात मुलींच्या हायस्कूलची स्थापना व्हावी यासाठी इंग्रजीतून निवेदन.
- १८८६ न्या. महादेव रानडेसह रमाबाईचा हिंदूस्थानातील प्रमुख स्थळांचा प्रवास.
  - बंगाली शिकल्या, रमाबाईच्या वडिलांचे निधन.
- १८८९ रमाबाईच्या भावाच्या (दाजीच्या) मुलीचा सखुचा जन्म.
  - रमाबाईनी तिला आपल्या घरी आनले.
- १८९२ पंडिता रमाबाईच्या शारदा सदनामध्ये आनंद प्रदर्शन भाषण (ऑगस्ट)
- १८९४ रमाबाईच्या दीराच्या मुलीचा जन्म (१३ मार्च) या नानुला पुढे रमाबाईंनी दत्तक घेतले.
- १८९६ मुंबई येथील अलेक्झांड्रा हायस्कूलच्या वार्षिक समारंभाच्या अध्यक्षा.
- १९०१ न्यायमुर्ती महादेव रानडे चे निधन (१६ जानेवारी)
- १९०२ पुण्यात हिंदू लेडीज सोशल अँड लीटरसी कल्ब स्थापना.
- १९०३ रमाबाईंना प्लेगची बाधा.
- १९०४ रमाबाईच्या आईचे निधन.
- १९०४ मुंबई आद्य भारत महिला परिषदेचे अध्यक्षस्थान भुषवले. (४ डिसेंबर)
- १९०६ नणंद दुर्गाक्कांचे निधन (२४ ऑगस्ट)
- १९०७ रमाबाईंच्या मानसकन्या सौ. सखुबाई विद्वास यांचे निधन (२९ नोव्हेंबर)
- १९०८ मुंबई सेवा सदनची स्थापना (११ जुलै)
- १९०८ रमाबाईंच्या वाड्यात हिंदू लेडीज सोशल कल्बची बक्षीस समारंभ (डिसेंबर)
- १९०९ पुणे सेवा सदनची स्थापना. (२ ऑक्टोबर)
- १९१० आमच्या आयुष्यातील काही आठवणी या पुस्तकाचे प्रकाशन (एप्रिल)
- १९११ रमाबाईंची अकोला, अमरावती, यवतमाळ इ. ठिकाणी स्त्री शिक्षणावर व्याख्याने.

- १९११ सेवा सदनाच्या विद्यार्थिनींना नर्सिंगच्या शिक्षणात प्रवेश.
- १९११ पुणे सेवा सदनात लेडी क्लर्क यांची भेट (ऑगस्ट)
- १९१२ पुणे सेवा सदनाच्या इमारतीसाठी तीन दिवसाची फॅन्सी फेअर (सप्टेंबर)
- १९१४ नर्सिंग व सब ॲसिस्टंट सर्जनच्या कोर्स घेणाऱ्या मुलींसाठी नवे वस्तीगृह सुरू केले. (ऑक्टोबर)
- १९१५ रानडे वाडा सोडला (मार्च)
  - सेवा सदन स्वत:च्या नवीन जागेत नेले.
- १९१५ सेवा सदनाच्या ट्रेनिंग प्रिपरेटरी क्लासेसचा प्रारंभ (नोव्हेंबर)
- १९१७ पुणे सेवा सदनचा लॉर्ड विलीग्डन यांच्या हस्ते बक्षीस समारंभ.
- १९१८ पुणे नगरपालिकेने मुलींचे शिक्षण सक्तीचे करावे यासाठी मोठी चळवळ.
- १९२४ न. र. फाटक यांनी लिहीलेल्या न्यायमुर्ती रानडे यांच्या ६०० पानी चरित्रास रमाबाईंनी प्रस्तावना लिहिली. (मार्च)
- १९२४ रमाबाईंनी मृत्यूपत्र तयार केले. (२३ एप्रिल)
- १९२४ रमाबाई रानडे यांचे पुणे मुक्कामी सेवा सदनाच्या इमारतीत निधन (२६ एप्रिल १९२६)
- १९२४ महात्मा गांधीनी यंग इंडियातून रमाबाईंना वाहिलेली श्रद्धांजली. (८ मे)
- १९८९ श्रीमती रमाबाई रानडे व्यक्ती आणि कार्य या पुस्तकाचे प्रकाशन.
  - लेखक - माधव विद्वास (वय ८२ वर्ष)
- २०१२ रमाबाईंच्या जीवनावरील (उंच माझा झोका) या दुरचित्रवाणी वरील मालिकेची सुरुवात. (१४ जुलै)

**संदर्भ पुस्तके :**

- १९१० आमच्या आयुष्यातील काही आठवणी अथवा स्वत: संबंधी काही गोष्ट (इ. स. १९१० तिसरी आवृत्ती - इ. स. २०१२ वरदा प्रकाशन) - लेखक - रमाबाई रानडे
- १९२५ श्रीमती रमाबाई रानडे (हिंदू पुस्तकमाला) लेखक - उमाकांत
- १९६६ न्यायमुर्ती म. गा. रानडे (नीळकंठ प्रकाशन दुसरी आवृत्ती) लेखक - न. र. फाटक
- श्रीमती रमाबाई रानडे व्यक्तीत्व आणि कर्तृत्व - लेखक : विकास खोले
- १९२६ रमाबाई रानडे - आत्मकथा (गुजराती, भाषांतर सेवासन प्रकाशन) लेखक - भद्राबाई माडगावकर

## ७४. न्या. महादेव रानडे (१८४२-१९०१)

**जन्म :** १८ जानेवारी १८४२ (निफाड - नाशिक) - ब्राह्मण समाजात जन्म

**मृत्यू :** १६ जानेवारी १९०१

**टोपण नाव :** माधव

**वडिल :** गोविंद रानडे (कंपनी सरकारमध्ये कारकुन)

**आई :** गोपिकाबाई रानडे

**पत्नी :** रमाबाई रानडे

१) हिंदी अर्थशास्त्राचे जनक २) महाराष्ट्रातील प्रबोधनाचे जनक

३) भारतीय उदारमतवादाचे उद्‌गाते ४) गोपाळ कृष्ण गोखले यांचे गुरु

- १८६२ इंदूप्रकाश इंग्रजी वृत्तपत्रात समाजसुधारणे विषयी लेख.
  - मुंबई विद्यापिठाचे पहिले (फेलो)
  - मुंबई विद्यापीठाकडून (मुकुटमणी) हा किताब मिळाला.

- १८६४ एम. ए. इतिहास (पदवी)
- १८६५ विधवा विवाह उत्तेजक मंडळाचे सभासद व स्थापना.
- १८६६ कायद्याची परीक्षा पास केली. (एल. एल. बी.)
  - अक्कलकोट संस्थानाचे दिवाण.
  - कोल्हापूर येथे न्यायाधीश.
- १८६७ प्रार्थना समाजाचे सभासद संस्थापक - मुंबई
- १८६८ मुंबईमध्ये एल्फिस्टन कॉलेजला इंग्रजी व इतिहासाचे प्राध्यापक.
- १८७० न्या. रानडे व सार्वजनिक काका दोघांनी (सार्वजनिक सभा) या संस्थेची स्थापना केली. (संस्थापक सदस्य)
- १८७१ वकीलीची परीक्षा दिली व (पूर्ण) येथे जिल्हा न्यायाधीश म्हणून नेमणूक.
- १८७४ सार्वजनिक सभेच्या वतीने जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करणारा अर्ज इंग्लडला पाठवला.
- १८७५ पूर्ण येथे वसंत व्याख्यानमालेची सुरूवात.
- १८७८ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.
- १८८२ हुजूरयात्रा शाळा सुरुवात (पूर्ण)
- १८८५ मुंबई कायदे मंडळाचे सदस्य.
- १८८६ भारत सरकारच्या अर्थसमितीचे सदस्य. (वित्तीय समितीवर नियुक्त होणारे पहिले भारतीय.)
- १८८७ इंडियन सोशल कॉन्फरन्सची स्थापना.
- १८८९ Indian Political Economy या अर्थशास्त्रावरील निबंध.
  - इंडस्ट्रियल असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाची स्थापना.
- १८९० औद्यागिक परिषदेचा उपक्रम सुरू (पूर्ण)
- १८९३ मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक.

**मृत्यू :** १६ जानेवारी १९०१

**इतर :**

- महाराष्ट्रामध्ये अनेक सामाजिक चळवळीशी संबंध.
- त्यांचे मराठी - इंग्रजी शिक्षण - कोल्हापूरमध्ये
- उच्च शिक्षण - एल्फीस्टन कॉलेज - मुंबई
- एका निबंधात शिवाजी राज्यपद्धती व इंग्रजाची राज्यपद्धती तुलना करणारा निबंध.
- मराठी सत्तेचा उदय आणि उत्कर्ष (२ इंग्रजी निबंध)
- इतिहास व अर्थशास्त्र विषय पदवी संपादन.
- ओरिएंटल ट्रान्सलेटर या पदावर कार्य.
- मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाचे सदस्य होते.
- अतिवाचनामुळे एक डोळा निकामी.
- पुनर्विवाहावर आपली मते मांडली.

## ७५. पंडिता रमाबाई (१८५८-१९२२)

**नाव :** रमा अनंतशास्त्री डोंगरे

**जन्म :** २३ एप्रिल १८५८
**ठिकाण :** गंगामुळ - कर्नाटक
**वडील :** अनंतशास्त्री डोंगरे
**आई :** लक्ष्मीबाई (आंबाबाई)
**शिक्षण :** कोलकाता विद्यपीठातून
**भाषा :** संस्कृत, मराठी, कन्नड, गुजाराती, बंगाली, हिंदी, तुळू, हिब्रू, इंग्रजी
**पतीचे नाव :** बिपीन बिहारीदास मेधावी
**मुलगी :** मनोरमा

- रमाबाईच्या आई-वडिलांचा मृत्यू.
- बंधू श्रीनिवासशास्त्री यांच्यासह प्रवास करीत त्या कलकत्याला आल्या.
- १८७५ कोलकत्याच्या सिनेट हॉलमध्ये रमाबाईंना पंडिता व सरस्वती या पदव्या देण्यात आल्या.
- १८७५ बंगाली स्त्रियांनाही त्यांना भारतवर्षीय स्त्रियांचे भुषण म्हणून मानपत्र दिले.
- १८८० बंधू श्रीनिवासशास्त्रींचा मृत्यू.
- १३ ऑक्टोबर १८८० बिपीन बिहारीदास मेधावी यांच्याशी विवाह (शुद्र व्यक्ती, एम. ए. लॉ ग्रज्युएट)
- १८८२ पतीचा मृत्यू
- १८८२ आर्य महिला समाजाची स्थापना (पुणे)
  नंतर अहमदनगर, सोलापूर, ठाणे, मुंबई, पंढरपूर, बार्शी इ. ठिकाणी या आर्य महिला समाजाची स्थापना केली.
- ३ फेब्रुवारी १८८२ हंटर आयोगापुढे साक्ष दिली. रमाबाई इंग्लंडला गेल्या.
- २९ सप्टेंबर १८८३ इंग्लंडमधील वॉटिज येथील चर्चमध्ये ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला.
- १८८७ रमाबाई असोसिएशन संस्था स्थापन केली.
- ६ मार्च १८८६ आनंदीबाई जोशी यांच्या ६ मार्च १८८६ रोजी होणऱ्या पदवीदान समारंभास हजर राहता यावे म्हणुन त्या फेब्रुवारी १८८६ मध्ये अमेरिकेस गेल्या.
- १८८७ द हाय कास्ट हिंदू वुमन (पुस्तक)
  (अमेरिकेतील वास्तव्यात हिंदू बालविधवांच्या समस्यांवर आधारित)
- १८८२ स्त्री धर्मनिती
- १८८६ युनायटेड स्टेट्सची लोकस्थिती व प्रवासवृत्त (पुस्तक)
- ९ मार्च १८८९ शारदा सदन (मुंबई) - विधवा व अनाथ स्त्रियांसाठी.
- १८९० शारदा सदनचे पुण्यात स्थलांतर करण्यात आले.
- २४ सप्टेंबर १८९८ मुक्तिसदन (केडगाव)
  मुक्तिसदनात निरक्षित विधवा स्त्रियांसाठी कृपासदन, प्रीतिसदन, शारदासदन, शांतीसदन, बातमीसदन, सदानंद सदन इ. वेगवेगळे गट करण्यात आले.
- १८९९ कृपासदन (केडगाव)
- १९०७ माझी साक्ष (इंग्रजी आत्मवृत्त)
- १९०८ हिब्रु भाषेचे व्याकरण.
- १९१२ नवा करार (पुस्तक)
- १९१३ बायबलचे मराठी भाषांतर, प्रभू यशू चरित्र
- १९१७ भविष्यकथा (पुस्तक)
- मुक्ति प्रेअर बिल (त्रैमासिक)
- फॅमिन - एक्सपिरीअन्स इन इंडिया

- अ. टेस्टिमनी (पुस्तक)
- १९१९ कैसर-ई-हिंद ही पदवी व सुवर्णपदक
- १९२१ मनोरमाचा मृत्यू
- ५ एप्रिल १९२२ - पंडिता रमाबाईचा मृत्यू (पुणे)

## ७६. अनंत लक्ष्मण कान्हेरे (१८९१-१९१०)

**जन्म :** १८९१ - आयनी मेटे, रत्नागिरी
**मृत्यू :** १९ एप्रिल १९१० - ठाणे (फाशी)
**चळवळ :** भारतीय स्वातंत्र्यलढा
**संघटना :** अभिनव भारत
**धर्म :** हिंदू
**प्रभाव :** विनायक दामोदर सावरकर
**वडिल :** लक्ष्मण कान्हेरे

- १९ व्या वर्षी यांना फाशी देण्यात आली.
- २१ डिसेंबर १९०९ रोजी नाशिकच्या विजयानंद नाट्यगृहात जॅक्सन ह्या इंग्रज आधिकाऱ्याला गोळ्या झाडून ठार मारले.
- सावरकर बंधू, मदनलाल धिंग्रा यांच्याकडून स्फूर्ती घेऊन कान्हेरे यांनी जॅक्सन याला ठार मारले.
- त्याला कृष्णाजी गोपाळ कर्वे आणि विनायक नारायण देशपांडे अशा साथीदारांची जोड मिळाली.
- कान्हेरे यांना अटक करण्यात आली.
- कान्हेरे, कर्वे आणि देशपांडे यांच्यावर खटला भरण्यात आला.
- २० मार्च १९१० रोजी तिघांनाही फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली.
- १९ एप्रिल १९१० या दिवशी तिघांना ठाण्याच्या तुरुंगात फाशी देण्यात आली.
- ठाण्याच्या तुरुंगात अनंत कान्हेरे यांचे स्मारक आहे.
- नाशिकमध्ये अनंत कान्हेरे नावाचे क्रिकेट मैदान आहे.
- नाशिकचा कलेक्टर ए. एम. टी. जॅक्सन याची हत्या करणारे अनंत कान्हेरे हे खुदीराम बोस यांच्या नंतरचे सर्वांत तरूण वयाचे भारतीय क्रांतिकारक ठरले.

## ७७. केशवराव एम. जेधे (१८९६-१९५९)

**जन्म :** ९ मे १८९६ - पुणे

**मृत्यू :** १२ नोव्हेंबर १९५९

**नाव :** केशवराव मारोतीराव जेधे

**शिक्षण :** प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पुण्यात झाले.

**निवासस्थान :** जेधे मॅन्शन या नावाने शुक्रवार पेठेत निवास होते.

**वृत्तपत्रे / मासिके :** शिवस्मारक नावाचे साप्ताहिक काढले ते ८ महिनेच चालले.

- १९१८ मध्ये मुंबई विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा पास झाले.
- १९२० मध्ये त्यांचे लग्न हे सत्यशोधक समाजास मान्य असलेल्या पद्धतीनुसार झाले.
- १९२२ मध्ये त्यांनी छत्रपती मेळा सुरु केले. यासाठी त्यांनी त्यांच्याजवळचा पैसा खर्च केला. छत्रपती मेह्याने ४-५ वर्षे गणेशोत्सवात मोठे नाव केले. त्यामुळे जेधेंचे नाव पुणे शहरात चर्चेत आले.
- मार्च १९२५ मध्ये केशवराव हे पुणे नगरपालिकेत सदस्य म्हणून निवडून गेले. जेधे यांनी पुणे नगरपालिकेच्या खर्चाने चालणारे सार्वजनिक हौद व नळे अस्पृश्यांनाही खुले करावेत असा ठराव मांडला पण तो १२ विरुद्ध १५ मतांनी फेटाळला गेला.
- त्यांनी महात्मा फुले यांचा पुतळा पुणे नगरपालिकेने बसवावा असा प्रस्ताव मांडला पण तोही फेटाळला गेला पण या प्रकरणामुळे त्यांचे नाव पुण्याचा सार्वजनिक जीवनात चर्चेला आले.
- १९२५ मध्ये जवळकरांनी देशाचे दुश्मन हे छोटेखानी पुस्तक लिहिले. त्याचे प्रकाशक हे केशवराव जेधे हे व त्यांच्यावर खटला दाखल केला गेला व त्यांना दोषी ठरवून शिक्षा दिली. त्यांना ६ महिने कैद व १०० रु. दंड अशी शिक्षा झाली. या शिक्षेमुळे केशवराव जेधे यांची लोकप्रियता वाढली. (डॉ. आंबेडकरांनी वकिलपत्र घेऊन जेधे-जवळकरांची निर्दोष मुक्तता केली.)
- जेधे व जवळकर यांच्यात फुट निर्माण झाली. इ.स. १९२०-२७ पर्यंतची मैत्री ही सायमन कमीशनला सहकार्य करावे की करु नये या प्रश्नावरुन मतभेद निर्माण करणारी झाली. यात जेधे यांचे मत होते की, सायमन कमीशनला सहकार्य करु नये, तसेच जवळकरांचे मते होते की सहाकार्य करावे. कैवारी या पत्रातुन जवळकर हे दारुच्या जाहिराती प्रकाशित करू लागले ही बाबही जेधे यांना आवडली नाही व त्यांच्यात फुट पडली.
- पुणे येथील पर्वती मंदीरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणुन झालेल्या चळवळीत जेधे सहभागी झाले होते. तसेच त्यांचा महाडच्या सत्याग्रहातही समावेश होतो. २६ डिसेंबर १९२७ महाड परिषदेत आंबेडकरांच्या विनंतीनुसार जेधे-जवळकरांनी भाषण केले, २५ डिसेंबरला मनुस्मृतीचे दहन महाड येथे केल्याबद्दल जेधेंनी लोकांचे अभिनंदन केले.
- १९२८-२९ या दोन वर्षात जेधे यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेऊन चाललेल्या चळवळीत सहभाग नोंदवला. २५ जुलै १९२८ रोजी जेधे बंधुनी वि. रा. शिंदेसोबत मुंबई इलाखा शेतकरी परिषद आयोजित केली. त्यात तुकडेबंदी बिल व सारावाढीचा प्रस्ताव पुढे ढकलला गेला होता. या विरोधात त्यांचा विशेष सहभाग होता. ब्राह्मणोत्तर चळवळीला विराम देऊन महर्षी वि. रा. शिंदे यांच्या प्रभावाने कॉंगेसच्या राष्ट्रीय राजकारणाकडे ते वळले.
- १९३० मध्ये ते गांधीजींच्या सविनय कायदेभंगाचा चळवळीत सहभागी झाले होते. जेधेंनी स्वदेशी व बहिष्कार या विषयांवर व्याख्याने पण दिली. त्यांना या संदर्भात दोषी ठरवून ब्रिटीश सरकारने ३ महिने सक्तमजुरी व १००० रु. दंड अशी शिक्षा दिली.
- १९३४ मध्ये केशवराव जेधे यांची मध्यवर्ती कायदेमंडळात निवड झाली.
- महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेसचे दोनवेळा त्यांनी अध्यक्षपद भुषविले व याकाळात महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने कॉंग्रेस खेड्यापाड्यांपर्यत जाऊन पोहचवण्याची प्रक्रिया त्यांच्या नेतृत्तवाखाली झाली. जेधे प्रांताध्यक्ष असताना कॉंग्रेसने जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुकाही जिंकल्या.

- मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री म्हणुन बाळासाहेब खेर यांनी धुरा सांभाळली. (१९३७-१९४६) पण त्यांच्या मंत्रिमंडळाच्या कारभार शेतकरी कामगारांच्या हिताचा झाला नाही, अशी त्यांची पक्की धारण झाल्याने त्यांनी १९४६ मध्ये काँग्रेस पक्ष सोडला व स्वतंत्र शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.
- १९५० मध्ये दाभाडी येथे भरलेल्या दुसऱ्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. १९५२ च्या लोकसभा निवडणुकीत जेधे हे काकासाहेब गाडगीळ यांच्याकडून पराभूत झाले, पण पुढे १९५४ मध्ये शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस शंकरराव मोरे यांच्याशी मतभेद झाल्याने त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचा राजीनामा दिला व परत काँग्रेसमध्ये प्रवेश केला.
- १९५४ मध्ये ते प्रामुख्याने काकासाहेब गाडगीळ यांच्या प्रयत्नांनीच काँग्रेसमध्ये आले व १९५७ च्या निवडणुकीत बरामती मतदारसंघातुन लोकसभेवर निवडून गेले.
- संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांचा विशेष सहभाग होता. द्विभाषिक मुंबई राज्यास त्यांचा पाठिंबा नव्हता तर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा या मताचे ते होते.
- गोवा-मुक्ती आंदोलनातील सहभाग हा महत्त्वाचा होता. जून १९५४ मध्ये गोवामुक्तीसाठी स्थापना झालेल्या सर्वपक्षीय गोवा विमोचन सहायक समितीचे केशवराव जेधे हे अध्यक्ष होते. तसेच त्यांनी काही काळ संयुक्त महाराष्ट्र समितीचेही अध्यक्षपद भुषविले तसेच त्यांनी १९४८ मध्ये पहिल्या तमाशा परिषदेचे अध्यक्षपदही भुषविले.
- १९५९ मध्ये त्यांचे निधन झाले.
  त्यांचे एकंदरीत सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणोत्तर चळवळ, शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस, गोवा मुक्तिलढा व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत योगदान राहिले.
- त्यांचा मरणापरांत - पुणे येथील स्वारगेटच्या उड्डाणपूलाचे नामकरण देशभक्त कै. केशवराव जेधे उड्डाणपूल असे करण्यात आलेले आहे.

## ७८. रामकृष्ण गोपाल भांडारकर (१८६७-१९२५)

**जन्म :** ६ जुलै १८३७

**मृत्यू :** २४ ऑगस्ट १९२५

- शिक्षण मालवण, रत्नागिरी, मुंबई येथे झाले.
- शाळांमध्ये मुख्याध्यापक म्हणून काम केले.
- एल्फिन्स्टन महाविद्यालयात आणि नंतर पुणे येथे डेक्कन कॉलेजमध्ये संस्कृत भाषेचे प्राध्यापक.
- १८९८ मध्ये डेक्कन कॉलेजातून निवृत्त.
- १८९३-९५ सालादरम्यान मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु होते.
- प्राकृत भाषा, ब्राम्ही, खरोष्टी या लिप्या वगैरेंचे संपूर्ण ज्ञान मिळवून भारताच्या इतिहासाचे संशोधन केले.
- लुप्तप्राय झालेला इतिहास पुर्नमांडणी करून प्रकाशात आणला.
- भारतातील हस्तलिखित ग्रंथाचा शोध घेऊन त्यांना प्रकाशित करण्याचे काम साध्य केले.
- पुरातत्वशास्त्राचा इतिहास, अभ्यास करणारे संशोधक आजही त्यांचे ग्रंथ प्रमाण मानतात.
- १८८३ साली व्हिएन्नामध्ये भरलेल्या विद्वानांच्या परिषदेत IE (Companion of the order of the Indian Empire) ही पदवी देऊन सन्मानित.
- प्राच्यविद्या विशारद म्हणून महती पसरली.
- डॉक्टर्स ऑफ लेटर्ससह अनेक मानद सन्मान मिळाले.
- प्राच्याविद्याविषयक ग्रंथरचना केली.
- ८० व्या वाढदिवसानिमित्त इ. स. १९१७ मध्ये भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था स्थापन करून तिची सुरुवात केली.

**लिहिलेले ग्रंथ :**

- भारताचा पुरातत्व इतिहास (पाच खंड)
- मुंबई निर्देशिकेसाठी (Bombay Gazetters) लिहिलेला दक्षिण भारताचा इतिहास.
- वायूपुराण या ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद (अपूर्ण)
- भवभूतीच्या मालती माधव वर टिका.
- फक्त इंग्रजी जाणणाऱ्यांसाठी संस्कृत न्याकरण भाग १ आणि भाग २

## ७९. ताराबाई मोडक (१८९२-१९७३)

**जन्म :** १९ एप्रिल १८९२
**टोपण नाव :** ताराबाई मोडक
**गाव :** इंदूर
**वडिल :** सदासीव पांडुरंग केळकर
**आई :** उमाबाई
**मुंबईत :** एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाऊ लागल्या (अलेझांड्रा गर्ल्स हाय स्कूल)

- १९०९ मॅट्रीक पास
- १९१४ फिलॉसॉफी घेऊन बी. ए. पास
- १९१५ ताराबाईंचे के. व्ही. मोडक यांच्याशी लग्न.
- १९१५ अमरावतीय मुलींसाठी सरकारी हायस्कूल सुरु केले.
- १९१६ : एम. ए. पास नाहीत.
- १९२१ राजकोटच्या बार्टन फीमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्राचार्य
- पुण्यात मुलींच्या शाळेत शिक्षीका.
- १९२६ नुतन बालशिक्षण संघ संस्थेची स्थापना (मॉन्टेसरी संघाची स्थापना)
- १९३१ नंतर ताराबाईनी अमरावतीला येऊन हरिजन सेवा संघातर्फे बालवाडी महिला, महिला मंडळ, साक्षरता प्रसार आदी कामे केली.
- प्रशिक्षीत शिक्षक बालकांना मुल्यसंस्कार देऊ शकतात अशी त्यांची धारणा असल्याने उत्तम शिक्षक घडविण्यासाठी जीवन मंदीर ची स्थापना.
- १९३३ ताराबाईंनी शिक्षण पत्रीका काढावयास सुरुवात केली.
- १९४५-५७ या काळात ग्रामीण बाल शिक्षणाचे कार्य त्यांनी बोर्डी येथे केले.
- सकस आहार योजना, पुरक अन्न योजना, कुरण शाळा, रात्र शाळा, शबरी उद्योगालय प्रौढ शिक्षण वर्ग हे उपक्रम राबविले.
- १९४६ मुंबई विधीमंडळावर निवडून गेल्या होत्या.
- १९६२ पद्मभुषण हा किताब त्यांना केंद्र सरकारने दिला.
- **मृत्यू :** ३१ ऑगस्ट १९७३
  ताराबाई मोडक या एक मराठी भाषक आणि भारतातील पहिल्या बालशिक्षण तज्ञ होत्या. त्यांना भारताच्या मॉन्टेसरी म्हणतात.
- **संदर्भ :** पद्मजा फाटक - शिक्षणतज्ञ ताराबाई मोडक मुंबई १९८१
- **लेख :** नदीची गोष्ट, बालकांचा हट्ट, बालविकास व शिस्त, बिचारी बालके, सवाई विक्रम

## ८०. विश्वनाथ नारायण मंडलिक (१८३३-१८९९)

**जन्म :** ८ मार्च १८३३ (मरुड - रत्नागिरी)

- रावसाहेब मंडलिक म्हणून ओळखले जात.
- ते लेखक, कायदेपंडित, पत्रकार, समाजसुधारक होते.
- शिक्षण : एल्फिन्स्टन स्कूल व कॉलेजमधून
- १८६३ सरकारी वकील झाले व त्यामध्ये त्यांनी रत्नागिरीच्या खोतीप्रकरणात महत्त्वाची कामगिरी बजावली.
- १८६४ नेटिव्ह ओपिनियन पत्र सुरु केले.
- १८७७ दिल्ली दरबारात त्यांना C. I. I. हा किताब मिळाला.
- १८८० व्यवहारमुख व याज्ञवल्क्यस्मृती या ग्रंथाचे इंग्रजीत भाषांतर केले.
- १८८९ मंबई युनिव्हर्सिटीने त्यांना आर्टसचे डिन नेमले म्हणून एतदेशीयांस मिळालेला हा पहिलाच मान होता.
- **कार्ये :**
  १) शिक्षणप्रसाराबरोबरच त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाचा पुरस्कार केला.
  २) विधवांचे पुनर्विवाह घडवून आणले.
  ३) हुंडाबंदी व जातीभेद या विरोधी आक्रमक भूमिका बजावली.

- **प्रसिद्ध ग्रंथरचना :**
  हिंदू कायद्यावर ग्रंथ, इतिहास, राज्यशास्त्र, धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र, कायदा, साहित्य इ. विषयांवर ग्रंथ लिहिले.
- **प्रसिद्ध निबंधरचना :** स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, जातिभेद निर्मूलन इ.
- १८९६ कायदा व राज्यशास्त्र यावर मंडलिक यांनी विपूल लेखन केले व हे लेखन राइटिंग्ज अँड स्पिचेस ऑफ दी लेट ऑनरेबल रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक या नावाने संग्रहीत करण्यात आले.
  रावसाहेबांचा विवाह वयाच्या ८ व्या वर्षी अंजर्ले येथील काणे ऊर्फ हवालदार यांच्या घराण्यातील ७ वर्षांच्या सखुताईशी झाला. सखुताईना अन्नपूर्णाबाई या नावनेही ओळखत असत. ऐन तारुण्यात त्या व्याधिग्रस्त झाल्याने रावसाहेब निराश असत व पत्नीच्या निधनानंतर त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत गेली. मुंबई येथे रावसाहेबांचे निधन झाले.
- १९०७ रावसाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांची सर्व ग्रंथसंपदा पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजला देण्यात आली.

## ८१. अभय बंग

**जन्म :** २३ सप्टेंबर १९५० (वर्धा - महाराष्ट्र)
**निवासस्थान :** शोधग्राम, गडचिरोली
**शिक्षण :** MBBS, MD, MPH
**प्रशिक्षण संस्था :** जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठ, बाल्टिमोर, अमेरिका
**पेशा :** वैद्यकीय
**पत्नी :** राणी बंग
**अपत्ये :** आनंद, अमृत
**वडिल :** ठाकुरदास
**आई :** सुमन
**पुरस्कार :** महाराष्ट्र भूषण

- अभय बंग हे मराठी डॉक्टर आहेत. ते सर्च या संस्थेमार्फत गडचिरोलीतील ग्रामीण भागात वैद्यकीय सेवा आणि संशोधन असे कार्य करतात. बालमृत्यू नियंत्रणावरील त्यांच्या संशोधनाची दखल भारताबरोबरच अनेक देशांनी घेतली असून आफ्रिकन देश, पाकिस्तान, नेपाळ, बांग्लादेश त्यांनी तयार केलेले बालमृत्यू नियंत्रणाचे मॉडेल वापरतात.
- अभय हे वर्धाच्या सेवाग्राम आश्रमात वाढले. गांधीजीनी सुरु केलेल्या नयी तालीम या शिक्षणपद्धतीत त्यांचे शिक्षण झाले.
- कार्ल टेलर यांच्याकडून सार्वजनिक आरोग्याचे धडे घेतले.
- डॉक्टर झाल्यावर त्यांनी वर्ध्याजवळ कान्हापूर आणि महाकाळ या गावात वैद्यकीय काम सुरु केले. कालांतराने त्यांनी चेतना विकास ही संस्था सुरु केली आणि त्यामार्फत रोजगार हमीच्या मजुरांचे संघटन सुरु केले.

\- **गडचिरोली जिल्ह्यात दारुबंदी चळवळ :**

- १९८८ मध्ये सुरु असलेल्या एका महिला जागरण यात्रेत एका स्त्रिने दारुच्या समस्येवर लक्ष वेधले. त्यावर उपाययोजना म्हणून १०४ गावामध्ये अभ्यास केला.
- यात दारुच्या अर्थशास्त्राविषयी माहिती जमविण्यात आली. अनेक संघटना आमदार एकत्र आले. आज गडचिरोली जिल्ह्यात दारुबंदी आहे.
- नवजात बालकांच्या मृत्यूच्या कारणांचा अभ्यास आणि उपाययोजना ;
- **स्त्रियांच्या आरोग्याच्या प्रश्नावरील संशोधन :**
  त्यांच्या संशोधनानुसार स्त्रियांमध्ये गायनॉलॉजिकल आजारांचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात आहे हे सिद्ध झाले. यावून असे लक्षात आले की ९२ टक्के स्त्रियांना कोणत्याना कोणत्या प्रकारचे स्त्रियांचे आजार आहेत आणि यावरुन जागतिक आरोग्य संघटनेने महिला आरोग्य वर्षाची आखणी केली.
- १९८८ साली त्यांनी सर्च नावाची बिगर सरकारी संघटना ५८ गावातील ४८००० लोकसंख्येसाठी स्थापन केली व आदिवासींना आरोग्यसेवा देण्याकरिता त्यांनी अशिक्षीत स्त्रियांनाच आरोग्यसेवेत किमान प्रशिक्षण दिले.
- **संशोधन :**
  रोजगार हमी योजनेतील किमान मजुरीचा दरामागचा शास्त्रीय अभ्यास केल्यावर तो दर ४ रु. नसून १२ रु. आहे असा निष्कर्ष काढला व तो मान्यच करावा लागला.
- **ब्रेथ काउंटर :**
  अभय बंग यांनी ब्रेथ काउंटर नावाच्या उपकरणाचा शोध लावला. यामुळे १२ च्या पुढे मोजू न शकणाऱ्या ग्रामीण स्त्रिया देखील न्युमोनियाचे यशस्वी निदान आणि त्यामुळे उपचार करु शकतात.
- **कोवळी पानगळ :**
  गडचिरोली जिल्ह्याच्या कुपोषणावर व नवजात अर्भकांच्या मृत्यूवर अभय व राणी यांनी लिहिलेला कोवळी पानगळ हा शोधप्रबंध खूप गाजला. यामुळे थेट जागतिक संघटनेला आपले आरोग्यविषयी धोरण बदलावे लागले होते.
- गांधीजी, लोक आणि विज्ञान ह्या अभय यांच्या महत्त्वाच्या प्रेरणा आहेत.

- **प्रकाशित साहित्य :** माझ्या साक्षात्कारी हृदयरोग
- **पुरस्कार :**
  १. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाकडून डी. लिट. ही सन्माननीय पदवी
  २. २००३ सालचा महाराष्ट्र सरकारचा महाराष्ट्रभूषण पुरस्कार.
  ३. २०१८ सालचा पद्मश्री पुरस्कार.